
म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू-प्रवास
सं. क्र. : ४४८



REFBK-0015843

# अंतरीच्या खुणा

सौ. ज्योत्स्ना भोळे

# अंतरीच्या खुणा

सौ. ज्योत्स्ना भोळे

REFBK-0015843

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ति पहिली : मार्च १९६६

चित्रकार : श्री. अनंत सालकर

ब्लॉक्स :
श्री. धारगळकर प्रोसेस प्रा. लि., मुंबई.

प्र का श क :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
*'तपश्चर्या'*
३८१ क, शनिवार पेठ, पुणे २

मु द्र क :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणे २

# मनोगत

आज हें पत्ररूपी पुस्तक, माझी मुलगी वंदना आपल्या हातांत देत आहे. ती परदेशीं गेली तेव्हां हीं साधींसुधीं पत्रं मी तिला लिहिलीं. ती मायदेशीं आल्यावर मी आठ महिने परदेशीं गेले, म्हणून पुन्हां पत्र-व्यवहार सुरू झाला. तिला तीं पत्रं आवडलीं व तिनं त्यांचं पुस्तक काढण्याचं ठरविलं. बालहट्ट ! तिथं डोकं नाहीं तरी हात टेकावे लागले ! असो !

ज्यांच्या हातीं हें पुस्तक पडेल त्यांना माझी एवढीच विनंती आहे की, हें एक बाळबोध वळणाचं पुस्तक आहे. त्यांत विद्वत्ता नाही, चुरचुरीत भाषा नाही, विनोद नाही, किंवा परदेशांत मी कांही पाहिलं त्याचं रसभरित सुंदरसं वर्णनहि नाही. कारण प्रवासवर्णनाचीं इतकीं सुंदर पुस्तकं आतापर्यंत लिहिलीं गेलीं आहेत– की मी निराळं काय वर्णन करणार ? मला एवढंच सांगायचं आहे की, कांही वेळां थोडीशी आत्मस्तुति माझ्याकडून झाली असेल, पण ती मुलीजवळ म्हणूनच केली. त्यांत मी फार मोठं कांही केलं हा गर्व नाही. आणि जे कांही अनुभव आयुष्यांत आले, ते थोडक्यांत तिला अधूनमधून लिहिले. ते खरे आहेत.

आपल्या मुलांनी खूप खूप नांव कमवावं असं प्रत्येक आईला वाटतं. मलाहि तसंच वाटतं. होणं न होणं हा भाग वेगळा !

वादळी पावसाच्या वांकड्या-तिकड्या सरींप्रमाणं माझं वेडंवाकडं अक्षर सुधारून त्याची व्यवस्थित प्रत तयार करून देण्याची आमचे स्नेही श्री. वा. काळे ( ऊर्फ नाना काळे ) यांनी खूपच मदत केली. त्यांची मी मनापासून आभारी आहे.

मी लंडनला असतांना पोस्टापासून ते कांही प्रेक्षणीय स्थळं दाखविण्या-पर्यंत ज्यांनी अगदी मनापासून मला मदत केली त्या व्यक्तीची आठवण या पुस्तकाच्या वेळीं केली नाही तर माझ्याहि मनाला तें लागून राहील. ती व्यक्ति म्हणजे आमचा छोटा मित्र प्रभाकर दीक्षित. आभार मानले नाहीत तर तो रागावणार नाही– पण रुसेल !!

व्हीनस प्रकाशनचे आमचे स्नेही श्री. पाध्ये यांनी 'अंतरीच्या खुणां'ची 'गुढी' पाडण्यालाच आपल्या हातांत दिली तरीसुद्धां मी म्हणेन की नवीन वर्ष माझ्या वाचकांना (व इतरांनाहि) सुखाचं जावो!

श्री. वा. ना. भट व श्री. सालकर यांनी सुंदर कव्हर तयार करून दिलं त्याबद्दल त्यांचेहि आभार मानते.

माझं पहिलं छापील पुस्तक निघालं तें 'आराधना' नाटकाचं. त्यानंतर ह्या 'अंतरीच्या खुणा'. – ह्या जर माझ्या मित्रमंडळींच्या मनांत राहिल्या, तर मला जास्तच उत्साह वाटेल, आणि माझ्याकडून आणखी कांही लेखन घडेलहि, काय सांगावं?

मात्र आज मनापासून आठवण होते माझ्या आईची. ती असतांना हें पुस्तक निघालं असतं तर– पण तिचा तो आनंद पाहण्याचं माझं भाग्य नव्हतं! आई, तुझ्याच चरणीं अर्पण बरं हें!! आर्शीर्वाद असूं दे.

१५-३-१९६६
'स्वर-वंदना'
आपटे रोड, पुणें ४

सौ. ज्योत्स्ना भोळे

# प्रास्ताविक

प्रिय सौ. आईस,

'आनंद, आनंद, आनंद दशदिशा!' अशी स्थिति झाली आहे आज माझी. तुझीं सगळीं पत्रं वाचून झालेली खुशी या माझ्या इवल्याशा पत्रांत प्रकट करणं कसं शक्य आहे ग! या एका पत्राचीच कथा काय, पण शतपत्रं लिहूनदेखील मला माझा आनंद व्यक्त करतां यायचा नाही. अशा मनःस्थितीला शब्द नेहमींच अपुरे पडतात, नाही? पण तूं तर माझी लाडकी आईच! माझ्या अणुरेणूंत खळाळून वाहणाऱ्या या आनंदाची प्रचीति तुझ्या ठायीं तत्काळ होणारच, मग शब्दांची काय जरूरी, म्हणा!

मी अमेरिकेंत असतांना तुझीं हीं खुसखुशीत व कधीं कधीं खमंगहि, पत्रं आलीं की, मी नुसती लहान मुलासारखी उड्या मारीत असे. रोज कमसे कम तुझं एक तरी पत्र यावं, असं फार वाटायचं.

मी अमेरिकेला जातांना तूं तुझ्या अश्रूंना बराच भक्कम बांध घातला होतास ग. पण पत्रांत त्यांना अन्य रूपानं वाट दिलीस. तें पत्र वाचलं, आणि वाटलं, असंच धांवत जावं (तेव्हा १०,००० मैलांचं अंतर अर्थातच विसरले म्हणा!) अन् तुला घट्ट मिठी मारावी. नंतर हळूहळू तिथलं जीवन अंगवळणी पडत चाललं ती गोष्ट वेगळी. तुझ्या नियमित पत्रांची त्याला खूप मदत झाली पण! वर्ष हां हां म्हणतां गेलं, मी परतले, आणि महिन्याभरांतच तुम्हीं लंडनला पलायन (उड्डाण) केलंत. झालं पुन्हा सुरू आमचं, तुझ्या पत्रांची अधीरतेनं वाट पहाणं. पत्र आलं की त्याचीं असंख्य पारायणं करणं. नीट जतन करून ठेवलीं मी तुझीं सगळीं पत्रं. तो एक लहानसा खजिना आहे माझा. नीट जपून ठेवलेल्या तुझ्या पत्रांचीं मी असंख्य पारायणं केलीं. तुझीं म्हणून पुन्हा पुन्हा वाचावींशीं वाटत. इतकच नव्हे, तर प्रत्येक खेपेला मला वेगळाच आनंद होई तीं वाचतांना. तेव्हाच मनांत कल्पना आली की, हा पत्रसंग्रह पुस्तकाच्या रूपानं प्रकाशित झाला तर काय बहार येईल! आणि ती कल्पना प्रत्यक्षांतहि उतरली.

व्हीनस प्रकाशनचे आमचे स्नेही श्री. पाध्ये यांनी 'अंतरीच्या खुणां'ची 'गुढी' पाडव्यालाच आपल्या हातांत दिली तरीसुद्धां मी म्हणेन की नवीन वर्ष माझ्या वाचकांना (व इतरांनाहि) सुखाचं जावो!

श्री. वा. ना. भट व श्री. सालकर यांनी सुंदर कव्हर तयार करून दिलं त्याबद्दल त्यांचेहि आभार मानते.

माझं पहिलं छापील पुस्तक निघालं तें 'आराधना' नाटकाचं. त्यानंतर ह्या 'अंतरीच्या खुणा'. – ह्या जर माझ्या मित्रमंडळींच्या मनांत राहिल्या, तर मला जास्तच उत्साह वाटेल, आणि माझ्याकडून आणखी कांही लेखन घडेलहि, काय सांगावं?

मात्र आज मनापासून आठवण होते माझ्या आईची. ती असतांना हें पुस्तक निघालं असतं तर– पण तिचा तो आनंद पाहण्याचं माझं भाग्य नव्हतं! आई, तुझ्याच चरणीं अर्पण बरं हें!! आशीर्वाद असूं दे.

१५-३-१९६६
'स्वर-वंदना'
आपटे रोड, पुणें ४

सौ. ज्योत्स्ना भोळे

# प्रास्ताविक

प्रिय सौ. आईस,

'आनंद, आनंद, आनंद दशदिशा!' अशी स्थिति झाली आहे आज माझी. तुझीं सगळीं पत्रं वाचून झालेली खुशी या माझ्या इवल्याशा पत्रांत प्रकट करणं कसं शक्य आहे ग! या एका पत्राचीच कथा काय, पण शतपत्रं लिहूनदेखील मला माझा आनंद व्यक्त करतां यायचा नाही. अशा मनःस्थितीला शब्द नेहमींच अपुरे पडतात, नाही? पण तूं तर माझी लाडकी आईच! माझ्या अणुरेणूंत खळाळून वाहणाऱ्या या आनंदाची प्रचीति तुझ्या ठायीं तत्काळ होणारच, मग शब्दांची काय जरूरी, म्हणा!

मी अमेरिकेंत असतांना तुझीं हीं खुसखुशीत व कधीं कधीं खमंगहि, पत्रं आलीं की, मी नुसती लहान मुलासारखी उड्या मारीत असे. रोज कमसे कम तुझं एक तरी पत्र यावं, असं फार वाटायचं.

मी अमेरिकेला जातांना तूं तुझ्या अश्रूंना बराच भक्कम बांध घातला होतास ग. पण पत्रांत त्यांना अन्य रूपानं वाट दिलीस. तें पत्र वाचलं, आणि वाटलं, असंच धांवत जावं ( तेव्हा १०,००० मैलांचं अंतर अर्थातच विसरले म्हणा! ) अन् तुला घट्ट मिठी मारावी. नंतर हळूहळू तिथलं जीवन अंगवळणी पडत चाललं ती गोष्ट वेगळी. तुझ्या नियमित पत्रांची त्याला खूप मदत झाली पण! वर्ष हां हां म्हणतां गेलं, मी परतले, आणि महिन्याभरांतच तुम्हीं लंडनला पलायन ( उड्डाण ) केलंत. झालं पुन्हा सुरू आमचं, तुझ्या पत्रांची अधीरतेनं वाट पहाणं. पत्र आलं की त्याचीं असंख्य पारायणं करणं. नीट जतन करून ठेवलीं मी तुझीं सगळीं पत्रं. तो एक लहानसा खजिना आहे माझा. नीट जपून ठेवलेल्या तुझ्या पत्रांचीं मी असंख्य पारायणं केलीं. तुझीं म्हणून पुन्हा पुन्हा वाचावींशीं वाटत. इतकंच नव्हे, तर प्रत्येक खेपेला मला वेगळाच आनंद होई तीं वाचतांना. तेव्हाच मनांत कल्पना आली की, हा पत्रसंग्रह पुस्तकाच्या रूपानं प्रकाशित झाला तर काय बहार येईल! आणि ती कल्पना प्रत्यक्षांतहि उतरली.

अशीं आजवर मी हींच पत्रं अनेक वेळां वाचलीं, पण आजची गोडी कांही वेगळीच आहे. एवढं खरं,—केवढा अभिमान वाटतोय् हें पुस्तक पाहून, आई ! आत्तांपर्यंत खूप भेटी तुझ्याकडून मिळाल्या, कांही मी उकळल्या ! पण या—या अमोल चिरसुंदर भेटीची सर मात्र कशालाच येणार नाही. हीं पत्रं प्रसिद्ध करण्याचा मी हट्टच धरला—तुझी फारशी इच्छा नसतांनाहि,—म्हणून क्षमा करशील ना ? तुझं सारखं चाललं होतं, " अग, या अंतरीच्या खुणा लेकीलाच समजतात. इतरांना सांगून काय उपयोग ? " पण आई, त्या आपल्या सर्व स्नेही मंडळींना कळाव्या अशी माझी मात्र फार इच्छा होती. आणि शेवटीं, तुला लेकीच्या—नव्हे, लाडक्या लेकीच्या हट्टापुढं हार खावी लागली. बोलतां बोलतां तुझ्या तोंडून गेलेल्या 'अंतरीच्या खुणा' या शब्दांनीच मी या पुस्तकाचं नामकरण करण्याचं ठरवलं.

'चार बुकं शिकलेली तुझी आई'— असं तूं लाख म्हणेनास ! तुझीं अनुभवाचीं बुकं किती आहेत याची तूं तरी गणती ठेवली आहेस का आई, की ज्यांत 'चार बुकां'ना मागं सारणारं असं बरंच कांहीसं असतं ! त्याच बुकांच्या जोरावर तूं परक्या देशांतदेखील सर्वांना माया लावून आलीस ना.—आणि त्याच बुकांच्या जोरावर तर एवढीं सुंदर पत्रं लिहिलींस.

तसंच, श्री. प्रभाकर दीक्षित यांचाहि या पत्र-प्रसिद्धींत हात आहेच. तूं मला लंडनहून लिहिलेलीं कांही विशेष चांगलीं पत्रं टाकण्यापूर्वी, सहज त्यांना वाचायला देत होतीस, तेव्हा त्यांनी मला पत्र लिहून मुद्दाम ही कल्पना सुचवली होती. त्यांचीहि मी अत्यंत आभारी आहे. आणि आपलंच माणूस असलं तरी पपांचेहि मला आभार मानलेच पाहिजेत. तुला लिखाणाची केव्हांहि स्फूर्ति आली की तूं पपांकडे कोऱ्या कागदांची मागणी करायचीस, आणि पपा तत्क्षणीं तुला ते पुरवीत;—घरांत कागद नसले तर ताबडतोब दुकानांत जाऊन घेऊन येत. (हो, उगीच कागदांवाचून अडायला नको !) पण डोक्यांत घोळतंय् तोंपर्यंत चटकन् कागदावर उतरवून काढ, म्हणून तुझ्या पाठीस लागत. त्यामुळंच तुला लिहायची संवय झाली, खरं ना ?

आणि आतां, मातोश्री, पत्रं प्रसिद्ध करायला, आढेवेढे घेऊन कां होईना, पण परवानगी दिल्याबद्दल अस्मादिक आपले अत्यंत आभारी आहेत ! हाच गड तर सर्वांत कठीण होता सर करायला !

या ' अंतरीच्या खुणा ' माझ्या लेखीं अमर आणि अमूल्य आहेत, आई. कारण त्या माझ्या ' माउलीच्या काळजाच्या तोला 'च्या आहेत !

तुझीच,
बंदुशा

ता. क.

आयुष्यांत अचानक घडलेल्या कलाटणी देणाऱ्या घटनांना तूं ' न पडलेलीं स्वप्नं ' म्हणतेस. तीं न पडलेलीं स्वप्नंदेखील तुझीं साकार झालीं आहेत. मग माझ्या जन्मापूर्वी तुला जें खरोखरीच स्वप्न पडलं, तें निदान तुझ्या स्वप्न-पूर्तीसाठी तरी साकार होवो, हेंच माझं ईश्वर-चरणांशीं अंतःकरणापासून कळकळीचं मागणं आहे !

तुझी
बंदू

अशीं आजवर मी हींच पत्रं अनेक वेळां वाचलीं, पण आजची गोडी कांही वेगळीच आहे. एवढं खरं,—केवढा अभिमान वाटतोय् हें पुस्तक पाहून, आई! आत्तांपर्यंत खूप भेटी तुझ्याकडून मिळाल्या, कांही मी उकळल्या! पण या—या अमोल चिरसुंदर भेटीची सर मात्र कशालाच येणार नाही. हीं पत्रं प्रसिद्ध करण्याचा मी हट्टच धरला—तुझी फारशी इच्छा नसतांनाहि,—म्हणून क्षमा करशील ना? तुझं सारखं चाललं होतं, "अग, या अंतरीच्या खुणा लेकीलाच समजतात. इतरांना सांगून काय उपयोग?" पण आई, त्या आपल्या सर्व स्नेही मंडळींना कळाव्या अशी माझी मात्र फार इच्छा होती. आणि शेवटीं, तुला लेकीच्या—नव्हे, लाडक्या लेकीच्या हट्टापुढं हार खावी लागली. बोलतां बोलतां तुझ्या तोंडून गेलेल्या 'अंतरीच्या खुणा' या शब्दांनीच मी या पुस्तकाचं नामकरण करण्याचं ठरवलं.

'चार बुकं शिकलेली तुझी आई'— असं तूं लाख म्हणेनास! तुझीं अनुभवाचीं बुकं किती आहेत याची तूं तरी गणती ठेवली आहेस का आई, की ज्यांत 'चार बुकां'ना मागं सारणारं असं वरंच कांहीसं असतं! त्याच बुकांच्या जोरावर तूं परक्या देशांतदेखील सर्वांना माया लावून आलीस ना.—आणि त्याच बुकांच्या जोरावर तर एवढीं सुंदर पत्रं लिहिलींस.

तसंच, श्री. प्रभाकर दीक्षित यांचाहि या पत्र—प्रसिद्धींत हात आहेच. तूं मला लंडनहून लिहिलेलीं कांही विशेष चांगलीं पत्रं टाकण्यापूर्वीं, सहज त्यांना वाचायला देत होतीस, तेव्हा त्यांनी मला पत्र लिहून मुद्दाम ही कल्पना सुचवली होती. त्यांचीहि मी अत्यंत आभारी आहे. आणि आपलंच माणूस असलं तरी पपांचेहि मला आभार मानलेच पाहिजेत. तुला लिखाणाची केव्हांहि स्फूर्ति आली की तूं पपांकडे कोऱ्या कागदांची मागणी करायचीस, आणि पपा तत्क्षणीं तुला ते पुरवीत;—घरांत कागद नसले तर ताबडतोब दुकानांत जाऊन घेऊन येत. (हो, उगीच कागदांवाचून अडायला नको!) पण डोक्यांत घोळतंय् तोंपर्यंत चटकन् कागदावर उतरवून काढ, म्हणून तुझ्या पाठीस लागत. त्यामुळंच तुला लिहायची संवय झाली, खरं ना?

आणि आतां, मातोश्री, पत्रं प्रसिद्ध करायला, आढेवेढे घेऊन कां होईना, पण परवानगी दिल्याबद्दल अस्मादिक आपले अत्यंत आभारी आहेत ! हाच गड तर सर्वांत कठीण होता सर करायला !

या 'अंतरीच्या खुणा' माझ्या लेखीं अमर आणि अमूल्य आहेत, आई. कारण त्या माझ्या 'माउलीच्या काळजाच्या तोला'च्या आहेत !

तुझीच,
बंदुशा

ता. क.

आयुष्यांत अचानक घडलेल्या कलाटणी देणाऱ्या घटनांना तूं 'न पडलेलीं स्वप्नं' म्हणतेस. तीं न पडलेलीं स्वप्नंदेखील तुझीं साकार झालीं आहेत. मग माझ्या जन्मापूर्वीं तुला जें खरोखरीच स्वप्न पडलं, तें निदान तुझ्या स्वप्न-पूर्तीसाठी तरी साकार होवो, हेंच माझं ईश्वर-चरणांशीं अंतःकरणापासून कळकळीचं मागणं आहे !

तुझी
बंदू

# प्रकाशकाचे निवेदन

सौ. ज्योत्स्नाबाई भोळे यांचे " अंतरीच्या खुणा " हें पुस्तक वाचकांचे हाती देण्यास आम्हांस आनंद होत आहे.

" अंतरीच्या खुणा " मधील २१ व्या अनुक्रमाचे पत्र वास्तविक पुणे येथून पाठविलेले आहे; त्याची जागा ५ व्या पत्रानंतरची आहे. त्याचप्रमाणे, प्रारंभीच्या काही पत्रांवरील तारीख चुकीची पडली आहे.

प्रस्तुत पुस्तक लोकप्रिय होऊन त्याच्या दुसऱ्या आवृत्तीचा सुयोग लवकरच येईल, असा भरवसा वाटतो.

सौ. ज्योत्स्नाबाई भोळे ह्यांचे आगामी पुस्तकहि 'व्हीनस' तर्फे प्रसिद्ध होईल, असे वाचकांना आश्वासन देण्यास मला आनंद होत आहे.

स. कृ. पाध्ये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९४८३

# अंतरीच्या खुणा

## : १ :

पुणें,
२८-८-१९६३

प्रिय बंदुशा,

म्हणतां म्हणतां तुझा जाण्याचा दिवस येऊन ठेपला. आतां मात्र मला कांही सुचेनासं झालं आहे. काल आपण सर्व मुंबईला दुपारच्या गाडीनं आलों. आज तुझ्याबरोबर जाणाऱ्या मुलं-मुली बऱ्याच होत्या. घरचं जेवण म्हणून तुला हल्ली जेवायलाच मिळालं नाही. दोन महिने तर फार गडबडींत गेले, म्हणूनच काल चांगलं जेवण करून ठेवण्यास मी घरीं कळवलं होतं, आज तरी शान्तपणं जेवशील म्हणून. नंदा तुझ्या आधीच मुंबईला आली होती, ती पण आजच घरीं आली. रात्रीं हंसत खेळत जेवणं झालीं, आणि आतां झोपायची तयारी. इकडे तिकडे सामान पडलेलं आणि तेंहि कसं तरी; त्यांतून जागा लहान. ओळीओळीनं बिछाने घातले, आणि माझ्याजवळ तूं, तुझ्याजवळ नंदा, नंतर शशी, अशा ओळीनं आपण झोपलों. त्या रात्रीं शान्त झोप कसली लागते म्हणा! तूं तर थकलेली होतीस, तेव्हाच झोपून गेलीस. आपल्या घरीं रहायला आलेली शशी, ती पण झोपली होती. तिचा पासपोर्ट हातांत आला नव्हता. ती पुण्याला असतांनाच ‘खुदाहि कष्टी आणि मशीदहि कष्टी’

ह्या स्थितींत होती. तिचा तो तसला चेहरा पाहून मला अगदी वीट यायचा. आपण लोकांकडे आहोंत, आपण जर दिवसभर असं वागलों तर या मंडळींना काय वाटेल याचा विचार तिनं करायला नको का ग? ती जेवतांना, खातांना— मी स्वतः उभी रहायची व्यवस्थित जेवते की नाही ते पहायला, पण तिचं आपलं तेंच. गप्प बसली की मी तिला विचारायची, 'सर में दर्द है क्या, शशी?' त्यावर एक नाही, दोन नाही. पांच सहा वेळा विचारल्यावर मग 'हाँ' म्हणायची. तोंपर्यंत काय समजायचं सांग आतां तूंच. तिचं तें वागणं पाहून माझं 'दर्द' उसळत होतं! मला सारखं वाटायचं, इथं जर ही मुलगी अशी वागते तर तिथं गेल्यावर हिचं कसं होईल? ही अशीच (मूडी) लहरी असेल तर त्यांनी काय समजायचं? मला आपली तीच काळजी लागली होती. तूं म्हणायचीस, 'जाऊं दे ग आई, कशाला विचार करतेस तिच्याबद्दल?' ती चमत्कारिकच आहे. पण अग, दुसऱ्याची मुलगी आपल्याकडे रहायला आलेली, आणि आपल्या-कडून तिचं नीट होत नाही की काय— असं तें वागणं पाहून मी तुला म्हणायची, 'हें बघ बंदुशा, लोकांकडे गेलं की असं वागून नाहीं चालत. लोक जसे आपल्याला भेटतील तसं आपल्याला वागतां आलं पाहिजे. पाहुण्यासारखं घर कधीच होत नाही— तर घरासारखा पाहुणा! घरीं मी असंच खाते, इतक्या वाजतांच मला चहा लागतो, अमुक वाजतां तमुक लागतं हें सर्व गुंडाळून ठेवावं लागतं, समजलीस? घरीं जर आपण सकाळी ५ ला चहा पीत असलों, आणि जिथं जातों तिथं ८ ला चहा होत असेल तर आम्हीहि ८ लाच चहा पितों असं म्हणावं लागतं, करणार काय?' माझं तुला हेंच सांगणं आहे की, जोंपर्यंत आपण दुसऱ्याकडे पाहुणे म्हणून जातों तिथं माझं हें असं आहे, असं कधींहि दाखवूं नये. त्यांच्या-सारखा वागण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे त्यांनाहि बरं वाटतं, आणि तें अखेरीं आपल्यालाहि सुखाचं होतं. तूं तशी शहाणी आहेसच म्हणा. तुला कुठं कसं वागावं हें बरोबर कळतं. आयुष्यांत तें फार महत्त्वाचं आहे बघ बंदुशा. स्वतःची मिजास दाखवून कधीच चालत नाही. त्यांना असं वाटलं पाहिजे की, ही आपल्याकडे परत पुन्हा आली पाहिजे. मी इतका प्रवास केला, ज्यांच्या-ज्यांच्याकडे मी उतरले होते, तीं कांही माणसं म्हणजे न

विसरण्याइतकीं घरचीं झालीं आहेत. जाण्याचा दिवस उजाडला की मला ती मंडळी म्हणायची, "अहो, तुम्ही आमच्याकडे उतरणार हें कळल्या-वर आधी आम्ही खूपच घाबरलों होतों. कारण तुम्ही पडलांत कलावंत लोक; यांची मर्जी आपण कशी सांभाळणार ? पण तुमचं तसं कांही नाही हं ! कधी कांही निराळं करा, असंसुद्धा सांगितलं नाहीत तुम्ही. या बाजूला आलांत की आमच्याचकडे उतरलं पाहिजे हं, ज्योत्स्नाताई !" आपण हेंच ध्यानांत घ्यावं बरं वंदनाताई !

उजाडली ग २९ तारीख.

रात्रीं एकला तुमचं विमान सुटणार. दुपारीं तुझ्या मावश्या, बहिणी सर्व भेटायला आल्या होत्या. कुणी कुणी तुला काय काय प्रेझेंटस् दिलीं, त्यांतल्या त्यांत लोणच्याच्या बाटलीचं प्रेझेंट तुला जास्त आवडलं असेल, नाही ? मिरचीचं लोणचं तुला अगदी प्रिय ! पुन्हा गडबडींत आजचा दिवस कसा गेला कळलं नाही. आज तूं फार थकून गेलेली दिसतेस. माझीहि तीच परिस्थिति झाली आहे. विमानाचा प्रवास म्हणून छातींत गोळा उभा राहिला ग बेबड्या. आतां अगदी जीव गळून गेल्यासारखं वाटतंय. किशोरदादा लंडनला गेला तेव्हा विमान सुटलं आणि— जोरानं धोंडा कुणी तरी छातींत मारला— असं मला तो आवाज ऐकून झालं. आवरून धरलेलं माझं सर्व अवसान एका क्षणांत गळून पडलं. रात्रीं माझी काय अवस्था होणार तें कांही मला सांगतां यायचं नाही. दादाच्या वेळीं तूं पापांना म्हणालीस, 'पापा, आईला विमानतळावर नेऊं नका. ती रडून घोटाळा करील.' पण शेवटीं घोटाळा कुणी केला आठवतंय ना ? तूंच खूप रडलीस. कांही केल्या थांबत नव्हतीस. मला माहित आहे, की तुला माझीच काळजी आहे म्हणून; पण मी खूप आवरीन हं स्वतःला.

तूं किती भाग्यवान आहेस ! इतक्या लहान वयांत तुला अमेरिकेत तिथं शिकायला मिळत आहे. इतक्या लांब मुलीला कुठं पाठवायचं, असं म्हणण्याचे हे दिवस नाहीत आतां बंदुशा. आपल्या मुलांनी हुशार व्हावं, नांव कमवावं अशी माझी मनापासून इच्छा. तुला पाठवायचं ठरलं तेव्हा पुष्कळांनी मला विचारलं की, तुम्ही विचार करून मुलीला पाठवतांय ना ?

म्हणे लहान वय आहे. आतां तुम्ही लहान कसल्या ग? स्वतःबद्दल विचार करण्याइतपत तुम्ही आतां शहाण्या झालांत असंच आम्हाला वाटतं. मला तर्शी मुळींच तुझ्या बाबतींत भीति वाटली नाही. आणि म्हणूनच मी तुला होय म्हटलं. आतां एवढं मात्र कर. तिथं गेल्यावर पत्र मात्र वेळच्या वेळीं पाठवीत जा. नाही तर माझा अगदीच निकाल लागेल.

म्हणतां म्हणतां संध्याकाळ संपून रात्र झाली. जेवणं आटोपलीं, आणि विमानतळावर जाण्याची तयारी सुरू झाली. १० ला निघालों. आतां मात्र बंदुशा खूप दूर जाणार ही कल्पना सारखी डोळ्यांत थैमान घालूं लागली. सामानाचं वजन झालं, आणि आमचा तूं निरोप घेऊन आंत गेलीस. कस्टम झाल्यावर विमानांत बसायला गेलीस आणि एकदम माझ्या मनांत विचार आला, आतां बंदुशा एक वर्ष मला दिसणार नाही. क्षणभर असं वाटलं की तुला जोरांत हांक मारून सांगावं की, नको ग बंदुशा जाऊंस. मागं फीर. मी एक वर्ष राहूं शकणार नाही. मी जोराचा आंवढा गिळला आणि तोंडावाटे फुटूं पडणारे शब्द त्यांत विरून गेले. त्याच क्षणीं तुझ्या विमानाचा एवढा जोराचा आवाज झाला, की त्या जोराच्या आवाजांत मी आणि माझ्यासारख्या बाकीच्या मुलांमुलींच्या आयांचा धडधडण्याचा आवाज लोकांच्या कानापर्यंत पोचूं शकलाच नाही. जें तुम्हाला आमच्यापासून दूर घेऊन जाणार म्हणून आम्ही संतापलों होतों त्यानंच आमची लाज राखली. तो क्षण काय सांगूं तुला बंदुशा, नाही ग, नाही सांगतां येत. जेव्हा तूं जन्माला आलीस, तेव्हा किती ग आई तुला त्रास झाला असं मला विचारलंस तर तें सांगतां येणार नाही. तसंच त्या क्षणीं काय वाटलं तें कांही सांगतां यायचं नाही. फ्रिजमध्ये ठेवलेल्या लोण्याच्या गोळ्यानं कधीहि मिजास मारूं नये की, मी आतां दगडासारखा घट्ट झालों आहे. कोण मला वितळूं शकणार? तशी माझी स्थिति झाली त्या दिवशीं. एका बाजूला आनंद तर एका बाजूनं काय होतं हें कळत नव्हतं. पण वितळलेलं लोणी आतां पुष्कळच पूर्ववत् होत आलं आहे. अग, लोणीच तें. वितळणं हाच त्याचा धर्म. तीच स्थिति आईच्या अंतःकरणाची. मुलांवर प्रेम करणं हा त्याचा धर्म. एकदां का तुझं पत्र आलं की मग नॉर्मल हं, बंदुशा. फिकिर नहीं करना बेटा.

तुम्हारी माँ कैसी है, ये अच्छी तरहसे तू जानती है, सच है न? मजेमें रहना. आतां पत्राची वाट पाहणं.

प्रिय बेबड्या,

तुमचा विमानाचा प्रवास संपला ही हॉलंडहून केबल आली आणि गुदमरलेला जीव मोकळा झाला. आतां काय नऊ दिवस बोटीचा प्रवास. त्याचं कांही विशेष वाटत नाही. आतां तुझ्या हातचं कार्ड म्हणा किंवा पत्र मिळालं की खूप बरं वाटेल. वास्तविक आम्ही उगाच काळजी करत राहतों. हजारों लोक जातात आणि येतात रोजचे.

आज तारीख ५ सप्टेंबर. तुझीं एकदम दोन कार्डं आलीं. एक रोमहून व दुसरं कैरोहून लिहिलेलं. तुला विमानाचा त्रास झाला नाही हें वाचून खूप बरं वाटलं. आतां मोठं पत्र लिहिशील ना? आम्ही तर तुला आधीच पत्रं लिहून, तिथं तुझ्या अमेरिकेंतल्या नव्या घरीं पाठवलीं आहेत. तूं चाटच पडशील. पोचल्यावरोबर तुझ्या हातांत पत्र आणि फोटो विमानतळावरचे दिले की तुला खूपच आनंद होईल. हे सगळे अनुभव मीं घेतलेले आहेत बरं का?

तुझं मोठं पत्र केव्हा येईल इकडे आमचं सर्व लक्ष. काय माणसाचं मन असतं बघ तरी. गावाला गेलेल्या माणसाला सारखं सतवायचं. पत्र कां लिहीत नाही, अमुक कां करीत नाही, तमुक कां करीत नाही वगैरे वगैरे! हैराण करतों नाही आम्ही? आपणहि सुखानं रहायचं नाही आणि गेलेल्या माणसाला मात्र सारखं सतवायचं. एकंदरींत हें खरं नाही. बंदुशा, तुझं काय मत? कळव हं दुसऱ्या पत्रांत.

तारीख ७

तारीख ८

तारीख ९

तारीख १०

तारीख ११

अग आतां मात्र (कमाल) हद्द झाली हं. तुझं पत्र नाही. जीव मेटाकुटीला आला बघ. तुमच्या अडचणी तुम्हांला. पण इथं आमची

स्थिति म्हणजे काय सांगू ? कशांतच जीव लागत नाही बघ. कांही वडत नाही. थंडा कारभार झाला आहे. मला कांही करायला मनच घेत नाही. तंबोरा काढून बसावं तर बिलकुल लक्ष लागत नाही. तूं गेलीस आणि दुसऱ्याच दिवशीं सुहास पण पुंडूला घेऊन नागपूरला गेला. त्यामुळं मला काय झालं असेल याची कल्पना कर. तो बिचारा गोड आवाजांत आजी आजी करून मागं असायचा. एक साळुंकी आणि एक मिठ्ठू मिठ्ठू पोपट. दोघेहि एकदम घरांतून उडून गेल्यावर कसं ग करमेल ? तरी बरं का बंदुशा, तूं गेल्यावर मी तीन दिवस पुण्याला आलेच नाही. बाकी आमची बोलघेवडी अनू असल्यामुळं मी पुष्कळच सावरले. पुण्याला आल्यावर तर क्षणोक्षणी तुझ्या आठवणी सारख्या मनांत यायच्या. घरांतील कानाकोपरा तुझ्या आठवणींनी भरलेला. जेवण झाल्यावर माझ्या पदराला हात पुसणं. नको नको म्हणत असतांना लोणचं, मिरची खाणं. मी जास्तच बोलले की, 'पार्वती, ही बरणी काढून ठेव बरं का लांब, अगदी लांब.' म्हणून तिला सांगणं. मध्येच तुझ्याजवळ येऊन बील्हूनं रडणं. मग तूं 'पिंटा, मला त्रास देऊं नको हं, मार खाशील !' वगैरे वगैरे ! या सगळ्या गोष्टी आठवल्या आणि – शीः ते काय लिहायचं असतं का ? तुला माहीतच आहे. गंगायमुनाला मग कांही तोटा नाही. अग आयांचं जीवन दोन चक्षूंच्या खडकांतून हळूहळू पाझरत असतं. पण कांही वेळां त्याचा ओघ आवरणं अगदी मुष्किल होऊन जातं. वाट पाहून पाहून आतां असं वाटूं लागलं होतं की, केबल करावी. पण आज १७ तारखेला तुझं पत्र आलं आणि तें वाचून इतका आनंद झाला, काय सांगूं ? पण काय मजा बघ, तुझं पहिलंच पत्र वाचतां वाचतां माझे डोळे ओलावले. प्रवास ठीक झाला, तिथली सर्व मंडळी चांगली आहेत. तुला तिथलं सर्व आवडलं. हें वाचत असतांना माझ्या डोळ्यांच्या श्रावणधारा ज्या वाहूं लागल्या त्या थांबेनातच मुळी. यालाच आनंदाश्रू म्हणतात का ग ? हे जर आनंदाश्रू शिंपल्यांत साठवले तर खरोखरीच त्याचे मोती बनतील ! स्वाति नक्षत्राचा पाऊस पडला की शिंपला तोंड उघडून असतो, त्यांत ते टपोरे थेंब पडले की त्याचे नाही का मोती बनत ? तें कांही का असेना, आज आपण खूष आहोंत. फक्त पत्र वेळच्या वेळीं पाठवत जा

त्यांत बिलकूल आळस करूं नकोस. अग आईचं मन, तें तुला कळायला वेळ आहे. आणि तुला माहित आहे ना, मला उगीच प्रेम दाखवतां येत नाही. जसं उठल्या बसल्या मी कौतुक केलेलं आणि एकसारखं तुझ्या मागं मागं राहिलेलं तुला आवडत नाही, तसंच मलाहि आवडत नाही. लोकांच्यादेखत तर तुझ्याएवढ्या मुलींचे मला लाड करतांच येत नाहीत. पापे घेऊन उगीचच माझी बबडी छबडी म्हणायला पण जमत नाही. अशा वेळीं तुमची पण चमत्कारिक स्थिति होते. तूं माझी मुलगी अशी एकटीच, म्हणजे लाडकी आहेस, म्हणून प्रत्येक बाबतींत वंदना वंदना करायला मला मुळींच आवडत नाही, आणि दुसऱ्यांनी केलेलं तेंसुद्धा मला आवडत नाही. तुला आवडेल का मी तशी वागलें तर? नाही आवडणार, मला माहित आहे. आणि खरं सांगूं बंदुशा, हल्ली आपल्या मुलांबद्दल ज्यादा दाखवण्यांत आपण खूप प्रेम करतों मुलांवर असं कांही आयांना वाटतं की काय कोण जाणे! पण तें कितीहि झालं तरी मुलांना आवडत नाही. पण करणार काय? आई-वडिलांच्या तोंडावर सांगायची त्यांची ताकद नसते.

आमची आई आम्हांला लहानपणीं चुकलं की मार देत असे; म्हणजे तिचं आमच्यावर प्रेम नव्हतं की काय? आतांचं हें फॅशनेबल प्रेम सर्वांना दाखवून करायचं असतं असं मला तरी वाटतं. हें असलं खोटं प्रेम दाखवणं मला जमत नाही. लाड जरूर करावेत, पण त्याचं प्रदर्शन करूं नये. बाकी ज्यांना जमतं त्यांनी खुशाल करावं. आपल्याला काय, आपण आपलीं साधीं भोळीं माणसं! आई या नांवाशिवाय ममी–ममी असा दिवसभर जयघोष करून हाका मारायच्या, व ममीच्या नांवाप्रमाणं पाश्चिमात्य संस्कृतीची ऐट मिरविण्यासाठी जातां येतां 'चुंबनां'ची खैरात करायची! आणि मग ह्या सर्व शिकवणुकीचं फळ काय, तर–कांही काम कर म्हटलं की तोंडाचा चंबू करून सरळ मी नाही काम करणार हें उत्तर द्यायचं! इंग्रजांनी आपल्यावर राज्य केलं. त्यांची ही आठवण अशी त्यांच्या संस्कृतीच्या आधारं द्यायची. इंग्रजांनी राज्य करतांना जसा भारतीय जनतेवर वरदहस्त ठेवला होता, तो आज त्यांच्या भाषेतहि आमच्यावर कायम ठेवला आहे की काय असं वाटूं लागतं. खरं सांगायचं म्हणजे

सध्या आमचं जीवन अर्धवटासारखं झालंय. हें सर्व असं कृत्रिम वातावरण पाहिलं की वाटतं, एकंदर आपल्या माणसांबद्दल जिव्हाळाच कमी होत चालला आहे. मला नेहमी वाटतं की, आपण इच्छा केली ती गोष्ट आपल्याला विनाप्रयास कधीच मिळूं नये. तशी ती वस्तू मिळाली की तिची किंमतच रहात नाही. खूप कष्टांनी जी वस्तू मिळते, त्यामागं तपश्चर्येची भूमिका असते. आणि त्यामुळंच त्याला किंमत राहते. ती गोष्ट खराब होऊ नये, हरवूं नये म्हणून आपण मग जिवापाड कष्ट घेतों. वंदना, हें तुला मी लिहतेय खरी, पण माझं मन बघ माझ्या बालपणांतल्या आठवणींत तरंगतंय. अग लहानपणी, आम्हांला गांवांत जत्रा वगैरे असली की महागांत महाग म्हणजे चार आणे किंमतीच्या रेशमी बांगड्या भरल्या जात असत. पण आम्ही त्याच गोष्टीवर खूष. आता माझ्या हातांत हिऱ्याच्या बांगड्या घातल्या तरी लहानपणींचा तो आनंद कांही मिळणार नाही. निर्व्याज आनंदाची जागा कृत्रिम समाधानाने कधी का भरली जाणार आहे? लहानपणीं खाल्लेली भाकरी-चटणीची गोडी अजून जिभेवर आहे. तेव्हा भूक लागली की आई लसणीचा ठेचा आणि भाकरी पुढं करी, आणि त्यानं जें समाधान लाभे तें समाधान पंचपक्वान्नं खाल्लीं तरी मिळणार नाही. आतां म्हणजे आम्हा लोकांना कशातच समाधान नाही. पूर्वी समया होत्या, त्याची जागा कंदिलानं घेतली व त्या कंदिलाला ऐट दाखविण्या· साठी विजेचा दिवा, आज्ञाधारक मुलासारखा, बटनाची उघडझाप केली की लागूं लागला. हवा पुरेना म्हणून डोक्यावर विजेचे पंखे फिरूं लागले. पूर्वीच्या काळीसुद्धा स्वच्छता खूप होती. घरांतील अंगण शेणाने स्वच्छ सारवलेलं असे. लहानपणी घराच्या जमिनी, अंगण आम्हाला शेणानं सारवावं लागे. उठल्यावर तोंड धुण्याकरितासुद्धा शेणाचीच राखुंडी. हल्लीच्या मुलींना शेण जरी रस्त्यांत दिसलं तरी "ई ई ऽऽ" म्हणून नाक मुरडतात. पूर्वी थंड हवेची मौज आम्ही अंगणांत बसून मजेने घेत होतों. आतां आल्या बंदिस्त खोल्या, डोक्यावर गरागरा फिरणारे विजेचे पंखे. तर कांही ठिकाणीं श्रीमंतीचा डोलारा दाखविणाऱ्या थंड हवेच्या खोल्या. सदा बंद असलेल्या आतां कौतुकच मुळी फार. आज काय तर डोकं दुखतंय, उद्या काय तर पायांत गोळे आलेत, असं सतत रडगाणं

सुरूच असतं. तरी बरं, नाना तऱ्हेचीं व्हिटॅमिन्स पोटांत जातात. आणि सदैव डॉक्टरचा सढळ हात सुया टोचण्यावर असतो. एवढं करून तब्बेती नाजुक त्या नाजुकच. मला तर असं वाटूं लागलं आहे वंदुशा, माणसाच्या जीवनाला धूळ, शेण आवश्यकच आहे. पूर्वी बघ, सकाळी उठल्याउठल्या गाई-म्हशींचा गोठा साफ करावा लागे, आणि त्यामुळं पहिला संबंध यायचा तो शेणाशी ! त्यांतलीं काय द्रव्यं आमच्या पोटांत जात होतीं, कोण जाणे. पण तें चांगलं होतं असं अजूनहि मला वाटतं. आम्ही फार निगा राखायला लागलों. कपड्याला कसर लागते ती प्रथम कळत नाही, पण तीच कसर हळूहळू जेव्हा जरीच्या कपड्याला भोक पाडते आणि मग डोळे उघडतात. तसंच हल्लीच्या जीवनाला झालं आहे. सगळ्या नैसर्गिक गोष्टीला आम्ही पारखे झालों आहोंत. सगळं जीवनच कृत्रिम, बोलणं, हसणं तेंसुद्धा कृत्रिम. हंसायचं तर तेंहि असं की त्यामुळं सौंदर्याला (?) बाध येता कामा नये. बोलतांनाहि नाजुकपणाचा आव आणूनच बोलायचं. हें सर्व पाहिल्यावर जेव्हा एकंदर सगळाच विचार करू लागले तेव्हा वाटतं, आपण कुठे जाऊन धडकणार आहोंत, कोण जाणे. विचार हीच गोष्ट मुळी हल्लीच्या जीवनाला मानवण्यासारखी नाही. आम्हाला कसलाच त्रास नको. कारण तशा हल्ली सोयी झाल्या आहेत ना. मूल अडीच– तीन वर्षांचं झालं की त्याला द्यायचं मॉंटेसरी आईच्या ताब्यांत, आणि मग आईनं खुशाल 'समाजकार्य', क्लब, यांमध्ये वेळ घालवायचा. मुलांनी मॉंटेसरीची वेळ संपली की घरांत परतायचं, आणि त्या मुलांचा ताबा घरांतील नोकरमंडळींनी घ्यायचा. दिवसेंदिवस तर एकमेकांवरचं प्रेमच कमी होत चाललं आहे. या सगळ्या धकाधकीच्या मामल्यांत माणूससुद्धा यंत्राप्रमाणं झाला आहे. जें चाललं आहे त्याला तोंड देणं भाग आहे. करणार काय !

तूं तर आतां यंत्रपुरांत गेलीस. तिथं जेवतांना अजून आपलाच हात लागतो हेंच आश्चर्य आहे, नाही का ? नाही तर जेवणसुद्धा यंत्राकरवीच घ्यायचं. बटण दाबलं की गेला घास आपोआप तोंडांत. तुझं दुसरं पत्र वाचून खूप खूप बरं वाटलं. ती एक मोठी काळजीच होती मला. शाळा मोठी अन् छान आहे ना ? आमच्या लहानपणींच्या शाळेंतल्या गंमतीची मजा

आतां तुम्हांला थोडीच मिळणार आहे? मास्तरांची हाक मारायची पद्धत म्हणजे एक मोठी आरोळीच असायची. कान फुटण्यापर्यंत तयारी! त्यानंतरचा शब्द म्हणजे लाभ,– लाभ या शब्दानं शाळा सुरू होत असे. पण लाभ कसला तर तो असा की चुकलं की छडीचा जो मार बसायचा– तो मोजण्याची ही पद्धत! मुलांना शिकवीत राहण्यापेक्षा ठोकून काढण्यांतच त्यांना जास्त आनंद मिळायचा की काय कोण जाणे. शाळा मुद्दाम चुकविण्याची बिशादच नव्हती मुळी. घरीं राहिलेल्या मुलाला, त्याची त्या लहानशा गांवांत धिंड काढून बाकीच्या मुलांनी त्याची पालखी करून त्याला शाळेंत आणायचं. आणि मग त्याला भरपूर द्यायची माराची मेजवानी! मग आठ दिवस हा विषय इतर मुलांना त्याला चिडविण्यासाठी पुरायचा. म्हणजे आजन्मांत त्याला शाळेविषयी प्रेम वाटायला नको. मार म्हणजे लाकडी पट्टीने नाही हं, तर लोखंडी पट्टीनं बसायचा. असा मार मिळाला की तें बिचारं पोर कळवळायचं. कां नाही कळवळणार? आम्ही मात्र त्या दिव्यांतून लवकरच सुटलों. पण त्या वेळी मास्तरांनी जें घोकून घेतलं आहे तें अजून विसरायला होत नाही. कारण जरी एकीकडून मार मिळे तरी दुसरीकडे अभ्यासाची घोकंपट्टी मानगुटीवर बसे. मार आणि अभ्यास, ह्या दोन्ही क्रिया एकाच वेळीं होत असल्यामुळं इंजेक्शनसारखं तें मनांत लौकर भिनत होतं. आणि एवढं झालं तरी मास्तरांच्याविरुद्ध ब्र म्हणण्याची टाप नव्हती. आतां काय, शाळेंत मास्तर जरी थोडंसं बोलले आणि त्यांनी मारलं तर तुम्हांला अपमान वाटतो. आतां खेळतां खेळतां शिकायचं. आहे खरी तुमची मजा. मुलांना कसं वागवावं, त्यांचीं मनं कशीं जोपासावीं हें आतां एक शास्त्रच झालं आहे. त्याचा म्हणे अभ्यास करावा लागतो. मला तर असं वाटतं, 'सुटल्या आमच्या आया या दिव्यांतून. मी नेहमी विचार करतें, आतां मुलांना लक्षपूर्वक वाढविण्यांत येतं, तरी कांही मुलं भयंकर निघतातच. कांही कां– मी म्हणते जास्तच. मग बिनशास्त्रांनी वाढलेलीं आम्ही चांगलीं कशीं झालों? मात्र, इतर शास्त्रं आईला कळत नसतील, पण दिवसाला एक श्लोक पाठ केल्याशिवाय जेवायला मिळत नसे. त्यामुळं मनाचे श्लोक, मोरोपंतांच्या आर्या, वामन पंडितांचे श्लोक हें सर्व आम्हाला त्या लहान वयांत पाठ होतं. तें तिचं शिक्षण आम्हाला चांगलं होतं. विचार करण्यासारखा प्रश्न आहे,

नाही बंदुशा ? खरं सांगू बंदू, जे कांही बरंवाईट असतं तें आपण जन्मतःच घेऊन येतों. नंतर आईवडिलांची शिकवण त्याला खतपाणी देते. मात्र खतपाणी जितकं नीट द्यावं तितकं तें झाड चांगलं होतं. तसंच मुलांचं आहे. परंतु कांही वेळां चांगल्या चांगल्या घरातील मुलंही वाईट निघालेलीं बघतों आपण, तर कांही कुचकामी निघतात. तें कसं काय ? मुलं चांगलीं निपजणं हेंहि एक प्रकारचं भाग्यच आहे, असंच शेवटी म्हणावं लागतं. मला समाधान हेंच की माझीं मुलं चांगलीं निपजलीं. मुलाला जन्म दिल्यापासून त्याचा जीवापाड संभाळ करण्यासाठीच आपला जन्म काढायचा, एवढंच त्या माउलीला माहीत असतं. जर का तीं मुलं पुढं तिलाच शिकवूं लागलीं किंवा ऐकवूं लागलीं तर मग मात्र तिच्या बिचारीच्या मनाला इतक्या यातना होतात की त्या यातनांच्या पुढं जन्म देतेवेळी झालेल्या यातना-सुद्धा कमी ठरतात. मूल होतांच प्रसूतीच्या वेदना, तो त्रास आणि यातना, आई मुलाकडे पाहताच विसरते. पण तेंच बाळ मोठेपणी जर तिचा अपमान करायला उठलं तर मात्र तें दुःख तिला असह्य होतं. स्त्रीला परमेश्वरानं कुठला गुण बहाल केला असेल तर तो म्हणजे सगळे अपराध पोटांत घालणं हा ! बिचारी नऊ महिने त्या मुलाचा संभाळ पोटांत करते, आणि जन्म दिल्या-वरही त्या दिव्यांतून आपली सुटका झाली असं तिला वाटतं; पण ती सुटका नव्हे, त्या पहिल्या मुलाबरोबरच प्रेमाचे पाश असे करकचून तिच्या-भोवती आवळले जातात की, शेवटपर्यंत त्यांतून तिची सुटका होत नाही. एखाद्या मुलानं प्रेमाचा पाश टाकण्याऐवजी फास जरी लावला तरी ते मायापाशच म्हणून ती मानते. असं हें जबरदस्त बायकांचं जीवन आहे. आपणच म्हणूं नये, पण मी त्या बाबतींत खरोखरीच भाग्यवान आहे. माझीच दृष्ट मला लागेल म्हणून मी गप्प राहते. आणि तुला माहितच आहे, आपलं तत्त्व एक,—आपल्या मुलांची किंवा स्वतःची स्तुति आपणच करायची नाही. जितकी अवश्य आहे तेवढी जरूर करावी. फाजील स्तुति नेहमीच वाईट.

तुला एक लहानपणची आठवण सांगते. सहज आठवलं बघ. लहान-पणीं माझ्याच वयाची एक मुलगी आमच्या गांवांत होती. पण फाजील लाड केल्यानं ती अतिशय हट्टी बनली होती. आजी तिचे फार लाड

करायची, आणि त्यामुळं ती मुलगी सगळ्यांच्या डोक्यावर बसली होती. ऐन जेवायच्या वेळीं तिला वेगवेगळे पदार्थ आठवायचे, व त्याचा हट्ट धरून बसायची. आजी हातांत वाडगा घेऊन सर्व घरं फिरायची ! आमच्या घरीं आली की आई म्हणायची, अगो, खात नाही म्हणजे काय ? ठेव एक दिवस उपाशी, निमूटपणं खाईल दुसरे दिवशीं ! आमची आई ह्या अशा प्रकारांतली होती. जें घरांत असेल तेंच खाल्लं पाहिजे. आवडत नसेल तर खाऊं नका. ती पर्वाच करीत नसे. तिच्या मनांत आलं तर आपण होऊन खायला घालील, पण हट्ट धरलात की संपलं सारं ! तो जिन्नस जन्मांत दिसायचा नाही. हे लहानपणचे धडे पुढं उपयोगी ठरतात. लहानपणी घरांतच आम्हाला अशी शिस्त लावली होती की चहाच्या वेळीं किंवा जेवणाच्या वेळीं आम्ही चुकून जरी दुसऱ्याच्या घरीं गेलों तरी लगेच परत येत असू, अगदी धावत. अशा वेळीं तिथं, म्हणजे दुसऱ्याच्या घरीं जायचं नाही आणि कांही खायचं नाही. ही आईची इतकी शिस्त आम्हां सर्व बहीण-भावंडांना होती की, अशा वेळीं त्या लहानशा खेड्यांतील लोकं म्हणायचीं, “ राधूचीं मुलं ना तीं, कधीच थांबायचीं नाहीत.” आम्हांला जें घरीं मिळेल त्यावरच आम्ही खूष होतों. तसं आम्ही सर्व खात होतों; दादांचं मोठं कुळागार होतं, आणि त्यांत आंबे, फणस, नारळ, काजू यांची बाग होती. हेंच आमचं तेथील उत्पन्न होतं. सुपारीचीं झाडं पण होतीं. तेव्हा आम्हाला घरचंच कुळागार असल्यानं लोकांच्या आधी आंबे, फणस खायला मिळत असत. आमच्या घरांत माणसं भरपूर. वडिलांना म्हणजे दादांना दुसरी बायको होती, म्हणजे आम्हांला सावत्र आई होती. सावत्र आई देखणी आणि पाणीदार डोळ्यांची होती. आणि माझी आई पण तशीच. तुला सांगितलं तर आश्चर्य वाटल, ह्या दोघी अगदी सख्या बहिणींप्रमाणं वागायच्या. सावत्र आई शान्त, तर माझी आई जरा तापट, हाच काय तो फरक; दादांचं कांही चुकलं तर आई फट्दिशी बोलायची. यावर सावत्र आई– जिला आम्ही ‘ माँ ’ म्हणत असूं, ती म्हणायची आईला, “ असं त्यांना बोलूं नये. बायकांनी काय उलट उत्तरं द्यायचीं, गप्प बैस पाहूं.” असं दोघींचं मिश्रण मोठं मजेदार. मला एक सावत्र भाऊ होता व एक बहीण. दुर्दैवानं दोघंही सध्या हयात नाहीत.

फार फार छान होती ग स्वभावानं. बहिणीचं नांव होतं कृष्णा, पण आम्ही तिला म्हणायची बाय. भावाचं नांव होतं धर्मानंद. तुझा मोठा मामा व तो- दोघेही एकाच वयाचे. आमच्या आईची सर्वात पहिली ताई मावशी; नंतर भाऊ- रामराव त्याचं नांव. नंतर ओळीनं सात बहिणी; आठवा पुन्हा मुलगा तो माणिकमामा; नंतर मनोहरमामा, मग निर्मलामावशी व ललिता. आहे का नाही बोल मोठं कुटुंब ! तुझ्या मोठ्या मामाबद्दल मात्र तुला जरूर कल्पना द्यायला हवी. अग, तो इतका हुशार होता, कुठलीही गोष्ट त्याला येत नाही असं मी कधीच पाहिलं नाही. शिक्षण जरी फारच थोडं झालेलं तरी बुद्धि मात्र इतकी विपुल होती की काय सांगू तुला ? नाटकं लिहायचा, गाणीं रचायचा, गायचा, नाटकांत कामं करायचा, शिवाय सुतारकाम, शिवण, तबला-पेटी, हें सगळं यायचं त्याला. भाऊला कांही येत नाही हा शब्दच मुळी चालायचा नाही. सर्वगुणसंपन्न म्हणतात ना- तसा तो होता. त्याची आठवण अजून जरी आली तरी डोळे पाणावतात. गावाला असला की नाटकं बसवायचा, भजनी मंडळ काढायचा. त्याच्या-साठी आज पंचवीस वर्षांनंतरसुद्धा गांव रडतं. आमच्या घरीं त्याचा फोटो लावला आहे. त्याचे जे मित्र आहेत ते कांही नवीन नाटक करायच्या आधी त्याला नमस्कार करायला येतात. तो गेला, पण त्याच्या आठवणी इतक्या ताज्या आहेत की, असं वाटतं, तो कुठं तरी जवळच आहे. विनोदी स्वभावाचा. घरांत तो असला की सगळीकडे चैतन्य असायचं. घरांत सर्वांचा तो लाडका. अजून मला वाटतं, आज माझा भाऊ असता तर किती बरं झालं असतं. ज्या व्यक्तीकडून जगांत कांही घडण्यासारखं असतं ती व्यक्ती सोडून गेली की फार दुःख होतं. दादांना फार मोठा धक्का बसला त्या वेळी. लहानपणी तो किर्लोस्कर नाटक कंपनींत होता. छान कामं करायचा म्हणे. विठामावशीपेक्षा मोठी बहीण टायफॉइडनं गेली तेव्हा त्याला घरीं बोलावून आणलं, आणि नंतर पुन्हा तो गेलाच नाही. तेव्हा गोव्याचीं खूप मुलं नाटक कंपनींत काम करण्यासाठी येत असत. गोव्याबद्दल लिहावं तितकं थोडंच आहे बघ. गोव्याला जसं परमेश्वरानं सृष्टिसौंदर्य विपुल दिलंय तसाच गोव्याच्या मुलां-मुलींनाही गोड गळा दिलाय. शिवाय गोव्याचीं मुलं-मुली तरतरीत व दिसायला चांगलीं. गोव्याला एकूण गरिबीच, आणि

म्हणून घरचीं लोकंही मुलांना नाटक कंपनींत पाठवायला विरोध करीत नसत. कांही मुलं तर नुसतीं जेवणावर ठेवलीं जात होतीं. काहींना १ रु. किंवा २ रु. पगार मिळे. आतां हा पगार ऐकला की हसूं येतं. आतां एक रुपयांत एक वेळचं तरी जेवण होईल की नाही ही शंकाच आहे. तूं एखाद वेळेस म्हणशील हें कशाला लिहितेस? अग पाच वर्षांनी तूं जर हेंच पत्र परत वाचशील तेव्हा तुला कळेल की, गेल्या पाच वर्षांतसुद्धा किती वस्तूंच्या भावांत वाढ झाली आहे तें. बरं बाय, आतां गेल्या पत्रांत तूं काय विचारलंस त्याचं उत्तर देईन हं. आणि त्याबरोबर गमतीही लिहीन. अन्, नाही तरी इथं बसून मी तुला दुसरा कसला आनंद देणार? बरं, फार चांगलीं पत्रं लिहीन म्हटलं तर तीं मला कशीं जमतील? तेव्हा हे सुदाम्याचे पोहे आहेत, गोड मानून खा. फाटक्या कपड्यांत गुंडाळून आणलेली ती पोह्यांची पुरचुंडी सोडून पाहिल्यावर कृष्णानं झडप घालून एक मूठ भरून पोहे तोंडांत टाकले, आणि ते खात असतांना सुदामा त्याला म्हणाला असेल, 'कृष्णा, गोड मानून घे.' आणि थोर कृष्णानंही त्याला म्हटलं असेल, की 'सुदामा, अरे हे पोहे किती गोड आहेत म्हणून सांगूं? अरे हे कोरडे पोहे नाहीत. तुझ्या अंतःकरणांतील माझ्यावरील प्रेमाच्या ओलाव्यानं ते ओथंबलेले आहेत. दुधांत भिजवूनसुद्धा इतके गोड लागले नसते रे, सुदामा!' तें जाऊं दे, अग प्रेमाची भाषा त्याला अलंकारानं नटवायची काय जरूर आहे? जिथं अंतःकरण बोलतं तिथं बाह्य अलंकाराची काय आवश्यकता? चंद्राला पाहिला की सागर उचंबळून आला तर नवल आहे का? तूं म्हणशील, काय पण आई लिहिते! कांही वेळा उलट होण्याचा संभव आहे. तूं नामांकित लेखकांचीं पुस्तकं वाचल्यावर माझीं हीं साधींसुधीं पत्रं केवळ वेगळेपणानं तुला आवडतील. तुझा आग्रह पडला म्हणून हा खटाटोप.

सर्व खुशाल.

तुझी
आई

: २ :

पुणें,
११-९-१९६३

प्रिय बंदू,

वा ग पोरी ! कमाल केलीस हं ! माझी मुलगी शोभतेस खरी. म्हणे सुदाम्याचं उदाहरण वाचून मला रडूं कोसळलं. कां ग ! खरंच रडूं आलं असेल ग बंदुशा. अग अंतःकरण बोलतं तिथं मनाचं म्हणजे ऐकण्याचं कामसुद्धा डोळेच करतात, आणि ती भाषा ऐकतात म्हणून डोळे पाझरतात. म्हणजे एकंदरींत तुला मी लिहलेलीं पत्रं आवडतात म्हणायचीं. आनंद आहे. पण एक सांगते हं पोरी, तुला आवडलीं म्हणून कोणाला दाखवूं नकोस हं. अग तीं पत्रं अवघीं चार बुकं शिकलेल्या तुझ्या आईचीं आहेत.

एकंदरींत आपला जम तिथं चांगला बसला म्हणायचा. आई-वडील दोघंहि चांगलीं भेटल्यावर मग काय विचारतां ! तीच काळजी वाटायची. तशी तूं जमवून घेणारी आहेस म्हणा ! पण आपणच किती जमवून घ्यायचं असं होतं कित्येकदां, नाही का ? बरं का बंदू ! तुला सकाळीं लौकर उठावं लागतं याचं मला इथं फार हसूं येतं. इथं असतांना तुला सकाळीं लवकर उठून पी. टी. ला जावं लागत असे त्या वेळीं गजर लावून तूं झोपायचीस ! आणि गजर झाला तरी तो बंद करून पुन्हा परत झोपायचीस ! खाली मैत्रिणी येऊन हाका मारूं लागल्या की मग घाईघाईनं उठून पळायचीस ! आणि मलाच म्हणायचींस, ‘ कां ग आई नाही उठवलंस ? ’ तुला मी

किती वेळां सांगितलं होतं तेव्हा, अग मला झोपलेल्या माणसाला उठवायला जमत नाही म्हणून. तरी आपलं “ तुझां तांच ! ” आठवतेय का ‘ ही ’ गोष्ट ?

ह्यावरून एक आठवण सहज आली बघ. मालवणला एकानं आमच्या नाटकाचं कॉन्ट्रॅक्ट घेतलं होतं. त्याला त्या वेळीं फायदा होण्याऐवजी तोटा झाला होता. आम्ही नाटकाचे पैसे मागितले की तो म्हणायचा, “ अहो, तुमचां आपलां तांच. उत्पन्न काय झालं तें तुम्ही पहाताय, आणि लगेच पैसे कोटून देऊं ? ” आम्ही म्हणायचो, “ नुकसान फायदा, ती जबाबदारी आमची नाही. ठरलेले पैसे तूं दे.” आमच्या प्रश्नाला त्याचं आपलं परत तेंच उत्तर. शेवटीं त्याचं हें पालुपद ऐकून त्याच्यावर रागावण्याच्या ऐवजी आम्हांला हसूंच यायला लागलं. अशीं एकेक माणसं भेटतात. करमणूक होते ! हें काय आणखी तूं तुझ्या पत्रांत विचारलं आहेस ? हो, तुझी पिंटा ना, अगदी छान आहे. आम्ही जितक्या वेळां खातों तितक्या वेळां तिला खायला लागतं. आहे की नाही मिजास ? दुधाशिवाय बात नाही बघ. लाडावला आहे. गादीवर झोपायला लागतं, बसायला कोच ! कधी कुणाला माया कशी लागते तेंहि कळत नाही. बिचारं मुकं जनावर, पण तेंहि आतां घरांतल्यापैकीच झालंय. शेजारच्या घरची ही बीलू पण, जी आपल्या घराला चिकटली, ती परत कांही जायला तयार नाही. किती वेळां त्यांनी घरीं नेली पण अं हं, पुन्हा आपली इथं हजर. आणि बरं का, मी कुठं बाहेर गांवीं गेले तर सुरुवातीला ती जेवत नसे. मी खायला घातल्याशिवाय तिचं पोटच भरत नसे. कुणी कितीहि दूध घालूं दे, पुन्हा आपली माझ्याजवळ येऊन मागायची ! असली आत्य. आपली ती पीटी– तीसुद्धा अशीच माझ्यावर प्रेम करणारी होती, नाही ? तुझं सारखं चाललं होतं, आपण घरांत कुत्रं पाळूं म्हणून. अगदी मागं लागायचीस. बकुलनं त्याच्या दुकानासमोर मोटारखाली सांपडेल म्हणून लहान पिलूं रस्त्यांतून उचलून आणलं. आपल्याला कुत्रा हवा म्हणून मी सांगितलं होतं व त्यालाहि प्रथम तो कुत्राच वाटला ! आणि होती ती कुत्री. पिलूं फार छान होतं, नाही ? किती छान आणि भावपूर्ण डोळे होते तिचे. जशी जशी ती मोठी होत चालली तशी छान दिसूं लागली. मी तर तिला

माझी ' शरीरसंरक्षक ' म्हणायची. सारखी माझ्या मागं मागं असायची. झोपले की ही बया आपली पलंगाखाली ताणून द्यायची. मी उठून खाली आले की माझ्यामागं दत्त म्हणून हजर. ' जेथें जाशी तेथें मी तुझा सांगती ' अशी ती करायची. माझ्यावर आणि तुझ्यावर कोणी हात उगारला तर लगेच अंगावर धावून जायची. खरंच, ह्या मुक्या जनावरांचं आपण कोण लागतों ?– पण धन्यासाठी स्वतःचा जीवसुद्धा द्यायला कमी करणार नाहीत इतकं धन्यावर त्यांचं प्रेम असतं. मी तेरा-चौदा वर्षांची असतांना मला एक छोटं कुत्रं श्री. नागनाथ खोटे यांनी दिलं होतं. आणि त्या कुत्र्यावर माझा इतका जीव जडला, की धाकट्या भावाचं सगळं करावं ना तसं मी त्याला वागवलं. अंघोळ काय घालायची, खायला मुद्दाम मटन द्यायची. आणि असं खट्याळ होतं तें कुत्रं, आजीच्या पानाची चंची तोंडांत धरून कुठं कुठं पळायचं. खूप मजा व्हायची मग. पण एक दिवस काय झालं कोणास ठाऊक, एकाएकीं आजारी पडून खेळ खलास ! तुला काय सांगूं बंडू, मला फार फार वाईट वाटलं. आजीला माझं रडणं पटायचं नाही. म्हणायची, अग कुत्रं गेलं म्हणून इतकं काय मनाला लावून घेतेस ? मोठ्यांचं मन कुत्रं, मूल, हा भेद कसं काय करतं कोणास ठाऊक. पण त्या वयांत मला तें इतकं जाणवलं,– आठ दिवस त्याची आठवण होऊन मी रडत होते. मला जेवणसुद्धा सुचेना. मोठीं माणसं घरांतलीं हंसायचीं. मला फार राग यायचा त्या वेळीं. म्हणून नंतर मी कांही पाळायचं नाही असं ठरवलं होतं. तें तुझ्या हट्टासाठीं परत पुन्हा कुत्रं घरांत आलं. तुम्हांला पाहिजे सर्व, पण त्यांचं करायला मात्र कांही नको. मुली असूनसुद्धा बापासारखं वागतां. लहान पिलूं घरांत हगलं की शी शी म्हणून बारा गांव पळ काढतां. मग तें सर्व आईनं निस्तरायचं. आम्हांला तशी घाण वगैरे लहानपणीं वाटत नव्हती. आणि घाण वाटतेय हें बोलून दाखविणं शक्यच नव्हतं. रागावतील ह्या भीतीनं आम्ही चूपचाप सर्व करीत होतों. तेव्हा आतासारखे नोकर चाकर थोडेच होते ? ज्यांनी करावं त्यांनी भरावं हा न्याय. त्यांत भर आमची आई. आतां असं वाटतं, लहानपणीं कांही कां असेना, चांगलं वळण लागलं होतं म्हणून निभावलों. प्रत्येक गोष्टीला शी शी म्हणून चालत नाही, बाई. भांवडांची शी धुवायला

कंटाळतां. पण पुढं स्वतःला मुलं झालीं की कसा आपोआप हात भिजतो. मग नाही येत त्याची किळस. याचा अर्थच असा, की जिथं आंतून माया असते तिथं घाण नाही नि कांही नाही. तिथं जिव्हाळा बोलतो. अग हजार वेळां आपला हात विळीवर कापतो. भळाभळा रक्त येतं. पण तेंच जर मुद्दाम कुणी चाकू घेऊन कापायला लागला तर आपण किती आरडा-ओरड करतों. स्वतःला मुलं झालीं की सर्व करायला निसर्गच शिकवतो. मुलाच्या प्रेमानं आपण इतके आंधळे होतों की ती घाण आहे हें आपल्या डोळ्यांना दिसतच नाही. इतकी ती पागल बनते. आणि बरं का बंदू. खरं तेव्हाच स्त्री अंतर्बाह्य बदलते. एकंदर तिच्या शरीरांत, मानसिक वागण्यांत आमूलाग्र बदल होतो. ती वयानं कितीहि लहान असली तरी एकदम खूपच मोठी होते. त्या बाळाला शिकवीत असतां ती त्या बाळाच्या बाळालाहि शिकविते ! याचं कारण एकच की, मी कुणी तरी मोठी झालेय, मला आतां सर्व समजतंय असं तिला वाटत असतं. आणि तें खरंहि आहे. निसर्गानं तिच्यावर केवढी जबाबदारी टाकली आहे. एकदां आईपण आलं की मग ती कुठल्याच व्यापांतून सुटत नाही. बिचारी जन्माची बांधली जाते. कांही वेळां, नवरासुद्धा मत्सर करील एवढा जीव ती त्या मुलांत ओतते. बिचारी खस्ता खाऊन त्यांना मोठं करते. जीवापाड त्यांच्यावर प्रेम करते. आणि जर का पुढं मुलं विचारीनाशीं झालीं तर त्यासारखं दुःख नाही ! पण त्या वेळीं तिच्या मनांत हा प्रश्न थोडाच असतो की आपला मुलगा वा मुलगी पुढं आपल्याला कसं वागवील हा ! तिला एकच माहीत असतं, प्रेमाचा वर्षाव. असं आहे बरं बंदू ! हं, आणखीन काय लिहिलंस ? माझी आठवण येते ना ? अग यायचीच. मला नाही का तुझी आठवण येत ? तूं अमेरिकेला गेलीस, तेव्हा सर्व मला म्हणाले, हां हां म्हणतां वर्ष जाईल म्हणून. वर्ष तर जाईलच. तें आपल्यासाठी थोडंच थांबणार ? पण तें हां हां म्हणतां जाईल का, हा प्रश्न आहे. त्याला घालविलं पाहिजे, नाही ? आणि तेंच चाललं आहे माझं ! सध्या असं वाटतं, मला खूप काम असावं. इकडे तिकडे भटकावं, म्हणजे वर्ष कसं पटकन जाईल. तशी मी दिवसभर कामांतच गुरफटलेली असते. परंतु रात्रीं मात्र, एकदां का डोक्यांत विचारमालिका सुरू झाली तर ती मात्र कुठं थांबवावी हें कळत नाही.

त्याला उपाय एकच. जर निद्रादेवीनं हळूच येऊन आईच्या मायेनं 'पुरे ग आतां तुझा विचार; मीट बरं डोळे आतां' असं म्हणून हळुवार हात फिरविला तर त्या तंद्रींतून आपण दुसऱ्या तंद्रींत म्हणजे निद्रादेवीच्या कुशींत शिरतों. हें असं चालायचंच. अग तूं माझ्याजवळ जास्त असायचीस ना? तेव्हा जास्त वाटतं. लहानपणीं तुम्ही नाही का, दिवसभर मैत्रिणींच्या-बरोबर खेळून खेळून दमलांत की मग आईची आठवण होत असे. झोपतांनाहि 'आई, तूंच ये' हाच जप. तीच गत आईचीहि. दिवस-भरांत पोरांवर चिडणं, एखाद वेळीं पाठींत धपाटा घालणं, हें सर्व चालूच असतं. पण एकदां का तीं चिमणीं बाळं कलकलाट करून स्वस्थ झोपी गेलीं की त्यांची अशी कींव येत असते बंदुशा. झोपलेल्या लहान पोरांचे ते निरागस चेहरे पाहिले की जर आपण दुपारी धपाटा घातला असेल तर त्या वेळीं अत्यंत वाईट वाटतं. असं वाटतं, 'अरेरे! किती गरीब चेहरा आहे. उगीचच आपण मारलं.' फार फार वाईट वाटतं ग. झोपल्यावर अत्यंत केविलवाणा चेहरा आमच्या पुंडूचा दिसतो. फार म्हणजे फारच गरीब. असं वाटतं, पटापट मुके घ्यावे पोराचे. पण सकाळ झाली की मुलांचे उपद्व्याप पुन्हा सुरू, तसेच आईचे त्यांच्यावर संतापायचे व्यवहार सुरू! असं हें जीवनाचं रहाटगाडगं चालू असतं बंदू! आम्ही-सुद्धा लहानपणीं फार खोड्या केल्या, आणि यथेच्छ मारहि खाल्लाय बघ. पण तुम्हांला खोड्या करूं नका– हा उपदेश करतांना मात्र आम्ही आमच्या लहानपणचं सर्व विसरतों! बरं बंदू, आतां बरीच रात्र झालीय; हळूहळू डोळे जड व्हायला लागलेत बघ. आमची इथं रात्र तर तुझा तिथं दिवस! तूं लागली असशील आपल्या उद्योगाला. उत्तर पाठव हं.

तुझी
आई

ता. क.

पापा सर्व हकीकत लिहितात म्हणून बाकीचं कांही मी लिहीत नाही. सर्व मजेंत आहेत.

तुझी
आई

० ० ०

: ३ :

पुणें,
२३-९-१९६३

प्रिय बंदुशा,

बरेच आहेत की तुझे अमेरिकन डॅडी. विनोदी स्वभावाचा माणूस खरंच स्वतःला आणि दुसऱ्याला नेहमी आनंद देत असतो, नाही ? असे मजेनं हंसत खेळत दिवस काढणारे लोकच सुखी असतात. आणि तेंच खरं जीवन ! नाही तर खूप संपत्ति असूनहि त्याचा कांही उपयोग नाही. सदोदित एरंडेल प्याल्यासारखा चेहरा; सदा कपाळाला आठ्या चढलेल्या. स्वतःहि कष्टी आणि त्याला पाहून दुसऱ्याचाहि उत्साह मावळून जातो. आणि तोहि बिचारा कष्टी बनतो. तुला एक सांगते बंदुशा, अग, आपलीं दुःखं आपल्याजवळ, तीं चव्हाट्यावर कधीच मांडूं नयेत. सतत आपल्या-बद्दल दुसऱ्याला सांगून आपल्याबद्दल दया, सहानुभूती कधीच निर्माण करूं नये. त्याची मला फार चीड येते. ती बाई ना, बिचारी सर्वांचं करते, पण तिला म्हणून त्या घरांत सुख नाही. सुख नाही हें तिनंच पदोपदीं सांगितलेलं असतं. नको तें सहन करीत बसायचं आणि रडत दुसऱ्याला सांगत बसायचं. अशानं बाकी घरांतील मंडळी वाईट ठरतात. आणि मग लोकांचं मात्र मत असं होतं की, ही चांगली व बाकी सगळे वाईट. बाकी म्हणा, व्यक्ति तितक्या प्रकृति. होय ना ? तुला आतां निरनिराळे लोक भेटले असतील. त्यांचे स्वभाव, प्रत्येकाचं वागणं हें सर्व टिपून घे बरं का. बारीक नजरेनं बघ, आयुष्यांत त्याचा फार उपयोग होतो. अग निरीक्षण

पाहिजे. असो, तुला आतां तुझ्या खोलींत एकटंच झोपावं लागतं ना? इथं मारे आईला सोडत नव्हतीस. मात्र झोपेंत तूं दचकून उठतेस हें वाचून मला खूपच वाईट वाटलं. त्या लोकांची पद्धतच ती. अगदी एक-दोन महिन्यांपासूनच मुलांना ते स्वतंत्र अगदीं वेगळं झोपवतात. आमच्या-कडून तें तसलं कांही होणार नाही. परंतु एक मात्र खरं, लहानपणापासून मुलांना वळण लावण्याची त्यांची पद्धत छान असते. गेल्या आठवड्यांत सिलव्हियाचं पत्र आलं होतं, की नीलला आम्ही स्वतंत्र खोलींत झोपवतो, व सकाळीं पांच वाजतां दादा व तुझी वहिनी त्याच्या खोलींत जाऊन त्याला घेतात. हें मी जेव्हा वाचलं तेव्हा मला वाईट वाटलं. तीन महिन्यांच्या त्या पोराला एकटंच झोपवणं ही कल्पनाच मला सहन होईना. मी किशोरला हें लिहिल्यावर त्यानं पत्रांतील उत्तरांत लिहिलं होतं की, वेगळं झोपल्यापासून तो शान्त झोपतो म्हणे. आहे की नाही? सर्व कांही संवयीवर आहे बघ. याच नीलच्या बापाला म्हणजे तुझ्या दादाला काय संवय होती माहीत आहे? आईच्या तोंडावर हात ठेवून झोपायची. एखादे वेळीं झोपेंत चुकून माझ्या तोंडाऐवजी पापांचं तोंड लागलं तर म्हणायचा, 'तुझं तोंड चांगलं नाही, खरखरीत आहे' झोपेंतसुद्धा त्याला माझं मऊ तोंड हवं असायचं! तसंच लहानपणीं, केंस विंचरतांना कुणी आलं तर आपण पटकन केस गुंडाळून अंबाडा घालतों ना, तसा जर मी घातला, तर ही स्वारी ओरडून रडून मला म्हणायची, 'आई, गोंडा सोड. चांगला नाही दिसत.' म्हणजे बघ, त्या दोन वर्षांच्या मुलाला-सुद्धा, त्याच्या आईनं चांगलं दिसायला हवं होतं! लहानपणीं तो शान्त होता. परंतु वेगळं झोपवा मुलाला— ही साहेबी संवय लावायला मला कांही जमलं नसतं बघ. आपल्या मुलांना आईच्या कुशींत झोपायची संवय असते. जवळ आई नसेल तर मुलं स्वस्थ झोपतच नाहीत. नील मोठा झाला की दुसऱ्या खोलीत झोपायला घाबरणार नाही. कारण ती त्याला संवयच झालीय. नाही तर तूं. कुठं पालच येईल, तर कुठं झुरळ येईल, म्हणून तुला भीती वाटायची. आतां पाल पाहिली की तुझी आठवण येते, आणि आतां बंदुशा कशी उडाली असती म्हणून मला मग खूप हसूं येतं! असो.

तुझ्या अमेरिकन डॅडीनं काय भाजी लावली आहे ग बागेंत? मोठ्या म्हणजे भोपळ्या मिरच्या लावल्या आहेत का? त्यांना आपल्या तऱ्हेनं भर्जी करून घाल, म्हणजे चांगले नाचतील तीं भर्जी खाल्ल्यावर! तूं नेलेले पापड त्यांना आवडले का? लोणचं तर खूप तिखट होतं. तें त्यांना खायला कांही जमेल असं मला तरी वाटत नाही. बाकी तुझ्या माझ्या मतें जेवणांत तिखट नसेल तर तें जेवणच नव्हे! मारे आभाळ भरून यावं, काळे कुट्ट ढग दिसावेत, अन् वाटावं, काय मस्त पाऊस पडणार,– पण हळूहळू आपल्याला न कळत काळा पडदा दूर सारून पांढरं स्वच्छ वस्त्र समोर यावं तसं तें अळणी जेवण बेचव वाटतं. त्यांत मासळीचं झणझणीत जेवण नसेल तर आपल्याला नाही चालत बिलकूल तें जेवण. तुझे मात्र त्या बाबतींत हाल होणार. नेलेलं लोणचं पुरवून खा हं! इथं कांही चमचमीत जेवण केलं की तुझी आठवण येते. क्षणभर घास रेंगाळतो. कैऱ्या, पेरू, चिंचा, करवंद,– आपलं हें छोटं छोटं खाणं पण कसं मस्त असतं, नाही? तूं येशीलच पुढच्या वर्षी, मग आहेच.

आतां इथली हकीकत म्हणजे, "तो मी नव्हेच" हें नाटक जोरांत चालू आहे. बरींच वर्षं सासूचा छळ सोसावा व नंतर यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणं सासूनं सुनेचे लाड करावेत.– तसं सुख या नाटकानं मला द्यायचं ठरवलं आहे असं दिसतंय. त्याचबरोबर डोक्याला चिक्कार त्रास पण द्यायचा ठरवला आहे. कोर्ट कचेरी म्हणजे डोक्याला त्रासच, नाही का? काम करणारीं दोन पात्रं मेलीं काय, जिवंत असलेल्यांनी त्या मेलेल्या माणसांपेक्षा जास्त संतापायचं ठरवलं आहे बघ! कांही विचारूं नकोस. हें चालायचंच. पण बंदुशा, एक ध्यानांत ठेव, ही नाटक कंपनी आहे. इथं फार लवकर डोकीं फिरत असतात. त्यांत कंपनीला फायदा झाला की जास्त फिरतात. अशिक्षित असो वा सुशिक्षित असो, अशा वेळीं एकाच चालीनं चालतात हे लोक. काय हेवादावा करतात! सांगेन तुला सावकाश. माझा अनुभव खूप मोठा आहे. नाही म्हटलं तरी २२ वर्षं सतत काम करतेय! दोन तपं व्हायला अजून दोन वर्षं आहेत. तेवढीं पुरीं होतील म्हणा. परमेश्वराची मर्जी!

तुझी मैत्रीण नंदा नेहमी येते. बाकी कुणी तोंड दाखवत नाहीत बघ. मोठी मंडळी तुझी चौकशी करतात; आणि तुझे गुण माझ्याजवळ गायला लागले म्हणजे चंदनाच्या पाण्याचा फवारा सतत आपल्यावर कुणी उडवला तर किती प्रसन्न आणि बरं वाटतं तसं होतं बघ ! ' लोग कहते हैं, तुम्हारी बेटी बडी अच्छी है ! " आहेच मुळीं. आणि मी म्हणते, ' कां असणार नाही ? ' मस जर कुणी विचारलं की, ' तूस राज्य देतों, इंद्र-दरबारीं ठेवतों. पण फक्त तूंस वंदना देत नाही.' तर मी म्हणलं असतं, ' अरे बेट्या, तें सर्व तूंच घे, आणि फक्त वंदना दे.' काय समजलीस ? हं !

तूं हंसायला लागलीस म्हणून मलाहि आवरत नाही. अग लिहितांना एकटीच हंसत बसले तर कुणी म्हणेल डोकं शाबूत आहे ना ? आणि तें तर शाबूत ठेवायलाच हवं. बेबड्या, आतां पुरं करते हं. पुढील पत्र मोटं लिहिण्यांत येईल. जसा ठकीसह तिंबूनाना, तसं गमतीसह पत्र.

तुला गोड पापा. तुझ्या डॅडी व ममीला नमस्कार सांग.

तुझीच
आई

: ४ :

पुणें,
१२-१२-१९६३

प्रिय बंडुशा,

वा ग तूं ! मला मात्र लौकर पत्र पाठव म्हणून लिहितेस, आणि आपण उशीर करतेस ती ! अग, आम्हांला तूं लांब असल्यामुळं तुझी काळजी लागते, आम्ही काय आपलीं घरींचें आहोंत.

सर्व खुशाल. तूं मजेंत आहेस हें वाचून फार बरं वाटलं. एक तिथली वहीण ' मूडी ' ( लहरी ) आहे का ! अग प्रत्येकाचे स्वभाव वेगळे. आपल्या घरांत म्हणजे आम्ही लहान असतांना मूडी वगैरे कुणी नव्हतं. सगळ्या बडबड्या. नाही म्हणायला कुसुममावशी मात्र खूपच कमी बोलायची;– म्हणजे अबोलच. त्याच्या उलट माँ, म्हणजे अवतार होता. अर्थात् साध्या-सुधा नाही हं, चंडिकेचा ! आमच्या लहानपणीं आम्हांला घरीं ( गोव्याला ) ठेवून आई वगैरे सर्व मंडळी माणिकनगरला गेली. मी ' मा ' व विठामावशी. एक स्वैंपाक करून घालायला व आमच्यावर देखरेख करायला बाई ठेवली होती. तीहि जगदंबाच होती. तेव्हा जो ' मा 'नं आमचा निकाल लावला आहे– ! अग तापट इतकी होती की आम्ही तिला भयंकर घाबरत असूं. आम्हां दोघींना ती पिटायची. आम्ही मोठ्या–पण हा भेदभाव तिच्यांत नव्हता. मोठ्या असल्या तर आपल्या घरच्या, असं तिला वाटत असावं. आणि कांही झालं की, लगेच चूलसुद्धा दुसरी मांडायची. एकदां काय झालं, त्या बाईशीं भांडली आणि स्वतः स्वैंपाक करणार म्हणून चूल पेटवली

आणि भात ठेवला. आधी तांदूळ पातेलेंभर घेतले, आणि तें पातेलें चुलीवर ठेवलं. कसा भात होणार ग ! ते तांदूळच राहिले. शिजायला त्याला त्या भांड्यांत वावच नव्हता; आणि तोंडानं सतत बडबड चालू असायची. विचारायची सोय नाही. ती बाई पण आम्हांला ग्रेट भेटली होती. एकच कुठल्या तरी पाल्याची भाजी. ( खाण्याचा पाला गोव्याला मुबलक असतो. ) तिन्ही जेवणाला तीच. ती भडकायची. तीन जेवणं म्हणजे पेज जेवत होतों. मी व विठामावशी घाबरून त्या बाईला कांही बोलत नव्हतों. पण ही ! हिटलरचा जर्मनींत कसा दरारा होता तसा तिचा आमच्यावर दरारा होता. एकदां तर आईवर चिडून बोचकं बांधून घरांतून गेली होती. बाकी शूरपणा खूप होता बरं का वंदुशा ! पण रात्र पडली की हा हिटलर भित्रा. मग हळूच घरांत शिरायचं. एकदां तर ती झोपली होती, आणि तिच्या छातीवर साप झोपला होता. ती वळवळ कां करते म्हणून आईनं पांघरूण दूर केलं तर तें दृश्य पाहून किंकाळी फोडली आईनं ! अशा खूप गमती आहेत तिच्या. अजूनसुद्धा ती तापते लवकर. गीझरसारखी ! वेळ लागत नाही. तिच्याइतकी तापट घरांत कुणीच नाही. संतापली की आई तिच्या डोक्यावर घागर ओतायची. मग ती थंड होत असे. तुझे खूप लाड केले लहानपणी हं तिनं. माझ्यापेक्षा तिच्याजवळच जास्त असायचीस. आणि दागिने कुणी केले विचारलं तर ' माँ 'नं म्हणून सांगायची. फ्रॉक कुणी शिवले तर कुसुममावशीनं ! कारण दोन्ही मुंबईहून येत असत ना. तिला तू आत्तां हें पाहिजे, तें पाहिजे म्हणून सतावीत होतीस. पण तुझे खूप लाड केले ह तिनं. तशी ती प्रेमळ आहे ग, पण स्वभाव तापट. बरं बाय, मजेंत रहा हं. काय पाठवूं तें लिही. घरांत सर्व मंडळी ठीक. पत्र लौकर पाठव. आमचा अंत पाहूं नका.

तुझी
आई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व
अनुक्रम ४३९४८ वि: अन्यवास
क्रमांक ३३३ नोंद दि. ४।३।७९

: ५ :

पुणें,
७-१-१९६४

प्रिय वंदु,

कमाल केलीस हं तूं ! अग म्हणतेस काय? आपल्या हिंदु धर्मावर १॥ तास बोललीस. वा रे पठ्ठे ! खरं सांगूं वंदुशा, करायचं ठरवलं की जमतं, असं माझं मत झालं आहे. आधी फार भीति वाटते. माझ्यावर सर्व लादावं तेव्हा मी करते. तोंपर्यंत मला तें जमणार नाही असंच वाटतं. तुला आवडतं ना. फॉइल क्लबमध्ये माझं 'न पडलेलीं स्वप्नं' हें भाषण अगदी मी नको नको म्हणत असतांना ठेवलं. सेक्रेटरींनी चांगली महिनाभर आधी नोटीस दिली होती. मी लिहून आणून वाचीन, मला तसं बोलतां येणार नाही. कारण भाषणाची संवय नाही. त्याप्रमाणं मी दोन पानं लिहिलीं, म्हणजे सुरुवात केली. तेव्हा तात्या (वासुदेवराव भोळे) इथं होते. त्यांना भीत भीत सुरुवात कशी झाली आहे तें पहा म्हणून सांगितलं तेव्हा ते म्हणाले, "फार छान झाली आहे. पुढं लिही." पण तुला काय सांगूं वंदुशा, अग कांही म्हणजे कांही सुचेना. माझ्याचबद्दल लिहायचं असूनसुद्धा मला कांही जमेना. त्या वेळीं घरांत सर्व अडचण. वहिनी बाळंतीण, पाण्याचे हाल तर इतके– विचारूं नकोस. माझं डोकं पिकायचं. त्यांतून दुसरं पीक कसं बाहेर पडणार ! १५ ऑगस्टला संध्याकाळीं ६॥ ला भाषण, आणि पहाटेपर्यंत मी कांही लिहिलं नव्हतं. कधी लिहायची विशेष संवय नव्हती,– कसं जमणार ? १४ तारखेला रात्रीं पुरं लिहायचं ठरवलं,

पण थकल्यामुळं झोंप आली, आणि खरंच झोपले. पहांटे ४ ला उठले, तेव्हा सर्वच घरांतली मंडळी झोपली होती. चार ते सहा भाषण लिहून काढलं. त्याची फेअर कॉपी करायलासुद्धा वेळ मिळाला नाही. मी पुढं काय लिहिलं आहे हें माझ्याशिवाय कुणालाच माहीत नव्हतं. कारण वाचून दाखवायला मला वेळ नव्हता, आणि त्यांना मी लिहिलेलं दिलं असतं तर माझं अक्षर त्यांना लागणं म्हणजे,– काय सांगूं तुला? अक्षर हें दुसऱ्याला आपल्या मनांतले भाव समजावे म्हणून निर्माण झालं, पण तें मला मान्य नाही. इतकं तें सुंदर! तुला कल्पना आहेच. जिथं ऱ्हस्व पाहिजे तिथं मी न चुकतां दीर्घ लिहिते. लेखन सोपं आहे, पण शुद्ध नांव कां दिलं ग! या सर्व कटकटी नसत्या तर आज मी B. A., M. A., Ph. D. झाले नसते का? जाऊं दे झालं! तर काय सांगत होते, भाषण! घाईत लिहिल्या-मुळं इथं एक ओळ, तर बाण मारून त्या टोकाला दुसरी. बाण ठीक जमला म्हणून बरं, नाही तर भलताच कुठं उडाला असता म्हणजे हत्या (शाब्दिक अर्थांत) झाली असती, नाही! पण काय बंदू! कसं भाषण झालं त्या दिवशीं? मला कल्पना नव्हती इतकं चांगलं रंगेल ह्याची. हंशा आणि टाळ्या मिळाल्यामुळं मीच बोलते आहे की दुसरं कुणी याचा मला भ्रम पडला. तेव्हापासून ठरवलं की, येत नाही ही झूट बात आहे. सर्व येतं. केलं पाहिजे. त्यानंतर दोन वेळां अशींच छोटीं छोटीं भाषणं केलीं. तींहि फार चांगलीं ठरलीं. तेव्हा आतां मी ठरवलं आहे, येत नाही असं म्हणायचं नाही. प्रयत्न! अग, नाटकांत काम केलं, तें तरी मला जमेल असं कुठं वाटलं होतं. लहानपणीं गोव्याला वेणुनाद नाटक बसवलं होतं. त्यांत मी कृष्णाची भूमिका केली होती. त्यांत गाणीं होतीं; तीं म्हणे मी खूपच छान म्हटलीं होतीं. आमच्या देवळांतल्या पुजाऱ्याच्या बायकोनं घरीं येऊन माझी दृष्ट काढली होती. मला जेवायला घातलं होतं. गेली बिचारी ती. लहानपणींच्या अशा कित्येक गोड आठवणी झाल्या की तो काळ पुन्हा यावा असं मला वाटतं. जरी दिवसभर बोलणीं खावीं लागत होतीं तरी त्यांत गोडी असायची. हे पावसाळी दिवस, बंदू. धो धो पाऊस. घरांत आईसमोर बसून पोथी-वाचन चालायचं. सीता वनवासाला निघाली की आम्ही रडूं लागायचे. त्याच स्थितींत ती वाचली जात असे. काय सांगायचं

तुला ? खेड्यांतल्या जीवनाला एक प्रकारची गोडी असते. खेळणं, भांडणं हें तर सारखं चालायचं. आतां मोठे झालों. सर्वच दृष्टीनं मोठेपण आलं. आतां मागं वळून पाहिलं तर असं वाटतं, बराच काल फुकट गेला. म्हणूनच तुम्हांला सांगायचं की, वेळेचं महत्त्व फार आहे. वेळ गेली की ती गेलीच. पुन्हा पुढली घडी,– मागील नाही. आतां तूं तिथं खूपच रमली आहेस. बरोबरच आहे. मैत्रिणी, घरांतली मंडळी संवयीची झाली की पुष्कळच बरं वाटतं. बाकी खूप हिंडावं. मजा असते. नाना तऱ्हेचीं माणसं भेटतात. कांही ठिकाणीं तेवढ्या वेळांत तीं अगदी आपल्या घरांतल्यापैकी वाटतात. त्या बाबतींत माझं मोठं भाग्य आहे बरं का बंदू. कुठंहि मी गेले तरी मला इतकं चांगलं वागवलं जातं. खूप खूप प्रेम करतात माझ्यावर. कांही वेळां आपण अगदी दबून जातों त्या प्रेमानं, नाही ? पहिली गोष्ट, आपलं वागणं चांगलं असावं बंदुशा. मग दुसरं आपल्याला चांगली वागणूक देणार नाही असं होत नाही. पत्र बरंच मोठं झालं ग ! वाचशील ना ? नाही तर म्हणशील काय आई तूं पत्र लिहतेस ? नाही ग बाई. आमची ( बंधना ) वंदना आपल्या आईला असं कधी नाही म्हणायची. बरं, आम्ही सर्व खुशाल. चिल्ली–पिल्ली सर्व ठीक. पुंडू आत्तेची फार आठवण करतो. दादाचं आणि गोऱ्या वहिनीचं पत्र आलं होतं. नील म्हणे आतां फार दंगा करतो. फोटो पाठवलेत. काय– काय गोड आहे ग ! काय मजा पहा, अजून सुनेला आणि नातवाला पाहण्याचा योग येत नाही. इतकी आठवण होते, पण फार दूरचा प्रवास पडला ग. पाहू या केव्हा सुनेचा मुखचंद्रमा ही ज्योत्स्ना पाहते तें. हं, पत्र पाठवा बरं ! तुला गोड गोड पापा.

तुझी

आई

० ० ०

: ६ :

पुणें,

दिवाळी - पाडवा,

ता. १८-१०-१९६३

प्रिय बंदुशा — तुला गोड गोड पापा.

तुला कंटाळा आला की तूं मला नेहमी म्हणायचीस, ' आई, तुमच्या लहानपणींच्या गोष्टी सांग ना ' म्हणून ! कांही वेळां मी तुला सांगितल्याहि आहेत. पण खरं सांगूं, आता सर्व आठवत नाही ग. नाही तर लहानपणीं काय कमी गमतीच्या गोष्टी घडतात ! पण शक्य तों मी आठवून तुला पत्रांतून कळवीन. मागच्या पत्रांत लिहिलंस ना ? की अशा गमती मला कळविल्यास मी आपल्याच सर्व मंडळींत आहे असं मला वाटेल म्हणून !

मी प्रयत्न करते हं बंदुशा.

अग आमचा जन्म झाला खेड्यांत. तिथंच कांही वर्षं काढलीं. २५ घरांचं गांव. महालक्ष्मीचं देऊळ हें मुख्य. त्याच्या आसपास हीं एवढीं घरं; त्यांत देवळांतले पुजारी व बाकी इतर मंडळी. हीं एवढीं घरं देवळाच्या आवारांत. देवळाच्या खालच्या भागाला इतर वस्ती, मिळून ५०—७५ घरं. एवढं हें लहानसं खेडं. त्याचं नांव बांदोडा. खेड्यांतली मजा म्हणजे मुलं एकत्र जमून कच्चे पेरू, कैऱ्या चोरून खाणं. आणि त्याचा कांही गवगवा झाला की आईकडून मार खाणं. यामुळं आमच्या तब्बेती छान रहायच्या. मला वाटतं, कच्चा माल खात असल्यामुळं व्हिटॅमिन्स ( हल्लीच्या

भाषेंत ) भरपूर पोटांत जात होती. दिवसभर बाहेरच हुदडायचं, त्यामुळं 'धूळ 'हि भरपूर पोटांत जायची. पण बाई कधी घसा सुजला आहे, टॉन्सिल्स सुजले आहेत हे प्रकार माहीत नव्हते. आतां तूंच पहा ना, जरा मला चोरून तूं चिंचा खाल्ल्यास की लगेच तुझा घसाच मला सांगतो की, 'हं, बंदुशानं चिंचा खाल्ल्या.' पण लहानपणीं आम्ही प्रामाणिक,– तितक्याच पेरू, कच्च्या कैऱ्या प्रामाणिक. आमची कागाळी त्यांनी कधीच केली नाही. खरं म्हणजे त्यांना तक्रार करायला भरपूर अधिकार. कुणी रागावलं की नाही का म्हणत, 'तुला कच्चा खाईन' म्हणून ! तसंच आम्ही त्यांना खाल्लेलं असतं. पण अं हं, कधी तक्रार नाही. कच्चा खा नाहि तर भाजून खा. त्यांचं म्हणणं, कुठल्याहि स्थितींत शेवटीं आम्हांला खाणारच, तर कच्चा काय आणि पिकलेला काय ? त्यांना काय त्यांचं सुख-दुःख– नाही का ? ही मजा तुम्ही केली का ग ? खेड्यांतील मजा शहरांत नाही बंदुशा. पण एकदां तूं सांगितलेलं आठवतं मला, की तुम्ही कुठल्या तरी बागेंत शिरलांत, तूं झाडावर चढलीस, आणि माळी आला. आणि ज्या तुम्ही घाबरलांत,– होय ना ? तूं पण ती गंमत चाखली आहेस म्हणायचीस. आंबे कितीहि पैसे देऊन विकत घेतले तरी झाडावरून पडलेल्या पाडांची त्याला चव पण नाही, आणि ती गोडी पण नाही. आपल्याला मिळाला की छातीशी धरून घरभर फिरायचं. तिच्या मागं मागं सर्व भावंडांनी– मला दे, मला दे म्हणून नाचायचं, तितका मिळालेल्या माणसानं तो आंबा कापायला वेळ करायचा. एक आंबा– पण ती मजा डझन आंबे कापूनसुद्धा नाही येत, बंदुशा. तें लहान वय, ती क्षुल्लक कारणांसाठी भांडणं. पुन्हा पांच मिनिटांत एक व्हायचं. सर्वच और. बराच वेळ झाला तरी आंबा कापला जात नाही हें पाहिल्यावर शेवटीं लहान भावंडं रडायला सुरुवात करायचीं. मग त्यांना दमदाटी करायची. बघा हं रडलां तर, मी तुकडा देणार नाही.— थांबलांत तर बाठा देईन. मग बिचारीं खुष. कधी चुकून एकेक आंबा जर आम्हांला दिला गेला तर काय हर्ष व्हायचा ! मग सगळ्यांनी मिळून बाठा चोखायची, शर्यत लावायची की कोण पांढरा शुभ्र करतो पाहूं या. बसल्या आपल्या दोन तास चोखत. जेव्हा आईचं लक्ष जावं तेव्हा एकेक धपाटा मिळायचा,

आणि त्या कोयी फेकल्या जायच्या. नाही तर कुणी ठरवायचं, कोय कुणाची पांढरी झाली म्हणून ? एखादे वेळीं दिवसभर चोखून डोळे मात्र पांढरे व्हायची वेळ यायची. तुला माहीतच आहे बंदू, आम्ही होतों चौदा भावंडं ! आता आम्ही आठ बहिणी आणि दोन भाऊ आहोंत. असं वाटतं, ' कसं ग केलं असेल आमच्या आईनं ? ललेमावशी आहे ना ती चौदावी, आई तिला चौदावं रत्न म्हणायची ! आणि पाळणा हालायचा तो प्रत्येक १॥ वर्षाला. देवा रे, आतां माझ्या अंगावर काटा येतो ! बाळंतपण म्हणजे हातचा मळ जसा कांही. नशीबानं माझ्या आईच्या लहानपणीं आमच्या घरांत एक बाई होती, ती म्हणजे जवळ जवळ घरांतलीच झाली होती. आई तिला आपल्या आईप्रमाणं मानीत होती. आम्ही आजीप्रमाणं मानूं. तिनं मात्र खूप खस्ता खाल्ल्या. आईशीं भांडल्याशिवाय एक दिवस तिचा जात नसे. पण अत्यंत प्रेमळ. चिडली की सणावारी घरांतून निघून जायची. आमची आई शीघ्रकोपी, पण तिनं कांहीहि केलं तरी तिच्या बाबतींत तिनं कधीं वेडावाकडा शब्द तोंडांतून काढला नाही. खूप मानायची तिला. म्हणायची, येईल चार दिवसांनी. तिला या घराशिवाय कुठंच चैन पडणार नाही. आणि खरंच तसं व्हायचं. आमची आई,– तूंच विचार कर बंदुशा, इतक्या मुलांचं तिनं कसं केलं असेल ? अग दिवाळी आली की आठ मुलींना अंघोळ घालायची म्हणजे काय थट्टा आहे ? तुला एकटीला अंघोळ घातली तर मी थकून जायची. आणि बरं का, आम्हा सर्व भावंडांना इतके विपुल केस होते,– ते घासून धुवायची. अर्थात् आईचे हात दुखले की तोंडांतून आम्हांला भरपूर मिळत असे हें सांगणं नलगे. पण त्याला कांही इलाज नव्हता. सुरुवातीला दोघी चांगल्या सुटायच्या; नंतर अंघोळीला बसेल त्यांचे हाल. मग आजी, म्हणजे सावित्री चिडायची. ' तुला अंघोळी घालायच्या असल्या तर मुकाट्यानं घाल. आज त्यांना उगीच वाईट वाईट बोलूं नकोस. नाही तर मी आपली घालीन.' ' घाल ' म्हणून आई अंघोळीला बसलेल्या मुलीला तशीच टाकून चालती व्हायची, नि थंडीनं बाहेर कुडकुडत सावित्रीला हांका मारायची. तिथं कांही बाथरूम वगैरे कांही नव्हतं. ' मान्ने ' म्हणजे उघडी मोरी. केस तर इतके सुंदर होते सगळ्यांचे. आतां तुम्ही केस गळतील म्हणून अमुक तेल लाव, शिकेकाई घाला, काय काय

चाललेलं असतं. आम्हांला अंगाला लावायचा साबण काय तो माहीत नव्हता. डाळीचं पीठ किंवा कपड्याचा साबण! बस्स. धुळींत दिवसभर खेळत असल्यामुळं केसांत खूप धूळ जायची. अंघोळ घालतांना इथं जोर-जोरांत कपडयाच्या साबणानं केस धूत असतांना तोंडहि जोरांत चालू असायचं. जर कपडयाच्या साबणानं केस निघाले नाहीत तर आई चक्क पापडखार घालायची. तरी केसांनी कधी तक्रार केली नाही. आम्ही काय तक्रार करणार होतों म्हणा. आमची बिशाद थोडीच. केस विंचरायला बसली की आमच्या पोटांत गोळा उभा रहायचा. आधीच धुतलेल्या केसांना गुंता जास्त होतो, त्यांत आई बसली की– या क्षणींदेखील मी दचकते. आई जी फणी फिरवायची ती एकदम खाली टोकाला आली की– 'हाऽय, आई गऽ–' करून आम्ही रडत असूं. अशा स्थितींत ती वेणी व्हायची. पहिलीं कुणी बसली आणि तिची अवस्था पाहिली की बाकी शेजारींपाजारीं जाऊन केस विंचरून घेत असत. एवढं मात्र खरं, डोक्यांत घाण, उवा झालेल्या आईला खपत नसत. कितीहि त्रास पडो, पण आम्हांला ती स्वच्छ ठेवायची. आणि चिडून म्हणायची, 'कारट्या जन्माला आल्या त्या आल्यात, आणि खंडीभर केसहि बरोबर घेऊन आल्या मला छळायला!' आतां आम्हांला मोठे केस होते हा काय आमचा दोष! केस इतके लांब होते बंदू, अतिशयोक्ति नाही, गुडघ्याच्या खाली लोंबत असत. तिला बसून न्हाता येत नव्हतं, किंवा केस विंचरतां येत नव्हते. तिचेच केस आम्हाला आले. एकंदरींत सर्वांचं करून थकायची. त्यामुळं तोंड,– गंगा जशी पटकन कुठंहि उद्भवते तसं तिचं तोंड कुठंहि भरकटायचं. खरंच बंदू, आईचं सौंदर्य कांही वेगळंच होतं. फार गोड दिसायची. नऊ वारी पातळ, मोठं कुंकू, मोत्याचीं कुडीं, चोळी, केसाचा साधा अंबाडा– हा तिचा वेष. पण काय सांगूं, सगळ्या बायकांत आई आली की बाकी निस्तेज वाटायच्या. एक प्रकारचं तेज होतं तिच्या तोंडावर. तिचं सौंदर्य आम्हांला असतं तर! जाऊं द्या झालं. तर काय! केसाला धरून स्वर्गाला जायचा विचार दिसतो माझा! आईला घर आणि देऊळ ह्याखेरीज दुसरं सुचतच नसे. देवळांत जाऊन काय काय करण्याची विलक्षण हौस. देवळांत उत्सव असला की, मग घरांत जेवणाकडेसुद्धा लक्ष

नसे. पेज तर पेज, नाही तर भात उकडून ठेवायचा आणि एक पातळ पदार्थ ठेवायचा; तोंडी लावायला पापड किंवा कैरी. अमुकच दे हा हट्ट करण्याची ताकद कुणांतच नव्हती.

आम्हांला आईनं कितीहि बदडलं तरी थोड्या वेळानं ' आई ' म्हणून हाका मारायला आम्ही तयार. आमच्या मनांत कांही रहात नसे. दिवसभर खेळ खेळ खेळायचं आणि संध्याकाळ झाली की झोपायचं. जर जेवण लौकर मिळालं नाही तर उपाशी झोपलेल्या मुलांना आईनं कधीच उठवलं नाही म्हणायची, तेवढीच पोटाला विश्रान्ति. सकाळी उठल्यावर मात्र कॉफी आणि उंडो (पाव) नसला तर रोट्या (म्हणजे फुलके) करून द्यायची. खाण्यांत अमुक पाहिजे हा हट्ट कधीच नसे. हट्ट काय करणार? तिथं होतं काय? पसरो म्हणजे लहानसं दुकान, तें हॉटेलवजा असायचं. कारण तिथं चहा मिळायचा. कांही आणायचं झालं की आम्ही रमत गमत जायचं. घरात जिन्नस लौकर पाहिजे असायचा, आणि आम्ही सावकाश आलों तर आमची भरलीच म्हणून समजावं. एकदां ना बंदुशा, मला आईनं दुकानांतून हिंग आणायला सांगितला. दुकानदारानं हिंग एका द्रोणामध्ये दिला; तो थोडासा पातळ होता. मला लहानपणीं हिंगाचा वास खूप आवडत असे, त्यामुळं मी तो द्रोण नाकाला लावून घरापर्यंत आले. जवळ जवळ सात आठ मिनिटं तो माझ्या नाकाजवळ राहिला. घरीं आलों तर नाक लालबुंद झालेलं. जी आग व्हायला लागली,— ! आई म्हणाली, ' तरी बरं, आवडला म्हणून वासच घेत राहिलीस. खाल्ला नाहीस हें माझं नशीब.' आमच्या घरापासून मैलभर लांब शाळा. आम्ही सावकाश निवत असूं. घरून आधी उशीर करायचा, आणि जातां जातां चिंचा खा, पेरू खा, जे खाण्याचे पदार्थ अर्थात् फळं रस्त्यांत दिसतील ते सोडायचे नाहीत. मास्तर तरी काय! एखादे वेळी आम्ही लौकर पोंचलों तरी त्यांचा पत्ता नसायचा. आले की म्हणायचे, काढा रे पोरांनो पाढे. तोंपर्यंत बाहेर बाजारवाली (मासळीवाली) आली तर त्यांचा सौदा व्हायचा. ' ए दल्या (बाईचं नांव) अगो, सुंगटां कशी दिली गो! कित्यें ही ' रुबा 'क? (रुब म्हणजे दोन पैसे). पीशें लागलां है गो तुकां!' म्हणजे आमच्या लहानपणी दोन पैशांची मासळी आमटीसाठी पुरत असे.

इतके स्वस्ताईचे ते दिवस. आतां दोन पैशांचं काय येतं,—मीठसुद्धा नाही. नि मासळी खरेदी केली की आमच्याचबरोबर ती घरीं पाठवायची. पुन्हा हे पाढे किती काढले म्हणून विचारायचे. तास– दोन तास शाळा भरली की 'चला रे पोरांनो–' म्हणून पुन्हा घर. दहा– साडेदहाला देवळांतला चौघडा सुरू होतो. त्या वेळी आम्ही पुन्हा तोच कार्यक्रम करीत घरीं येत असूं. मध्ये एकमेकांशी मारामारी हे प्रकार चालायचेच. फार वर्षं आम्ही तेथल्या शाळेंत गेलोंच नाही, म्हणा. पण काय ग त्या वेळचीं चिडखोर माणसं. मास्तर म्हणजे एक महाभयंकर चिडका प्राणी अशीच आठवण आहे. त्यांना मुलांना समजावून देणं हें माहितच नसावं. फक्त मार. मुलांना फोडून काढण्यांत त्यांना जितका आनंद तितका आनंद घरीं जाऊन मासळीच्या आमटीबरोबर जेवणांतसुद्धा होत नसावा.

लहानपणचं तें जीवन अजून डोळ्यांसमोर तरंगतंय ग. आमचं घर अगदी देवळाच्या खालच्या बाजूला आहे. अगदी पहांटे साडेचार– पांचला चौघडा सुरू होत असे. ते स्वर कानांवर पडले की गोड धुंदी यायची डोळ्यांवर. आमच्या लहानपणी चौघडा वाजविणारे फारच चांगले होते. सनई तर तो इतका सुंदर वाजवीत असे! दोघांची जुगलबंदी चालायची. अग असं पहांटे ते रात्रीपर्यंत संगीतमय बालपण गेल्यावर त्याला सोडून आम्ही कुठं जाणार! गोवा हा प्रदेश सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. तिथं नैसर्गिक सौंदर्य चांगलं, तिथलीं माणसंहि नाही म्हटलं तरी देखणीं. क्वचितच वेडींवाकडीं माणसं दिसतील. तेव्हा आम्ही मान्य नाही असामान्य असं लहानपणींच पाहिलं असल्यामुळं काश्मीर पाहिल्यावर इतर लोकां- सारखे थक्क होत नाही. याचं कारण तें आम्हांला रोजचं होतं म्हणून. पावसाळा नसतांना वर्षभर नुसतं हिरवं हिरवं– दोन्ही बाजूंनी शेतं, मध्ये बांध. म्हणजे लहानसा रस्ता. तोसुद्धा लाल लाल. तिथं पलिकडे जायला लहान ओढा. तिथवर नारळीच्या झाडाचा मोठा बुंधा लांबवर टाकलेला असायचा. त्या एवढ्याशा अर्ध्या फुटी लाकडावरून पलिकडे जायचं. आतां भीति वाटते, पण त्या वेळी आम्ही धांवत होतों. हूडपणा अंगांत भरपूर होता. सापालासुद्धा भीत नव्हतों. पण आतां नाही रे बाबा! मेली मोठी पाल, मोठा उंदीर पाहिला तरी भीति वाटते. नेभळट बनलों आहोंत.

दिवाळी,
१९-१०-१९६३

दिवाळी सुरू झाली. गेल्या वर्षी आपण लढाई चालू आहे म्हणून दिवाळी केली नव्हती. फक्त पाडव्याला ओल्या नारळाच्या करंज्या केल्या होत्या. आणि तुला आठवतं ना? त्याच दुपारीं चांदीचा लामण दिवा, तुपाची लोटी, व कुंकवाची कुयरी एवढ्या जिनसा नाहीशा झाल्या— म्हणजे चोरी झाली. कुणी नेलं याचा कांही पत्ता लागला नाही. नवीन एक रत्न— स्वैंपाकीण ठेवली होती. पण पठ्ठीनं शेवटपर्यंत कबूल केलं नाही. इतकंच नव्हे, तर दोन दिवसांचे पैसे मागायला आली तेव्हा मला म्हणते, ‘मिळाल्या का जिनसा?’ मला मात्र दिवाळी सुचली नाही बंदुशा. अग तो दिवा सुहासच्या लग्नांतला; पुन्हा कुंकवाची कुयरी. अरे राम. खरोखरच, मला राम आठवायची वेळ आली होती कशी ती मनाची समजूत घातली ईश्वर जाणे. तुलाहि खूपच वाईट वाटलं. यंदा तूंच पळालीस. बाकी मुलं जवळ असलीं तर दिवाळीच्या मजा. नाही तर कंटाळा येतो. तुझी इतकी आठवण आली. भाऊबिजेच्या दिवशी तर फारच वाईट वाटलं. दीक्षित मामा, मनोहर मामा, निर्मला— तिचीं मुलं, सर्व जेवायला होतीं. तुला तर मी जातांनाच दिवाळीची अंघोळ घातली होती, नाही? उटणं वगैरे लावून, खरं ना? अग दिवाळी काय दर वर्षी येते. अमेरिका येईल का? तिथं आतां तुझी दिवाळी म्हणजे ख्रिसमस. मजा कर हं. नाताळ म्हणे. बाकी तुला सारखी आठवण होत असेल. मला चकली व इतर तिखट पदार्थ पाहिले की तुझी आठवण येत होती. तुला आम्ही दिवाळी किती तारखेला आहे तें कळवलंच होतं. तूं आम्हांला कळव हं तुझी दिवाळी कशी झाली ती. तेवढंच. जरूर जरूर कळव.

तुझा अभ्यास चांगला चालला आहे हें वाचून आनंद झाला. पाड्या आहेच मुळी तसा आमचा! लौकर उत्तर पाठव.

तुझी
आई

◎ ◎ ◎

: ७ :

पुणें,

५ नोव्हेंबर १९६२

प्रिय बंदू,

तुझं पत्र पोचलं. अग, दिवाळींत तुझी क्षणोक्षणीं आठवण होत होती. तें फराळाचं पाहिलं की– त्यांतल्या त्यांत तिखट पदार्थ ! पण तुझं हें पत्र वाचून मला इतकं बरं वाटलं म्हणून सांगूं. मराठ्यांकडे तुला अगदी घरांतल्यासारखं जेवण मिळालं, आणि तूं खूप जेवलीस हें वाचून माझं पोट इतकं भरलं की अजीर्ण व्हायची वेळ आली. आपलीं माणसं कुठं असलीं की यासाठीं बरं असतं, नाही ? बिचारे बोलावतात, प्रेमानं जेवूं घालतात, बरं वाटतं. आतां पुढली दिवाळी मजेंत करायची हं. यंदा दोन दिवाळ्या आहेत. मला वाटतं, अधिक महिन्यामुळं असं झालं. पहिली आम्ही केली. दुसरी धरली आहे तेव्हा मी दिल्लीला रेडिओंत जाणार. त्यांची नंतरची दिवाळी. रामजन्माचंसुद्धां असंच झालं. असं हें दोनदोनदां बरं वाटत नाही, नाही का ? असो. आपण खूप दूर गेलों की थोड्या दिवसांनी तिथल्या जेवणाचा आपल्याला कंटाळा येतो, नाही ? फार फार आठवण होते आपल्या जेवणाची. मी १९५२ मध्ये चीनला गेले होते ना ? तेव्हा शेवटीं शेवटीं जेवणाला कंटाळून मी फक्त मग फळांवर राहूं लागले. आपली चव ती आपली. एखाद दोन दिवस बरं वाटतं, पण नंतर जो कंटाळा येतो,– आपलं भेटलं आणि त्यांनी जेवायला या म्हटलं की इतका आनंद होतो ! असं वाटतं, नुसता वरण–भात द्या,

आणखी कांही जास्त नको. बाहेर पडलं की घर म्हणजे काय ह्याची कल्पना येते, त्याशिवाय नाही. कसलंहि वेडंवाकडं असलं तरी तें आपलं असतं. अग, जनावरं सकाळीं रानांत चरायला जातात. पण एकदां का संध्याकाळ झाली की केव्हा एकदां गोठ्यांत जाईन असं त्यांना होतं. वास्तविक गोठा तो. त्या मानानं डोंगरावर किती तरी चांगलं असतं. पण शेण असलं, घाण असली तरी त्यांनासुद्धां आपलं तें घर असं वाटत असावं. म्हणजे याचा अर्थ—परदेशी लोक स्वच्छ व आपण घाणेरडे असा नाही हं. श्रीमंत, गरीब याचा इथं प्रश्न नाही. आपलं ह्याला महत्त्व आहे, नाही? अग, घराची ओढ किती असते! माणसाला कुठंहि गेलं—मोठ्या राजवाड्यांत ठेवलं तरी आपल्या घरीं जिथं आपण जेवत होतों— जिथं जास्त वेळ बसत होतों, ती आठवण होते. आतां आपलं एवढं घर आहे ना! पण मला मागच्या म्हणजे हॉलजवळच्या ज्या पायऱ्या आहेत ना, त्या पायऱ्यांवर बसायला फार आवडतं. आई मला नेहमी म्हणायची, 'अग, सर्व कोच वगैरे सोडून तूं इथं कां बसतेस?' मी म्हणायची, 'इथं बसायला मला फार आवडतं.' घरांत सर्व कांही थाटमाट असला तरी जमिनीवर पाय पसरून बसायला फार फार बरं वाटतं. मला याचं कारण ज्या स्थितींत आपलं लहानपण गेलेलं असतं ना त्याची मोठेपणीं आठवण होत असावी, आणि तसं करावंसं वाटत असावं. मग गोव्याला मोठेपणीं जरी आम्ही गेलों ना, तरी ज्या स्थितींत घरांत असतों त्याच स्थितींत बाहेर पडायचं! त्यासाठीं वेगळा म्हणा किंवा खास (स्पेशल) थाटमाट नाही. प्रत्येक वेळा पातळ बदला—नाही, कांही नाही. कुणी तिथं तुम्हांला नांवं ठेवणार नाही. तसं वागणं मला फार आवडतं. म्हणजे गबाळं नाही हं. लोक काय म्हणतील अशी धास्ती नसते. अर्थात् शहरी राहणी वेगळी आणि खेड्यांतली वेगळी हा फरक असणारच. येऊन जाऊन तुम्ही जाणार कुठं? सकाळीं देऊळ, दुपारीं देऊळ, आणि रात्रींहि देऊळ. जातां येतां देवाचं दर्शन होतं. अंधोळ झाली की तिथं सर्वजण नमस्कार करायला देवळांतच जातात. याचा अर्थ घरीं देव नसतो असा नाही! पण ती एक चांगली पद्धत आहे. अग, लहानपणीं इतकीं व्रतं वैकल्यं केलीं आहेत—काय सांगूं तुला. पिंपळ, वड, आणि उपवास. पहांटे उठायचं. पहांट म्हणजे बहुतेक रात्रींच. लोकांच्या

दारांतली फुलं चोरायचीं. न सांगतां काढायचीं म्हणजे चोरायचींच म्हटलेलं बरं, नाही का? जितकीं फुलं जास्त जमतील तितके आम्ही खूष. श्रावण महिना तर जवळ जवळ आम्ही एकभुक्त रहात होतों. आतां आठवलं तर हसू येतं. सर्वांच्या शिव्या खाऊन आम्ही देव करीत होतों. पण तीं फुलं देवाच्या मस्तकावर घातलीं जात होतीं, म्हणूनच शिव्या आम्हांला म्हणजे आमच्यापर्यंत पोचल्या नाहीत. आमच्याच घराच्या वरच्या बाजूला एक पाण्याचं कुंड आहे, तिथं आम्ही आंघोळीला जात होतों. अगदी स्फटिकासारखं स्वच्छ पाणी. अंघोळ झाल्यावर आपले कपडे आपणच धुऊन आणायचे. (नंतर ते आई परत धुवायला लावायची हें कांही सांगायला नकोच.) थोड्या मोठ्या झाल्यावर आम्ही पोथ्या वाचीत होतों. आईची शिकवणूक अशीच होती. एखादा तरी श्लोक पाठ केल्याशिवाय जेवण नाही. त्यामुळं बंदू, मनाचे श्लोक सबंध पुस्तक आम्हांला पाठ होतं. दुसरं म्हणजे ध्रुवाख्यान! तें म्हणतां म्हणतां ध्रुवाला सावत्र आईनं त्रास दिला म्हणून रडायचं. रामविजय–हरिविजय, पांडवप्रताप, जैमिनी अश्वमेध; गुरुचरित्र मात्र भटजींकडून वाचून घेत असे. कारण तें बायकांनी वाचायचं नसतं म्हणे. दर पंधरा दिवसांनी सत्यनारायणाची पूजा,–असं हें धार्मिक लहानपण गेल्यामुळं पुष्कळसं त्यांतलं माहीत आहे. एकदां की नाही, बंदुशा, अस्मादिकांनी म्हणजे मी निर्जळी एकादशी करायचं ठरविलं. त्या छोट्याशा गांवात कुणी मोठीं माणसं करायचीं; त्याला जास्त पुण्य लागतं असं कांही आमच्या कानांवर पडायचं. झालं, माझ्या मनानं घेतलं, आज कांही खायचं नाही. त्याप्रमाणं सकाळपासून पाणी नाही, चहा–कॉफी नाही, कांही नाही. जेव्हा दुपारचे तीन वाजले तेव्हा आई मला फराळाला बोलवायला आली; तेव्हा आमची स्वारी बाहेर बाकड्यावर झोपली होती. आई उठवते तर आम्ही अर्ध्या स्वर्गात मला वाटतं पोहोंचलों होतों. हात उचलला तर हात खालीं येतो. आई म्हणाली, 'अग ही असं काय करतेय?' तर नंतर दुसऱ्या बहिणींनी सांगितलं की, 'कालचा शनवार की काय होता–आणि आज ही निर्जळी एकादशी करणार म्हणून कांही खाल्लं नाही.' शेवटी शुद्धीवर आल्यावर फराळ झाल्यावर आईच्या हातचा खमखमीत फराळही खावा लागला हें सांगायला पाहिजेच का? असो,

आईनं माझा चान्स घालवला. नाही तर मला स्वर्गप्राप्ती झाली असती की नाही, बंदुशा ? तुलाहि उपवास करायची आवड आहे, नाही ? एकादशी म्हटली की तूं मला म्हणायचीस, 'आई, वऱ्याच्या तांदुळाचाच भात कर ' म्हणून. तुला खूप आवडतो ना तो ? आतां तिथं तूं आहेस तिथं एकादशी काय नि असली दशा काय, सर्व सारखंच ! अगग, पत्र बरंच मोठं झालं की ग !

पत्र हीच तार समजून उत्तर लगोलग धाडा. पपांना मधून मधून डाळ–मेथी करून वाढली की खूष असतात. नख नख खायचं, पण ताटांत पाहिजे सर्व. All well. तुला गोड गोड पापा.

तुझी
आई

प्रिय बंदू,

गेले पंधरा दिवस तुझ्या पत्रांतला मजकूर म्हणजे, फॅमिली सोडतांना आई मी स्वतःला कसं आवरूं ? प्रेम लागत नाही. आपणच कसे ग असे ? आपलं अंतःकरण लोण्या-बिण्याचं आहे की काय ?– जरा प्रेमाची ऊब मिळाली की वितळलंच. माझाच स्वभाव आला आहे तुला, बंदुशा. त्यांनाही खूप वाईट वाटेल, नाही ! ११ महिने तूं त्यांच्याजवळ राहिलीस, प्रेम वाटल्याशिवाय कसं राहील ? आम्ही आतां आमची बंदू लौकर येणार या आनंदांत आहोंत. तुलाहि आपण घरीं जाणार हा आनंद आहेच. पण तरी-सुद्धा तिथल्या मंडळींना सोडतांना तुला वाईट वाटणं स्वाभाविकच आहे ! सुंदर डोळ्यांचं वर्णन पाणीदार डोळे म्हणून करतात. तसं आपलं, जरा कुठं जिव्हाळा दिसला की कुंड भरावं तसे डोळे काठोकाठ भरतात. डोळ्यांचा आणि अंतःकरणाचा बराच जवळचा संबंध दिसतो. तुला त्यांना सोडतांना किती दुःख होईल ह्याची मला पूर्ण कल्पना आहे, बंदू ! या तुझ्या पत्रांत तूं प्रदर्शन पाहिलंस म्हणून लिहिलंस. अग,तें पहायला खरंच दोन महिने लागतील. पण जगांतलं सर्व कांही एके ठिकाणी पाहण्यासारखं प्रदर्शन. तूं खरंच नशीब-वान. प्रवास संभाळून कर. अर्थात् जरी बस-प्रवास असला तरी त्या त्यांच्या

बसेस. आपल्यासारखा ‘ पुणे ते घोडनदी ’ असा प्रवास नसणार. घोड-नदीला चहा मिळतो, तो चहा आहे की पावसांतलं तांबडं झालेलं पाणी चहा म्हणून गरम करून देतात याचा पत्ता लागत नाही. पण गरीब बिचारे लोक. तोसुद्धा चहा ढोसतात. करणार काय ? जें मिळेल तें खातात.

खाण्यापिण्यांत प्रवासांत जपावं. मी तुला देवीचा प्रसाद पत्रांतून पाठवीत आहे. तो प्रवासांत स्वतःजवळ ठेव. मुद्दाम गोव्याहून महालक्ष्मीचा आशीर्वाद मागवला. या आशीर्वादावर तुझाही खूप विश्वास आहे हें मला माहीत आहे. ईश्वर तुझा प्रवास सुखाचा करो. आतां पुढील पत्र ? बसच्या पत्त्यावर हं !

पापा, सुहास, वहिनी, अनिल, पुंडू, गुंडू आतां ठीक आहेत. आत्तेची वाट पाहतात. लौकर ये.

तुझी

आई

: ८ :

मुंबई,

ता. ७-७-१९६४

प्रिय बंदू,

अग, आज तुझा वाढदिवस! म्हणतां म्हणतां केवढी झालीस ग! तूं जन्माला आलीस तेव्हांचा सर्व चित्रपट आतां डोळ्यांसमोर येतो. काय सांगूं? त्या वेळीं होणाऱ्या बाळाकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं होतं. सगळ्या बहिणींनीं तर दम भरून ठेवला होता की, आता तुला मुलगी झाली नाही तर आम्ही बारशालासुद्धा येणार नाही. असं कुणी म्हणतं का ग? पहिले तिघे मुलगेच ना मला. समजा, तूं झाली नसतीस आणि तुझ्याऐवजी चौथा मुलगाच झाला असता तर, तर मला किती वाईट वाटलं असतं. पण केवढं माझं भाग्य. तूं झाल्यावर बहिणीला जेव्हा मुंबईला तार केली, तेव्हा त्यांना वाटलं की आम्हीं भेटायला यावं म्हणून खोटीच तार केली असेल. पण तूं मात्र कृष्णासारखी हांकेला (माझ्या) धांवून आलीस. मुलं व्हावींत तर अशीं, नाही का ग बंदू! एखाद्या सिनेमांत किंवा नाटकांत एखादा प्रसंग असतो ना, आतां काय होणार, आतां काय होणार, इकडे प्रेक्षकांचं लक्ष लागलेलं असतं. आणि आपल्या अपेक्षेप्रमाणं घडलं की प्रेक्षकांचा जीव खाली पडतो. तसं तुझ्या बाबतींत माझं झालं. तूं झाल्याबरोबर ताई जेव्हा म्हणाली, "दुर्गाताई, मुलगी झाली ग!"

तेव्हा ती सुटका आणि सगळ्यांच्या दमदाटींतूनहि सुटका झाल्यामुळं सगळ्या वेदनांचा विसर पडला. असं वाटतं, नुकतंच तें सगळं घडलंय्. हळूहळू तूं मोठी होऊं लागलीस. मला आठवतं, तूं वर्षाचीसुद्धा झाली नव्हतीस, तेव्हा मी एकदां रतन सिनेमांतलं 'अँखिया मिलाके जिया भरमाके चले नहि जाना ओऽओऽओऽ' हें गाणं म्हणत होते. त्यांतलं शेवटचं ओऽओऽ तूं इतकं सुरेख म्हणालीस, की आमची सगळ्यांची हसून हसून अगदी पुरेवाट झाली. ते गायनांतले तुझे पहिले स्वर !

पुढं वर्षं सरकत चाललीं. तुझ्या पुढं सरकण्याबरोबर वर्षंहि मागं पडत चाललीं. तशी तूं मोठी होत चाललीस. लहानपणीं जसा ओऽ ओऽ मला कल्पनाहि नसतांना म्हणालीस, तशीच तूं सात-आठ वर्षांची झाल्यावर आपोआपच गायला लागलीस, हें मलासुद्धा कळलं नाही. तूं तीन-चार वर्षांची असतांना तुला नाचाची खूप आवड होती. कुठल्याहि सिनेमांतल्या गाण्यावर तूं छान, तालांत नाचायचीस; स्वतः तो नाच रेकॉर्ड लावून बस-वायचीस. मला खूपच गंमत वाटायची. त्या गाण्याबरोबर हावभाव तर इतके सुरेख करायचीस, फारच छान ! त्याचे तूं किशोरकडून स्वतःच पोझेस देऊन काढलेले फोटो अजून तूं हॉलमध्ये पहातेच आहेस. पण तुझं नाचाचं वेड आपोआप कमी होत गेलं आणि गाण्याकडे तुझी ओढ वाढूं लागली. मला तेंच हवं होतं. अग, नाच ठराविक वयापर्यंतच चांगला दिसतो. गाणं तूं कितीहि म्हातारपणीं तंबोरा घेऊन लोकांच्यासमोर बसलीस तरी वाईट दिसत नाही. कारण, इथं दृश्य जास्त महत्त्वाचं नसतं. कंठ ताब्यांत पाहिजे. आज तूं माझ्यापासून खूप दूर आहेस. खूप, खूप आठवण झाली तुझी गेल्या वर्षीं. तुझ्या वाढदिवशीं आपण रात्रीं तीन वाजे-पर्यंत गायलों. अजून सर्वांच्या तें चांगलं स्मरणांत आहे. तूंहि मस्त गाणीं म्हटलींस. आतां तूं आणखी १५ दिवसांनी येणार. तुझं येणं जवळ येऊन ठेपलं आहे. पण तेंच कठीण झालं आहे. इतके दिवस वाटायचं, खूप महिने आहेत अजून. पण आतां हे १५ दिवस कधीं संपतील याची वाट पहात आहे. तुला गेल्या पत्रांत वाढदिवसाचा आशीर्वाद पाठवलाच आहे; पण आज पुनः देते. खूप मोठी हो, नांवलौकिक मिळवून अमर हो.

सर्वांनाच इथं तुझी आठवण होते. मी आज मुंबईत आहे, सर्व मावशा तुझी आठवण काढतात. गगा बरा आहे.

तुझी
आई

खरं म्हणजे, वंदनाबाय, तुझं एक तरी बस-प्रवासांतलं कार्ड आम्हांला यायला हवं होतं. पण? तुम्हांला वेळ मिळाला नसावा! पत्राची वाट पहात आहे.

आ.

० ० ०

: १ :

पुणें,
११-७-१९६४

प्रिय बंदू,

आजच तुझ्या तिथल्या ममीचं पत्र आलं आहे. थोडक्यांत तिनं तुझी सगळी हकीकत कळविली आहे. ती वाचून कुणाहि आईबापांना मूठभर मांस चढलं तर आश्चर्य नाही. वा रे माझ्या राजा! तुला तुझ्या शाळेंत ऑनर मिळाला, तेव्हाहि तिनं छान पत्र धाडलं होतं. हेंहि पत्र फारच छान आहे. शाळेंत तुमचा सत्कार (तुझ्या वर्गात नॉर्वेचा एक मुलगा होता ना) झाला. गेल्या वर्षी नॅन्सीलाहि हेंच बक्षीस मिळालं होतं; यंदा तुलाहि तेंच मिळालेलं पाहून तुझ्या ममीला आनंद होणं स्वाभाविकच आहे. तुझ्या ममीनं लिहिलं आहे, नॅन्सीचं नांव घेतलं होतं तेव्हा पडायच्या तेवढ्याच टाळ्या पडल्या होत्या; पण जेव्हा वंदनाचं नांव पुकारलं तेव्हा सर्व वर्गानं टाळ्यांचा नुसता कडकडाट केला. खरं म्हणजे, ही बातमी ममीला आधल्या दिवशींच कळली होती. पण तुझ्यापासून तिनं मुद्दामच गुप्त राखली होती. तूं वर्गात गेल्यावर तुझं नांव पुकारलेलं ऐकतांच तूं म्हणे खूपच गोंधळून गेलीस, होय ना? बिचारी ग माझी पोर ती! जरी मी तिथं प्रत्यक्ष नसले तरी हें सर्व चालू असतांना माझ्या बंदूची काय स्थिति झाली असेल, ह्याचं चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं राहिलं. आधी तुझे डोळे भरले असतील, होय की नाही? आणि तुझ्या ममीनं बरोबर तेंच लिहिलं आहे.

ममी–डॅडी, आणि तुझ्या तिथल्या दोघी बहिणी, त्यांना सोडून निघतांना तुला वाईट वाटणं अगदी स्वाभाविक आहे. तुझ्या ममीनं लिहिलं आहे की, आम्ही वंदनाला सांगितलं, की आम्ही गुडबाय् केला आहे,–पण तो शेवटचा नाही. तूं पुनः केव्हा ना केव्हा येशीलच. होय का ग, बंदू ? तेव्हा मात्र मला ने बरं का बरोबर. अग, मी फिलॉसफर झाले असते, तर मी व्याख्यानं देत खूप हिंडले असते. सबंध जग फिरून आले असते, नाही ? अग, विवेकानंद मला फार फार आवडतात. तूं म्हणशील, ' आवडतात ? ते जगांत आहेत तरी कुठं आतां ? ' हीच तर गंमत आहे. त्यांचा देह जगांत नाही, पण ते सर्वत्र भरून राहिले आहेत. असं पाहिजे माणसाचं. अमेरिका तर त्यांनी आपल्या व्याख्यानांनी हादरून सोडली होती. त्यांचं चरित्र जर तूं वाचशील, तर तुला खूप गंमत वाटेल. इतका हूड मुलगा होता तो लहानपणीं. मूल नाही म्हणून आईनं म्हणे शंकराला नवस केला होता; आणि खरोखरीच भगवान शंकर प्रसन्न झाले आणि दिला मुलगा. तो असा दिला, की जसजसा तो मोठा होत गेला तसतसं त्यानं आईला त्राहि भगवान् करून सोडलं. त्यांच्या बाबतींत सबंध गांवाच्या तक्रारी शाळेंत गेला तरी अभ्यासाचं नांव नाही. पुनः सगळ्या मुलांना चिथवायला स्वारी तयार. शेवटीं, त्याच्या खोड्यांनी कंटाळून गेलेली आई भगवान शंकराला म्हणाली, ' देवा, तुला मुलगा मागितला, तूंहि दिलास. पण जर हें असलं रत्न माझ्या पदरांत बांधायचं होतं, तर तो नसता झाला तरी बरं झालं असतं.' त्या माउलीला काय माहीत, की, हे ' रत्न ' खरंच रत्न होऊन राहणार आहे; अन् त्यामुळं आपलं नांवसुद्धा अजरामर होणार आहे ! सांगायचं कारण काय, की माणूस केव्हा, कसा चमकेल हें कांही अगोदर सांगतां येत नाही. म्हणच आहे, ' नर करणी करे तो नर का नारायण बन जाएगा.' जसा विवेकानंदांच्याबद्दल मला अतोनात आदर आहे, तसेच त्यांचे गुरु स्वामी परमहंस, त्यांच्याबद्दलहि आहे. मला असं वाटतं, बंदू, की साधू ज्याला म्हणायचं, त्यांनी परमहंसांसारखं असावं. नाही तर अलीकडे आपण ऐकतोंच, कांही साधूंना भगवीं वस्त्रं पेहेरायच्या आधींच शिष्यीण लागते; नंतर ते भगवीं वस्त्रं अंगावर चढवतात. मला कांही वेळां मोठा

प्रश्न पडतो, त्यांची जगांत कांही इच्छा नसते, फक्त त्यांची एकमेव इच्छा म्हणजे शेजारीं शिध्यीण हवी. म्हणूनच मला विवेकानंद परमहंसांबद्दल विशेष आदर वाटतो. स्वामी परमहंसांना लहानपणीं म्हणे सर्वांनी वेड्यांत काढलं होतं. गांवचे सगळे लोक म्हणाले की, 'तुम्ही त्याचं लग्न करा, म्हणजे तो सुधारेल.' पण काय घडलं, सांग बघूं? जबरदस्तीनं त्यांचं लग्न केलं, अन् पहिल्याच रात्रीं त्यांची व पत्नीची भेट झाली त्याच वेळीं त्यांनी तिच्या पाया पडून 'माते जगदंबे, तूंच इतके दिवस माझ्या स्वप्नांत येत होतीस. तूंच माझी आई आहेस' हे शब्द उच्चारले. "होय ना माते, होय ना माते–" असें विचारून तिच्याहिकडून 'हां' म्हणून घेतलं, आणि त्याहि माउलीनं त्या क्षणीं केस सोडून त्या स्थितींत त्यांच्याबरोबर सेवा करीत ती आजन्म राहिली. ह्याला म्हणतात साधुत्व! बरं का, बंदुशा, ज्यांच्याबद्दल जे भाव मनांत असतात, ते कुठल्याहि प्रसंगीं असे उफाळून येतात. त्या वेळेस समजावं, त्या भावना आंत मावत नाहीत. वाऱ्याचे जोराचे हेलकावे बसून समुद्रांत सुंदर लाटा उसळतात. असो.

आम्ही सर्व खुशाल. समीर सारखी तुझी आठवण करतो. कुठले कपडे घालून तो तुला आणायला येईल तें आतांच ठरवलं आहेन त्यानं. खरंच, लहानपणीं किती ग पोरं गोड गोड बोलतात, नाही? बाबुल तर इतका गोड गोड बोलतो, आंबा 'काप' म्हणायचं असलं की नेमका 'पाक' म्हणतो. 'पाकूस' म्हणजे 'कापूस'. माझी तर हंसून हंसून पुरेवाट होते. तुझ्या पिंटालामध्ये बरं नव्हतं. डोकं फोडून आली होती. अन्नधान्याची परिस्थिती ठीक नाही, म्हणून अन्नमंत्र्याकडे गेली असावी. कारण, तीहि स्वतःला घरांतली एक व्यक्ती समजते ना? तिनं खाल्ला असेल काठीचा तडाखा!

सुहास, वहिनी, अनिल, पापा, सर्व मजेंत. आता तुझी वाट पाहून राहिलीं आहेत. घरांतील सर्व नोकर तुझी खूप आठवण करतात. आतां लवकर ये ग, बंदुशा.

तुझी
आई

० ० ०

## : १० :

३ सप्टेंबर, १९६४

प्रिय वंदुशा,

रात्रौ साडेबाराला बाहेर तुमचा निरोप घेऊन आंत कस्टम हॉलमध्ये गेले, आणि— काय वाटलं कसं सांगूं ? या वेळीं माझी चमत्कारिक स्थिति होती. लंडनला माझं कुणी नसतं तर मला निघतांना खूप वाईट वाटलं असतं; पण तिथं किशोर आहे, मी न पाहिलेली गोरी सून आहे, माझा नातू आहे ही ओढ होती. उद्यां तीं नवी मंडळी दिसणार म्हणून, आणि नुकतीच तूं अमेरिकेहून आलीस आणि आतां मी चालले ही आंत रुखरुख, असं कांहीं माझं विचित्र चाललं होतं. त्यांत आमच्या पुंडोबानं तर कहरच केला. काय मिठी मारून रडला तो, नाही ? खरोखर मला कल्पनाच नव्हती. तूं पहातच होतीस. मी बड्या काकांकडे जाणार हें कळल्यापासून स्वारी मला जास्त वेळ बाहेरसुद्धा जाऊं देत नसे. म्हणायचा, तूं जास्त वेळ बाहेर राहूं नको, मला आवडत नाही. आहे की नाही ! असा दम आत्तांपर्यंत कुणीच भरला नव्हता, ते हे चिरंजीव निघाले. पण आमचं हें पोर गोड आहे की नाही ग वंदू ? तो बोलतांना त्याच्या तोंडाची जी हालचाल होते— ओठ तर सुंदर आहेतच, पण त्याचा सर्व चेहरा बोलतो. अति गोड पोरगा आहे तो. धाकटा बिचारा झोपला होता म्हणून बरं, नाही तर आजी "बॉम्बे" गेलीय म्हणाला असता. असो.

कुठंहि परदेशांत जायला निघायचं म्हणजे केवढं बाळंतपण तें. तिथलीं कामंच संपत नाहीत. भारी त्रास. आपलीं माणसं आपल्याला पोचवायला

येतात, त्यांच्याशीं बोलतासुद्धा येत नाही. " इथं सही पाहिजे, तिथं कांही पाहिजे, दागिने किती आहेत, तमकं काय आहे–" अगदी हैराण होतो जीव.

विमानांत जायच्या आधी मी खाली उभी होते; आणि तुम्ही सर्वजण वर गच्चीवर उभे होतां. खालून तुम्हांला ऐकूं जाईल एवढं बोलायचं म्हणजे मोठ्यानं बोलावं लागत होतं. तिथं स्वच्छ दिवे कां लावीत नाहीत कोण जाणे. वर असलेलीं माणसं दिसतच नाहीत. अशा वेळीं राग येतो. शेवटीं खालून निरोप घेऊन निघाले, विमानांत बसले. जिथं कोणी नाही अशा पोकळ जागेंत मला एकटीलाच घातली आहे असं मला वाटलं. खरं म्हणजे घरून निघतांना मी ठरविलं होतं की रडायचं नाही. आणि खरंच, मी ठरल्याप्रमाणं केलंहि असतं; पण आमच्या पुंडोजीरावानं आमचा अवसानघात केला. तूं म्हणशील, ' बरी पुंडूवर घालते. ' नाही म्हटलं तरी अगदीं शेवटीं फार तर आश्विन महिन्यांत सकाळीं पानांवर दंव असतं तसा कांही प्रकार झाला नसता असं मी म्हणत नाही. पण धुकं पाऊस पडूं दिला नसता. हंसतेस कशाला, तुला खोटं वाटतंय हो का ग ? फाजिल कुठली !

बरं का बंडू, या वेळीं माझी विमानांत चांगलीच जिरली. कधीहि मला मोटार, बोट, विमान लागलं नाही. पण गेले आठ दिवस सारखं जेवणं– चहापाणी चाललं आहे ना ? मला बरंच वाटत नव्हतं. गेले आठ-दहा दिवस सारखं मळमळत होतं. यायच्या आधल्या दिवशीं शेवटीं सात वाजतां आपण ललिताबाईच्याकडे चहाला गेलों. तिथं थोडंसं खाणं झालं. असं वाटतं, किती प्रेमानं आपल्याला आपली मित्रमंडळी बोलावतात, आणि आपण न जाणं हें बरं वाटत नाही. पाहिलींस ना तीं माणसं. खूप श्रीमंत, आणि मोठे उद्योगवाले लोक आहेत ते. पण लालचंद व ललिताबेन, दोघंहि फारच स्वभावानं चांगलीं आहेत. नेहमी आपुलकीनं चवकशी करतील, घरीं बोलावतील, उगाचच आपला बडेजाव कधीच दाखविणार नाहीत. कारण ते गरीबींतून वर आलेले आहेत. त्यांना सर्व जाणीव आहे. थोडासा कडक पण शिस्तप्रिय माणूस आहे तो. आणि शिवाय कर्तबगार. गाण्याची, नाटकाची खूपच आवड आहे त्यांना.

ललिताबाईंना तूं कुठलंहि साधं नाटक विचार, तेंसुद्धा त्यांनी पाहिलेलं असतं. मोठी प्रसन्न बाई आहे, नाही ? ती काय आहे – तिचा चेहराच सांगतो. जणू कांही आरसाच. त्यांची-माझी ओळख झाली तो प्रसंग मोठा गमतीदार आहे. अनिल लहान होता. तेव्हा त्याला बरं नव्हतं म्हणून आम्ही महाबळेश्वरला गेलों होतों. अर्ध्या बंगल्यांत ते रहात होते, आणि अर्ध्यांत आम्ही. एक दिवस संध्याकाळीं मी गाणं म्हणत होते, त्या वेळीं आंदामामा (आतां लेफ्टनंट कर्नल अरविंद गुणे) हा फ्ल्यूट वाजवीत होता, आणि मी जोरजोरानं गाणं म्हणत होते. तों एकदम माझ्या मागचा दरवाजा उघडला आणि ललिताबाई मुलीला कडेवर घेऊन उभी राहिलेली मी पाहिली. त्या म्हणाल्या, 'आंत येऊं का ?' मी म्हटलं, 'या ना.' अशी संगीतमय आमची पहिली ओळख ! एक दिवस शरयूला (मुलीला) ताप आला, तर ती हट्ट घेऊन बसली की, 'मावशीला बोलाव गाणं म्हणायला.' बिचाऱ्या आल्या माझ्याकडे. मीं म्हटलं, 'जरूर म्हणते हं.' खरं म्हणजे ही मंडळी कोण, काय आहेत, त्या वेळीं मला माहीतहि नव्हतं. पुढं शरयूच्या साखरपुड्याला मुद्दाम त्यांनी माझं गाणं केलं होतं. अशी आहे गंमत. हं, तर मी काय म्हणत होते ? बघ, कसं विषयान्तर झालं तें. तर मी काय लिहीत होतें,– तर उलट्या. कधीच नाही ग, पण या वेळीं अगदी हैराण केलं बघ. इतकं डोकं चढलं होतं विमानांत. फक्त लिंबाचा रस घेतला होता तेवढाच. त्यांचा ब्रेकफास्ट नाही, जेवण नाही, कांही नाही. जाऊन जाऊन उलटी करून येत असे. तरी बरं, पिशवींत तोंड घालून उलटी करायची वेळ आली असती, तर मलाच मी शिव्या वाहिल्या असत्या. जेव्हा पहिला हॉल्ट बैरुतला आला तेव्हा मी खाली उतरले. नंतर कैरो. जवळ जवळ तीन तासांनी विमान थांबलं. मी घड्याळाचे काटे बरोबर केले नव्हते. त्यांचे २।। वाजले होते, व आपल्या घड्याळांत पहांट झाली होती. नंतर कैरोला उतरले. सुंदर आहे हं विमानतळ. खाली विमान उतरतांना तर इतकं सुंदर वाटलं. आपण दिवाळींत रंगीबेरंगी रांगोळी घालतों ना– तशी दिव्यांची रांगोळी वाटत होती ! नेत्रदीपी दृश्य होतं तें ! फार सुंदर. मला कैरोचा विमानतळ खूपच आवडला. त्या वेळी आपले ७।। व त्यांचे ४ वाजून गेले होते. नंतर रोम. आपले १२ वाजले

होते, व त्यांचे ६॥ सकाळचे. रोमला वादळी वारे सुटले होते, त्यामुळं मी उतरले नाही. आणि मला बरं वाटत नव्हतं. नंतर पॅरिस आलं. – जें सगळ्यांना पहावंसं वाटतं तें. पण फक्त ३० मिनिटं हॉल्ट होता, म्हणून कुणालाच खाली उतरतां आलं नाही. तिथं पण वारा सुटला होता. सकाळीं १० वाजून कांही मिनिटं झालीं होतीं. आतां फक्त पाऊण तासाचा प्रवास आहे. मग लंडन. त्यांचे १० वाजले होते तेव्हा आपले दुपारचे ३. संपला प्रवास म्हणायचा. हरकत नाही. मला बरं नसल्यामुळं पृथ्वी-प्रदक्षिणा घालून आल्यासारखा शीण आला मला. बरं का ग, विमान-तळावर मुंबईला फक्त बाहुबली दोशी आणि सराफ एवढे दोघे महाराष्ट्रियन होते. तेहि मला वाटतं कैरोलाच उतरले. मग स्वारी एकटी. बाकी सगळे होते, पण आपलं असं कुणी वाटेना.

शेवटी नाही म्हणतां लंडन आलं. विमानांतून बाहेर पडतांना—' बाय बाय– ', हो खरंच. नलिनी जोशी.– माझी मैत्रीण, तिची मुलगी एअर-होस्टेस होती त्या दिवशी. तिचा निरोप घेऊन उतरले. ' पासपोर्ट–कस्टम ' ( अर्थात् बॅग उघडलीसुद्धा नाहीः ) ' हेल्थ सर्टिफिकेट '– खरं म्हणजे माझ्या-जवळ मोठी बॅग, तंबोरा व एक छोटी एअरबॅग ! पण मोठी बॅग उचल-ण्याची ताकदच माझ्यांत नव्हती. जेव्हा कस्टम ऑफिसरपुढं बॅग ठेवली तेव्हा त्यानं विचारलं, ' ही तुमची बॅग ना ? ' मी ' होय ' म्हटल्यावर हंसला, आणि खडूनं खूण करून टाकली ! व पोर्टरला माझी बॅग बाहेर नेण्यास सांगितलं. बघ, आहे की नाही ! कांहीसुद्धा विचारलं नाही.

सर्व पाहून झाल्यावर मी बाहेर पडणार तोंच दादा ( किशोर ) दरवाजांत उभा होता. दादाला पाहिल्यावर मिठी मारावीशी वाटली, पण माझ्या अंगात खरोखरीच त्राण नव्हता. माझ्यानं कांहीच होईना. दादानंच मला जवळ घेतली.

नंतर एअर इंडियाच्या बसनं आम्ही लंडनमध्ये आलों. टॅक्सीनं रेल्वे स्टेशन गांठलं. नंतर आम्ही हॉटेलांत गेलों व तिथं दूध न घालतां कॉफी घेतली, त्यामुळं पुष्कळच बरं वाटलं. दोन वाजतां लिव्हरपूलला जाणारी गाडी सुटणार होती; तिकिटं काढून गाडींत बसलों. मी थोडा वेळ दादाशीं

[stamp] ७३९४८ ... ५५३१५४/१

बोलले, आणि मग मात्र डोळे जड होऊं लागले म्हणून झोपले. लंडन–लिव्हरपूल हा प्रवास ४ तासांचा आहे. गाड्या बऱ्या आहेत; अगदी फारच चांगल्या असं म्हणतां येणार नाही. गाडी थोडी लेट झालीच. ( इथंसुद्धा गाड्या लेट होतात बरं का ! ) लिव्हरपूल स्टेशन आलं. नंतर टॅक्सी– मला वाटलं, आतां एका मिनिटांत टॅक्सी मिळेल, मग पटकन घरीं जाऊं. बरं का वंदू ! वाचतेस ना ? म्हटलं, पत्र लांबत चाललं आहे. आपलं बोरीबंदर बरं म्हणायची वेळ आली. तिथं तरी ' क्यू 'मध्ये उभं राहिलं की १० मिनिटांत टॅक्सी मिळते. इथं टॅक्सीसाठीं उभं राहून जीव कंटाळला. कंटाळून स्टेशनच्या आवाराच्या बाहेर आलों तर आलेली टॅक्सी स्टेशनांत जाऊं लागली. अरे राम ! दादा असा चिडला. मीसुद्धा खूप चिडले असते, पण चिडण्याइतकी माझ्यात ताकदच नव्हती. आणि इंग्रजींत कसं चिडतात तें माहीत नव्हतं. मोडकं तोडकं इंग्लिश त्यांना ऐकवतांना, नेहमीप्रमाणं ' गाढव कुठला ! ' हा शब्द आला असता तर तो म्हणाला असता, ' हें मध्येच काय हें बोलली ही ? ' तेव्हा पोक्त विचार करून मुक्याचं व्रत घेतलं. आव असा आणला की, ' तुम्हांला काय कळतं, सर्व मी जाणते ! ' शेवटीं दादानं पोलिसला सांगून एक टॅक्सी उभी केली, आणि आम्ही टॅक्सींत विराजमान झालों; आणि १० मिनिटांत किशोरच्या घरीं पोचलों. असा हा झाला आमचा प्रवास.

वर आल्यावर, मी सून कुठं दिसतेय का म्हणून पहात होते. ती बिचारी दोन तास खिडकींत वांकून, वाट पाहून थकून आंत गेली होती. तेवढी संधी साधून ( सिनेमासारखी ) आम्ही घरीं टपकलों. पहिल्यांदा तिच्या आईला पाहिलं,– छान आहे ग, दिसायला. नंतर ती धांवतच आली. काय सांगू ? दंवानं टवटवीत झालेलं गुलाबाचं फूल कसं दिसेल – तशी ती वाटली मला. गोड आहे तुझी वहिनी. आतां सर्व वर्णन करायचं म्हणजे, कुठल्या लेखकाची कॉपी करूं ? ती अगदी लतेसारखी म्हटलं असतं, पण नाही, ती चांगली गुलाबांच्या झुडपासारखी आहे. डोळे हरिणासारखे म्हणूं ? अं हं, चांगले टपोरे डोळे भोकरावाणी ! नाक चाफेकळी, अं हं– चाफेकळी असतांना कुणी अय्या ' कधी फुलणार ही ' म्हणून दोन पाकळ्या वर केल्यावर कळी कशी दिसेल, तसं तिचं नाक; थोडं वर उचललेलं. रंग

[stamp]

छान, बांधा छान ! आतां ती ७ महिन्यांची गरोदर आहे ना, पण बिलकुल वाटत नाही. आणि वागणं तर, अग जिना चढतांनासुद्धा धडाधड चढते; तेच खाली उतरतांनासुद्धा ! फार आनंदी आहे, व्हेरी स्वीट गर्ल. तोंपर्यंत आमचे नातू,– ते झोपले होते, त्यांना घेऊन आजी ( नानी ) आल्या. अगदी मस्त पोरगा आहे. रंग आपला. अगदी लहानपणींचा दादाच ! पण नाक मात्र आईचं घेऊन आलाय. पोराचे डोळे छान चकचकीत आहेत. ससा असावा ना तसा दिसतो. १० मिनिटांतच माझ्याशी रमला. चांगला गट्टूलाल आहे. आतां तो १ वर्ष चार महिन्यांचा आहे. त्याची भाषा तर काय आहे देव जाणे ! तो मला कांही तरी सांगतो, तर माझं इंग्रजी आणि त्याचं 'आकट्ट ताकट्ट' असं मस्त जमलं की नाही ! काय ग, यांचे उच्चार काही कळत नाहीत. आणि मजा म्हणजे, त्यांचीच भाषा असून मी स्वच्छ बोललेलं तिला कळत नाही. कारण त्यांना त्यांच्या उच्चाराची संवय झाली आहे. परमेश्वर करो आणि माझी तरी त्यांना कळो, किंवा त्यांची तरी मला कळो. आतां हें पत्र खूपच लांबलं बरं का ! नाही तर पोस्टांत उघडून पाहतील,– की आपल्या देशावर कुणी लेख वगैरे लिहिला आहे का म्हणून !

पुंड्र गुंड्र कसे आहेत ? त्यांना गोड पापा. पापांची प्रकृति बरी आहे ना ? सुहास काय म्हणतोय ? दिवसभर तोंड चालूच असेल, नाही ? अनिलला तर सुहासचं चाललेलं तोंड पाहून आपण न उघडलेलं बरं म्हणून चूप बसला असेल. सर्वांना आशीर्वाद. नंदाला पुंड्र खूप सतावतो, नाही ? त्याच्याकडे तूं लक्ष दे हं. आपली पिंटा काय म्हणतेय ? मला ती नक्की शोधत असेल. बघ हं, लक्ष ठेव तिच्यावर. नाही तर लंडनला पोचायची वास घेत !

उत्तर पाठव.

तुझी
आई

० ० ०

## : ११ :

लिव्हरपूल,
७ सप्टेंबर, १९६४

प्रिय बंदू महाशय,

अजून तुमचं कुणाचंच पत्र नाही. माझं पत्र पोंचल्यावर उत्तर टाकूं या असंच तुम्ही ठरवलं असेल. पुण्याहून मुंबईला आणि मुंबईहून पुण्याला दुसऱ्या दिवशीं पत्र पोंचतं, तसंच कांहींसं मला मनांतून वाटत असावं. खूप दिवस झाले असं वाटतं. उत्तर येईपर्यंत १०–१२ दिवस सहज निघून जातात. मी तुम्हांला ३ तारखेला पाठवलेलं पत्र ८ तारखेला म्हणजे उद्या पोंचेल, आणि त्याच्या आधीच मी तुमच्या उत्तराची वाट पहात आहे. जणुं कांही हें मुंबई-पुणंच. तुझ्या लहानपणाची एक आठवण झाली. तूं ५ वर्षांची होतीस, तेव्हा तुझ्या वाढदिवसाला अक्काला बोलाव असं तूं मुंबईला पत्र लिहायला मला सांगितलंस, आणि स्वतः आयाबरोबर पोस्टांत पत्र टाकायला गेलीस. आणि घरीं येऊन मला विचारतेस, “ आई, अक्का आली ? ” त्या वेळी तुझी समजूत, पोस्टांत पत्र टाकल्याबरोबर अक्का घरीं येईल. तसंच कांहींसं हें माझं होतंऽय, नाही ? असो. परवा आम्हीं एका मोठ्या मार्केटमध्ये गेलों, बरं का बंदुशा, तिथं सर्व सामान नीट मांडून ठेवलेलं असतं. आपल्याला हव्या असतील त्या जिनसा घेऊन, त्या तिथं ठेवलेल्या प्रॅमसारख्या गाडींत घालायच्या, आणि येतांना त्याचं बिल देऊन सामान काढून घेऊन बाहेर पडायचं. ही पद्धत मला खूपच आवडली. अगऽ डोळे दिपून जातात एकेक जिन्नस पाहून ! त्याच मार्केटमध्ये एस्केलेटर म्हटजे आपोआप खाली–वर जाणारा जिना होता. त्यावर मी पाय ठेवतांच दुसरी पायरी पुढं आली. मी घाबरून पाय काढूनच घेणार होते. पण

छान, बांधा छान ! आतां ती ७ महिन्यांची गरोदर आहे ना, पण बिलकुल वाटत नाही. आणि वागणं तर, अग जिना चढतांनासुद्धा धडाधड चढते; तेच खाली उतरतांनासुद्धा ! फार आनंदी आहे, व्हेरी स्वीट गर्ल. तोंपर्यंत आमचे नातू,– ते झोपले होते, त्यांना घेऊन आजी ( नानी ) आल्या. अगदी मस्त पोरगा आहे. रंग आपला. अगदी लहानपणींचा दादाच ! पण नाक मात्र आईचं घेऊन आलाय. पोराचे डोळे छान चकचकीत आहेत. ससा असावा ना तसा दिसतो. १० मिनिटांतच माझ्याशी रमला. चांगला गट्टूलाल आहे. आतां तो १ वर्ष चार महिन्यांचा आहे. त्याची भाषा तर काय आहे देव जाणे ! तो मला कांही तरी सांगतो, तर माझं इंग्रजी आणि त्याचं 'आकट्ट ताकट्ट' असं मस्त जमलं की नाही ! काय ग, यांचे उच्चार काही कळत नाहीत. आणि मजा म्हणजे, त्यांचीच भाषा असून मी स्वच्छ बोललेलं तिला कळत नाही. कारण त्यांना त्यांच्या उच्चाराची संवय झाली आहे. परमेश्वर करो आणि माझी तरी त्यांना कळो, किंवा त्यांची तरी मला कळो. आतां हें पत्र खूपच लांबलं बरं का ! नाही तर पोस्टांत उघडून पाहतील,– की आपल्या देशावर कुणी लेख वगैरे लिहिला आहे का म्हणून !

पुंडू गुंडू कसे आहेत ? त्यांना गोड पापा. पापांची प्रकृति बरी आहे ना ? सुहास काय म्हणतोय ? दिवसभर तोंड चालूच असेल, नाही ? अनिलला तर सुहासचं चाललेलं तोंड पाहून आपण न उघडलेलं बरं म्हणून चूप बसला असेल. सर्वांना आशीर्वाद. नंदाला पुंडू खूप सतावतो, नाही ? त्याच्याकडे तूं लक्ष दे हं. आपली पिंटा काय म्हणतेय ? मला ती नक्की शोधत असेल. बघ हं, लक्ष ठेव तिच्यावर. नाही तर लंडनला पोचायची वास घेत !

उत्तर पाठव.

तुझी
आई

: ११ :

लिव्हरपूल,
७ सप्टेंबर, १९६४

प्रिय बंदू महाशय,

अजून तुमचं कुणाचंच पत्र नाही. माझं पत्र पोंचल्यावर उत्तर टाकूं या असंच तुम्ही ठरवलं असेल. पुण्याहून मुंबईला आणि मुंबईहून पुण्याला दुसऱ्या दिवशीं पत्र पोंचतं, तसंच कांहीसं मला मनांतून वाटत असावं. खूप दिवस झाले असं वाटतं. उत्तर येईपर्यंत १०–१२ दिवस सहज निघून जातात. मी तुम्हांला ३ तारखेला पाठवलेलं पत्र ८ तारखेला म्हणजे उद्या पोंचेल, आणि त्याच्या आधीच मी तुमच्या उत्तराची वाट पहात आहे. जणुं कांही हें मुंबई-पुणंच. तुझ्या लहानपणाची एक आठवण झाली. तूं ५ वर्षांची होतीस, तेव्हा तुझ्या वाढदिवसाला अक्काला बोलाव असं तूं मुंबईला पत्र लिहायला मला सांगितलंस, आणि स्वतः आयाबरोबर पोस्टांत पत्र टाकायला गेलीस. आणि घरीं येऊन मला विचारतेस, " आई, अक्का आली ? " त्या वेळी तुझी समजूत, पोस्टांत पत्र टाकल्याबरोबर अक्का घरीं येईल. तसंच कांहीसं हें माझं होतंऽय, नाही ? असो. परवा आम्हीं एका मोठ्या मार्केटमध्ये गेलों, बरं का बंदुशा, तिथं सर्व सामान नीट मांडून ठेवलेलं असतं. आपल्याला हव्या असतील त्या जिनसा घेऊन, त्या तिथं ठेवलेल्या प्रॅमसारख्या गाडींत घालायच्या, आणि येतांना त्याचं बिल देऊन सामान काढून घेऊन बाहेर पडायचं. ही पद्धत मला खूपच आवडली. अगऽ डोळे दिपून जातात एकेक जिन्नस पाहून ! त्याच मार्केटमध्ये एस्केलेटर म्हटजे आपोआप खाली–वर जाणारा जिना होता. त्यावर मी पाय ठेवतांच दुसरी पायरी पुढं आली. मी घाबरून पाय काढूनच घेणार होते. पण

सिल्व्हियानं माझा हात पकडला, आणि तीहि माझ्या शेजारीं उभी राहिली. हळूहळू आम्हीं खाली मार्केटमध्ये पोंचलों. खरोखर कमाल आहे ह्या लोकांची. यंत्रांनी किती म्हणून कामं करायचीं. मला तर असं वाटायला लागलं आहे, की उद्यां घरसुद्धा पाहिजे तिथं नेतां येईल. बटन दाबलं की उचललं घर, चाललं पुण्याला. तूं म्हणशील, आली आईला घरची आठवण. खरंच येते ग, बंदू. इथं फक्त माया नाही;—नगरी हवी तेवढी विशाल आहे. लिव्हरपूल— पण मुलं मोठीं झालीं की तुमचं तुम्ही पहा, आपल्याशीं तुमचा कांही संबध नाही, असं आई-वडील त्यांना सांगतात. पुढं, तींहि मुलं आई-वडील म्हातारे झाले की त्यांनाहि तेंच सांगतात,— ‘ आतां तुमच्याकडे बघायला आम्हांला वेळ नाही.’ मग म्हातारीं माणसं होतात सरकारजमा. तुला माहीत आहे ना, म्हाताऱ्यांच्यासाठीं इथं वृद्धाश्रम आहेत म्हणून. म्हातारपण ! कशासाठीं हें देव देतो ग ? तरुण वयांत सुंदर असेल, तिनं पुढं आपलंच कांही तरी झालेलं तोंड पहाणं ! सुरुवातीला पुऱ्या तळतांना आपण कढईत भरपूर तूप घालतों. हळूहळू तें संपत येतं. त्यामुळं पुरी फुगत नाही. राहिलेल्या तुपांत कणीक संपवण्याचा विचार करतों, आणि तूप कमी पडल्यामुळं पुरी फुगत नाही. कशी तरी चपटी, खडबडीत निघते. अगदीं तसंच म्हातारपणी माणसाचं होतं. त्यापेक्षा जवळ कांही असतांनाच, कांही रोगबीग व्हायच्या आधीच, आटोपलेलं बरं. तूं म्हणशील, ही आई आतां कुठल्या कुठं पोचली ! मुलं कशासाठीं मागतों आपण ? आपण त्यांचं केलं म्हणजं तीं आपलं बघतील, म्हणूनच की नाही. पण तें खरं नाही, असं इथं वाटायला लागलं आहे. म्हातारपण झालं, म्हणून म्हाताऱ्यांच्या सर्वच भावना कांही मरून जात नाहीत. पण तरुण माणसांना मात्र त्याची कल्पना नसते. त्यांचं म्हाताऱ्यांना सांगणं असतं, “ तुम्ही आतां स्वस्थ पडा. खायला घालतों आहोंत ना आम्ही ? ” जणुं कांही उपकारच करतात आईबापांवर. एकंदरींत, विचार आला की असं कुठं तरी मन भरकटतं, त्यामुळं हातांतलं पेनहि !

आम्हीं लिव्हरपूलला आलों, आणि दुसऱ्याच दिवशीं इथं शेजारीं एक मोठा पार्क आहे, तो बघायला मला नेलं होतं सिल्व्हियानं. ती, मी व नील आंत गेलों, तर जिकडे तिकडे संगमरवरी दगड उभे केलेले

दिसले. प्रत्येकाच्या खाली ताजीं ताजीं फुलं. ही त्यांची सिमेटरी; म्हणजे त्यांची स्मशानभूमि. ह्या वेळी त्या सिमेटरींतच आम्ही तिघंच हिंडत होतों. पण भीति म्हणून वाटली नाही. कांही तर खूपच सुंदर थडगीं होतीं. सिल्व्हिया जवळ जाऊन त्याच्यावर काय लिहिलं आहे तें वाचून यायची, आणि मला सांगायची, 'ही नवऱ्यानं बायकोची समाधी बांधली आहे. कमींतकमी इतके पौंड ह्याला खर्च आला असेल.' रंगीबेरंगी फुलांनी सजवलेल्या त्या समाधी पाहिल्या आणि मला एकदम गडकऱ्यांच्या कवितेची आठवण झाली. एखादं फूल देवाच्या अंगावर विराजमान होतं, तर एखादं प्रेतावर! पण इथं तो भास बिलकुल होत नाही. एखाद्या बगीचांत फिरावं ना, असं वाटतं. सिल्व्हिया एकेका समाधीजवळ जाऊन वाचीत होती, पण माझ्या हिंदू संस्कारांमुळं मला तें चमत्कारिक वाटत होतं. गरोदर बाई ही,—शेवटीं मी तिला म्हटलं, 'चल, जाऊं या आतां आपण घरीं.' आणि त्याचाच विचार करीत मी रस्त्यानं चालत होते. ती माझ्याशीं बोलत होती, तिकडे माझं लक्षच नव्हतं. माझ्या मनांत विचार येत होते, आपण जन्माला आलों हीच मुळी माया. हें रहाटचक्र देव स्वतःच्या करमणुकीसाठीं चालवतो की काय, अशी शंका येते. कांही नाटककार नाही का, जरूर नसतांना विनाकारण प्रेक्षकांना रडायला लावतात. त्यांत त्यांना हेंच सुख वाटतं की—काय माणसं रडताऽत! तसंच देवाचंहि असावं. जातां जातां, कांही तरी ठेवून जायचं; नाही,— ठेवून जायचं नाही, घेऊन जायचं. अगअग! पत्र नाही, पत्रापेक्षा पत्रावळ झाली की ग. आतां तुझं पत्र आलं की उत्तर लिहीन हं. सर्व खुशाल आहेत. नील ह्या खोलींतून त्या खोलींत लुटूलुटू धावत असतो. मधूनमधून 'था' म्हणतो. म्हणजे थँक्स. सिल्व्हिया— दादा मजेंत. पपांना मी कालच पत्र टाकलं आहे. पुंडू—गुंडूला पापा; तुलाहि. मजेंत रहा हं. सुहास— नंदा— अनिल ह्यांस आशीर्वाद.

तुझी
आई

० ० ०

: १२ :

लंडन,

ता. १४-९-१९६४

बेवड्या,

काल मी ४ च्या गाडीनं लिव्हरपूलहून निघाले व ८ ला युस्टन स्टेशनला पोंचले. इथं मी ज्यांच्याकडे उतरणार आहें, त्यांचं नांव डरियन अंगडी. त्यांची पत्नी (जर्मन आहे ती), चंद्रहास पैंगणकर हे मला स्टेशनवर घ्यायला आले होते. तिथून आम्ही अंगडींच्या बंगल्यावर गेलों. बंगला बराच मोठा वाटला. माझ्यासाठीं एक स्वतंत्र खोली त्यांनी राखून ठेवली होती. सर्व घरच सेंट्रली-हीटेड आहे. तूं अमेरिकेला गेली होतीस, तुला हें सर्व माहितच आहे म्हणा. एकदांची स्वारी लंडनला पोचली म्हणायची. मात्र एक रुखरुख एकसारखी मनाला लागून राहिली आहे. तुमच्याकडून अजून पत्र नाही. नाही म्हणायला, एअर पोर्टवर काढलेले फोटो मात्र गगानं पाठवले आहेत. पण त्याबरोबर चार ओळींचंहि पत्र नाही. मी खुशाल आहे.

१५-९-१९६४

अग, काल पत्र लिहितां लिहितांच कला (म्हणजे इथल्या प्रख्यात आजीबाई वनारसे ह्यांची मुलगी) मला आपल्या घरीं घेऊन जाण्यासाठी आली. त्यांच्याकडे १० दिवस गणपतीबाप्पा बसले आहेत. त्यांच्या घरीं गेले मात्र, क्षणभर असा भास झाला, आपण लंडनला नसून गणपतीच्या

कार्यक्रमाकरितां वऱ्हाडांत आलों असावं ! क्षणाक्षणाला ' येऊन राहिलो ', ' जाऊन राहिलो ', ' काहून ' अशी भाषा कानावर पडत होती. पण खरं सांगूं बंदुशा, गणपति पाहिल्यावर मनाला कसं समाधान वाटलं. गणपतीजवळ आले आणि मी ठिकठिकाणचे बरेच कार्यक्रम सोडून पुण्याहून निघाले. एक प्रकारं नुकसानच नाही का ! गणपतीनंतर निघाले असते म्हणजे विमानाचं तिकिट श्री गजाननांनी काढून दिलं, असं म्हणतां आलं असतं. पण मला गणपतीच्या माझ्यावरील असलेल्या कृपेची खात्री पटली. माझ्या ध्यानींमनींसुद्धां नव्हतं की, लंडनला गणपतीसमोर गाईन म्हणून. आत्तांच मला आजीबाई म्हणाल्या, " आपण गणपतीपुढं गायला बसलं पाहिजे हं." मी म्हटलं, " जरूर." म्हणाल्या, " आमचा केवढा भाग्याचा गणपति आहे, की त्याच्यापुढं गाण्याला ज्योत्स्नाबाई पुण्याहून इथं वेळेवर पोचल्या." गणपतीचं कसलं भाग्य ग ! भाग्य माझं, नाही का ग बंदू ? ह्याला म्हणतात प्रेम. परदेशांतसुद्धां मंगलमूर्ति हजर. असो.

दुपारीं आजीबाईंना गणपति-उत्सवाच्या कामांत मदत करण्यासाठी सर्व ओळखीच्या बायका आपुलकीनं जमतात. त्या उत्साहाच्या भरांत किती लवकर करंज्या, मोदक, लाडू करून होतात ! इथं बाहेरचे नोकर मिळत नसल्यामुळं असं सहकार्य करावंच लागतं. नुसताच फराळ तयार करण्यालाच नव्हे, तर प्लेटी धुण्या-पुसण्यासहि सगळ्या जणी तयार असतात. आजीबाईचं एकसारखं " तुम्ही नको हो; राहूं द्या, आम्ही करूंच थोड्या वेळानं." असं चालू असतं. अगदीं पहिल्याच दिवशीं मीसुद्धां सैंपाकघरांत जाऊन पुऱ्या लाटण्यांत आणि करंज्या करण्यांत भाग घेतला. त्याचं आमच्या आजींना केवढं कौतुक ! तोंड भरून सर्वांना सांगत होत्या, "काल ज्योत्स्नाबाईंनीसुद्धा पुऱ्या लाटल्या." एकत्र जमून, हास्यविनोदांत, हीं सर्व कामं कशीं चटकन हातावेगळीं होत असत. आजीबाईंनी शेवंतीचीं फुलं आणलीं होतीं, त्यांचा मी हार करीत होते, इतक्यांत " आम्ही येऊं का आंत ? " हे शब्द कानांवर पडतांच चटकन मी वर पाहिलं, तर प्रभाकर दीक्षित व भाऊ दामले दरवाजांत उभे होते. क्षणभर प्रभाकरला मी ओळखलंच नाही; मस्त पुरीसारखा फुगलेला वाटला मला. म्हटलं, " या, या; बसा." नंतर पुण्याच्या आमच्या थोड्या गप्पा

झाल्यावर आम्ही थोडा वेळ बाहेर हिंडून आलों. आज प्रथमच मी पायीं बाहेर हिंडून आले. झकपक दुकानं बघून डोळे नुसते दिपून गेले. मधून मधून प्रभाकर 'हें अमुक आहे, हें तमुक आहे' अशी माहिती देतच होता; आणि मी अधाशी डोळ्यांनी सर्व पहात होते. मधूनच 'किती सुंदर आहे!' असे उद्‌गार माझ्या तोंडून निघत होते. तो सारखा मला पुण्याच्या कांही गोष्टी विचारून हिंदुस्थानांत ओढून आणायला पहात होता. रस्त्यांत किती तरी पोरं व पोरी एकमेकांना विळखा घालून हास्य-विनोद करीत जातांना पाह्यलीं की मला कसं तरीच वाटायचं. माझंच अंग मी चोरून जात असे. पण म्हणतात ना, चांगलं-वाईट हें सवयीवर आहे. आठ दिवस लंडनला फिरल्यावर त्याचं मला कांहीच वाटणार नाही. तास–दीड तास भटकल्यावर थंडीचं प्रमाणहि वाढत असल्यामुळं, प्रभाकरनी मला पुनः आजीबाईच्याकडे आणून सोडलं. तेव्हाच मी त्याला बजावलं, की "प्रभाकर, मी इथं असेपर्यंत मला लंडन दाखविण्याची जबाबदारी तुझ्यावर बरं का." आणि त्यानं ती हंसतमुखानं, कांहीहि आढेवेढे न घेतां पत्करली. पुण्याच्या रेडिओ स्टेशनचे डायरेक्टर कृष्णराव दीक्षित ह्यांनी मला निघण्यापूर्वीच सांगितलं होतं, की मी माझ्या भावाला पत्र पाठवून तुम्हांला सर्व मदत करायला सांगितली आहे म्हणून; तो तुम्हांला तिथं भेटेलच. त्याप्रमाणं सर्व घडून आलं.

बरं, बाय. आतां पत्ररूपी निरोप घेते. तुम्ही सर्व ठीक असालच. पुण्याला गणपति-उत्सव नेहमीप्रमाणं जोरांत असेलच. पत्र मोठं लिहीत जा. मुलांना आशीर्वाद. पपांना नमस्कार.

तुझी

आई

0 0 0

: १३ :

लंडन,
२०-९-१९६४

प्रिय वंदना,

मी लंडनला आलें, आणि दुसऱ्याच दिवशीं लिव्हरपूलला तुमचीं पत्रं पोचलीं. तीं दादानं मला इथं री-डायरेक्ट केलीं. आपण कुणाला विमान-तळावर किंवा आगगाडीच्या स्टेशनावर पोचवायला जातों आणि नंतर जाणारा निघून जातो, पण घरीं परतणाऱ्या मंडळींना खूपच वाईट वाटत असतं, नाही ? तूं अमेरिकेला जातांना तुझं विमान सुटलं आणि आम्ही घरीं यायला निघालों. घरीं पोचेपर्यंत एक शब्दहि माझ्या तोंडून निघाला नाही. दुसरं कुणी बोललं तरी अशा वेळीं राग येतो. तसंच माझं विमान सुटल्यावर तुमचं झालं असेल ह्यांत नवल नाही. मला फारच वाईट वाटतं तें हेंच की, तूं अमेरिकेहून पुण्याला आलीस आणि मी लगेच एका महिन्यांतच इथं यायला निघाले. जवळ जवळ सबंध वर्ष तूं माझ्याजवळ नव्हतीस. पण दादाचं आग्रहाचं पत्र आलं, की तुझ्या सुनेच्या ह्या वेळच्या बाळंतपणाला तरी तूं इकडे ये. म्हणून मीहि विचार केला, जावंच. असो. मी खुशाल आहे. दादामंडळीहि खुशाल आहेत. तुझी वहिनी सिल्व्हिया सात महिन्यांची गरोदर आहे, असं मुळीच वाटत नाही. भराभरा काम करते, वाटेल तें पटकन उचलते. तशी भलतीच हेल्दी आहे हं. इथलीं माणसं तशीं सशक्तच. कालच मला दादाचा लिव्हरपूलहून फोन आला होता. सिल्व्हियाहि माझ्याशीं बोलली. पण काय तें विचारूं नकोस. जें कांही

गाळून मला समजलं तेवढ्याचं उत्तर द्यायचं. पोवाड्यांत वगैरे नसतं का पालुपद, "व्हय म्हन दादा, दादा र, जिर, जी जी जी." तसं फक्त 'जी' म्हणजे 'येस्' किंवा 'नो' म्हणायचं. हल्ली पुरा 'येस्' म्हणायचा नसतो; 'या' म्हणतात. मला तेवढंच बरं, एक अक्षर कमी झालं. पण ताप वाढला. कसा काय विचार ना! ऐकणाऱ्याला वाटतं, 'या' म्हटल्यावर ही फर्डे इंग्लिश बोलत असली पाहिजे. त्यामुळं ते माझ्याशी जोरजोरांत बोलायला सुरुवात करतात, आणि जेव्हा माझीं भलतींच उत्तरं ऐकतात, तेव्हा ते खरोखरच चाट पडतात. म्हणावं, कराल पुनः चूक? पण खरं सांगते हं बंदु, इथले, त्यांतल्या त्यांत लिव्हरपूलमधले उच्चार जरी दहा वर्षं मी इथं राहिले तरी मला कळणार नाहीत. मी येत असलेलं (इंग्लिश, बरं का!) स्वच्छ बोलते तेंच त्यांना कळत नाही. कमाल आहे, नाही! बसनं जाऊं या म्हटलं, तर बसचा उच्चार नुसता 'बा' केल्यास कसं कळणार ग? हा 'बा' कशाला वर काढते असं पटकन वाटतं. मग लक्षांत येतं, की आपटे रोडला पुण्याला नसून लिव्हरपूलला आहे. हा पुलाच्या वाडींतला 'बा' नव्हे!

एकंदरींत, माझं इथं कसं काय होईल, कोण जाणे! मला येत असलेलं 'सुद्ध' इंग्लिश इथं बिघडायला लागलं ग, बंदु! एक दिवस मजा झाली बरं का, बंदुशा. दादाच्या खालच्या फ्लॅटमध्ये ८० वर्षांची एक म्हातारी राहते. घरांतलं सर्व काम, शॉपिंग वगैरे स्वतःच करते. आणि सदा हंसतमुख. नीलला कांही खायला द्यायचं असलं, की ती बेल वाजवते. अशी एक दिवस अशीच बेल वाजली. मी कसल्या विचारांत मग्न होते कोण जाणे. 'मी दार उघडावं' म्हणून दादा मला म्हणाला, "खालची मेली वाटतं." मी म्हटलं, "अरेरे!" दादा म्हणतो, "अरेरे काय?" मी विचारलं, "कोण मेली, रे?" दादा जो हसत सुटला! त्या म्हातारीचं नांव होतं मिली. मला वाटलं, 'मेली!' एकंदरींत – असा इतिहास घडतो!

अग हो; मागच्या पत्रांत तुला आम्ही पिअरहेड बघायला गेल्याचं लिहिलंच नाही. हेंच लिव्हरपूल बंदर. तिथून आम्ही मोठ्या लॉंचमध्ये

बसून ( लॉंच म्हणण्यापेक्षां बोटच ती ) पलीकडे न्यू ब्रायटनला गेलों. इथं पुष्कळ लोक पिकनिकला जातात. इथं मला हाँगकाँगला आल्यासारखं वाटत होतं. कारण, हाँगकाँग गांव डोंगरावर वसलेलं आहे. खूप वेळ आम्ही तिथं हिंडलों. पुनः लिव्हरपूलला आलों. एका चायनीज होटेलमध्ये जेवलों आणि रात्रीं दहा वाजतां घरीं आलों. एवढ्या वेळांत नील एकदां-सुद्धा रडला नाही. असो. परवांच मी आजीबाईकडे गायला बसले होते. लहानसा हॉल तुडुंब भरला. एक दुसऱ्याला सांगतो, दुसरा तिसऱ्याला सांगतो, अशी मंडळी जम जम जमली. सतीश तुंगारेनं त्या दिवशी मला तबल्याची साथ केली. त्याला प्रॅक्टिस नसल्यामुळं जरी मला पाहिजे तशी साथ तो करूं शकला नाही, तरी त्यानं वेळ चांगली निभावून नेली. सांगायचं म्हणजे, गाणं जमलं! ऐकणारे खूष ( कारण, बऱ्याच वर्षांनी अशीं मराठी गाणीं त्यांना ऐकायला मिळालीं असतील. ) पाहिलंस? गणपतीचं माझ्यावर किती प्रेम आहे तें? लंडनला मला त्यानं गायला लावलं. पुण्यांतला उत्सव सोडून लंडनला पळतेस काय? पण इथंहि आम्ही हजर असूं, हें तुझ्या ध्यानांत आलं नसेल. इथं बरीच आपली मंडळी भेटत असल्यामुळं माझा वेळ चांगला जातो. पण केव्हा केव्हा पावसाळ्यांत मधूनच ऊन चमकावं तशी तुम्हां सर्वांची आठवण येते, तर कधी ऊन पडलं असतांना पाऊस यावा असं कांही होतं. सूज्ञास अधिक सांगणं नलगे.

पापांचं चहापाणी बघत जा. सर्वांना आशीर्वाद. पुंडू, गुंडूला गोड पापा.

तुझी
आई

० ० ०

## : १४ :

लंडन,

ता. २७-९-१९६४

प्रिय बंदुशा,

तुझं पत्र यायच्या आधींच माझं हें पत्र पाहून म्हणशील की आईजवळ पैसे जास्त झाले आहेत, की तिला चैन पडत नाही. त्यांतलं दुसरंच कारण खरं धरायला हरकत नाही. तूं मागच्या पत्रांत लिहिलं होतंस, नवीन कांही पाहिलंस की लागलीच कळव. म्हणून रात्र झाली आहे तरी तुला पत्र लिहायला बसले आहे.

दोन-तीन दिवसांपूर्वीं रात्रीं आम्ही म्हणजे आजीबाई, बर्वेबाई, मोटार-मधून हिंडायला गेलों होतों. हिंडायला म्हणण्यापेक्षां कला ( बनारसेंच्या आजीबाईंची धाकटी मुलगी ) म्हणाली, 'मी तुम्हांला लंडनचीं प्रख्यात स्थळं आज दाखवते.' तीं बघायला निघालों. रात्रीचं बाहेर पडायचं कारण त्या वेळीं लाइटिंगची फार शोभा दिसते; म्हणून रात्रींच पुष्कळ लोक बाहेर पडतात. पहिला पाहिला ट्रॅफलगार स्क्वेअर. एक मोठा चौक, त्यांत शोभिवंत कारंजं, पिलरच्या चारी बाजूला दगडी मोठे सिंह. तिथं चिक्कार कबुतरं आहेत. तीं पाहिलीं की मुंबईच डोळ्यांसमोर उभी राहते. बरं का, बंदुशा, कबुतरांना लाज आणणारीं माणसं इथं सगळीकडे वावरतात. उघड्यावर त्यांचे चाळे आपल्याला संवय नसल्यामुळं बघवत नाहीत. कबुतरं जन्माला इथंच आलेलीं असावींत. आणि जेव्हा इंग्रज लोक आपल्याकडे आले तेव्हा चार कबुतरं बरोबर आणून हिंदुस्थानांत सोडलीं

असावींत ! आपल्याकडेहि पूर्वींच्या काळीं कबुतरं होतीं. त्यांचा उपयोग संदेश पाठविण्याकडे केला जाई. एकंदरींत प्रेमांत गुरफटलेला जीव म्हणजे कबुतरं. नंतर गेलों पिकॅडली सर्कस बघायला. पिकॅडली लंडनचं हार्ट असंहि म्हणतात. नंतर बकिंगहॅम पॅलेस (फक्त बाहेरून हं). पॅलेस म्हणजे एक लांब इमारत आहे. आंत सोन्याचे गालिचे अंथरले आहेत का कसले, कुणी पाहिले आहेत ? ह्यापेक्षा आपल्याकडील राजवाडे जास्त सुंदर आहेत. फत्तेपूर शिक्री तूं अजून पाहिली नाहीस. किती सुंदर बांधकाम आहे तिथलं. आर्किटेक्चरची कमाल आहे. गोलघुमट, ताजमहाल, वृंदावन गार्डन्स, अशीं किती तरी कधींच न विसरतां येणारीं स्थळं आपल्या इकडे आहेत. पण आपण परधार्जिणे ना ! लोकांचं तेंच चांगलं. ते लोक मरतात इंडिया बघायला ! अशीच एक चमत्कृति अहमदाबादला आहे बघ. झुलता मनोरा ! हे दोन मनोरे कांही अंतरावर बांधलेले आहेत. एका मनोऱ्यांत आपण उभे राहिलों आणि बाहेरच्या माणसानं तो हालवला की आपण हालतों, इतकंच नव्हे तर समोरच्या मनोऱ्यांतला मनुष्यहि हालायला लागतो. कल्पना कर, काय– काय बांधणी असेल त्याची ! म्हणतात की, डेंजरस म्हणून इंग्रजांनी एक मनोरा पाडून टाकला. सध्या उभ्या असलेल्या मनोऱ्याचा अनुभव मी स्वतः घेतलेला आहे. मद्रास व गोवा इकडचीं देवालयं पहावीं; आणि सर्वांत म्हणजे जिथं अभिमानानं छाती फुटून जाते तीं वेरूळ-अजंठाचीं कोरीवलेणीं. अजून तूं तीं पाहिलेलीं नाहीस. अगदीं खरंच, तिथं गेलं की मति गुंग होते ! डोळे विस्फारतात. किती भव्य ! दिव्य !! पाहून वाटतं, की किती जन्म घ्यावे लागले असतील त्या कलावंतांना हें अवाढव्य काम पुरं करायला ! पाहिलंस, लंडनबद्दल सांगतां सांगतां मी आपल्या इकडच्या कोरीवलेण्यांत शिरले. बकिंगहॅम पॅलेसनंतर लंडन ब्रिज, टेम्स नदी, असे दोन तीन तास हिंडून आरामांत घरीं गेलों. इथली विंडो शॉपिंगची पद्धत फार चांगली आहे. सर्व वस्तू मांडून ठेवलेल्या असत. बाहेरूनच आपण पाहिजे ती वस्तु पसंत करावी, आणि आंत जाऊन पैसे देऊन खरेदी करावी. ह्याच्या उलट, आपल्या इथं,– हें नको, तें नको, असं करीत सर्व दुकान उलथं-पालथं करायला लावतात. ह्यांच्या पद्धतीमुळं आपलाहि वेळ वांचतो, आणि त्यांचाहि. आजच संध्याकाळी मी थोडा वेळ कांही ओळखीच्या

लोकांना गाणं ऐकवलं. सतीश तुंगारे ह्यानं माझ्याबरोबर तबला वाजवला. उद्या दुपारच्या गाडीनं मी लिव्हरपूलला जाणार. मी ज्यांच्याकडे उतरले आहे, शालिनीबाई तुंगारे– सतीशची आई, त्यांचे मी उद्या जाणार म्हणून आतांपासूनच डोळे भरून आले आहेत. एकसारख्या म्हणतात, " किती हो प्रेम लावलंत आठ दिवसांत !" " आत्ता काय सांगावं यास्नीं ? पिरेम कुनी लावलं ग !" चांगलीं माणसं आहेत, खरं. आतां लवकर लिहिणार नाही हं पत्र, बंदू. थंडींत हात चालत नाही माझा. गरम होण्याची भरपूर सोय आहे, पण आम्हांला त्याचा काय उपयोग ? आम्ही अगदीच थंडीं माणसं. तशीं डोक्यानं गरम, बरं का. पण तें वाईटच; तें दुसऱ्याचंहि डोकं गरम करतं. सध्यां तुझं काय चाललं आहे ! अभ्यास, पुंड्र-गुंड्रबरोबर खेळणं, आणि आपली गाडी. ती ठीक आहे ना ? चांगली ठेवा बरं का. अग अशा मोठ्या जिनसा एकदांच घ्यायच्या आपल्यासारख्या गरिबांनी. त्या नीट संभाळल्याच पाहिजेत, हो की नाही ? बागेकडे लक्ष देतेस की नाही ? पुंड्याची मला फार आठवण होते. पोरगा खूप रडला येतांना. तें मी विसरूं शकत नाही. अगदी खरं प्रेम करतो तो आजीवर. मी तुला सबंध इंग्लंड आणते म्हटलं, तरी तो म्हणाला, 'तूं जाऊं नकोस.' काय वाटलं असेल मला ? कोण आपल्यावर किती प्रेम करतो हें सांगणं म्हणजे आभाळाचा शोध लावणं आहे. तें कधीच हाताला लागायचं नाही. आपण म्हणतों, 'सूर्य कुठं आहे ? आकाशांत.' चंद्र, तारे, सर्व कांही आकाशांत आहेत, असं म्हणतों. दिसतं, पण– पण मुळांत आकाश आहे का ? जिकडे तिकडे सर्व पोकळ. शेवटीं कुण्णी आपलं नाही. आपलं आपणच. एकटा जीव.

तुझी
आई

० ० ०

## : १५ :

लिव्हरपूल,
ता. १५-१०-१९६४

प्रिय बंदू,

आज दसरा ! पण मी कुठं आहे ? लिव्हरपूलला. इथं दसरा-दिवाळीचा कांही संबंधच येत नाही. दिवाळी-दसरा सर्व कांही विसरा ! दसरा म्हणजे काय विचारलं, तर शमीच्या झाडापासून इतिहास सुरू करावा लागेल. मग ते कौरव, ते पांडव,– नाही बाई, एवढी ताकद नाही आपल्यांत. अग, ह्या कौरवांबरोबर कुणी लढावं ? पण, बसल्या बसल्या इतर सर्व इतिहास डोळ्यांसमोर आणला. दसरा म्हणतांक्षणींच 'नाट्यनिकेतन' आणि 'आशीर्वाद' नाटक डोळ्यांसमोर येतं. कारण, १९४१ सालीं विजयादशमीला आम्हीं नाट्यनिकेतन ही संस्था मुंबईला स्थापन केली. त्या वेळचे मुख्य सूत्रधार होते रांगणेकर आणि एकसंबेकर. मी फक्त रंगभूमीवर कामं करण्याचा भार उचलला होता. बाकी तुला तो सगळा इतिहास लिहायचा, म्हणजे एक मोठा ग्रंथच होईल. पत्रांत तुला इतकं लिहिणं शक्यच नाही. नाट्यनिकेतनच्या स्थापनेपासून दर वर्षीं आम्ही सत्यनारायणाची पूजा करून वाढदिवस साजरा करतों. त्यामुळं मी दसऱ्याच्या दिवशीं क्वचितच घरीं असे. कांही कारणानं मी दोन-तीन वर्षं ह्या पूजेला

हजर नव्हते. मागं वळून पाहिलं, तर बरीच वाट मागं टाकली. चालतां चालतां कांही मार्ग चांगले लागले, कांही काट्याकुट्यांची पायवाट लागली. पण तसा विचार केला तर चांगला मार्गच जास्त लागला असं म्हणावं लागेल. अग, लाल लाल – भुसभुशीत रेशमासारख्या मऊ मातींत माझा जन्म झाला. गोवा म्हणजे सौंदर्याची खाण– ( पण आमच्या वाट्याला तें कां नाही आलं, कोण जाणे ! ) अशा सौंदर्यसंपन्न, कलासंपन्न देशांत आमचा जन्म झाला. मग आम्ही स्वस्थ कसे राहूं ? गाणं तर लहानपणापासूनच पदराला बांधलेलं. तें कधी सुटलंच नाही. सुटावं अशी इच्छाहि नाही. नंतर त्यांत नाट्य आलं. एकंदरींत बऱ्याच लहान वयांत माझी कारकीर्द सुरू झाली म्हणायला हरकत नाही. पहिलं नाटकांत काम केलं तें आंधळ्यांच्या शाळेंत, १९३३ सालीं. रंगभूमीवरच्या त्या माझ्या पहिल्याच भूमिकेनं प्रचंड नांव केलं. त्यामुळं रंगभूमी अगदी बदलून गेली म्हणायला हरकत नाही. त्या वेळच्या वर्तमानपत्रांतले वृत्तान्त घरीं फाइल करून ठेवले आहेत पापांनी, ते तूं जरूर वाच म्हणजे तुला कळेल. स्तुतीचा माझ्यावर नुसता वर्षाव झाला. पण मी मात्र मख्ख. माझ्यावर त्या स्तुतीचा कांहीहि परिणाम होत नसे. अजूनहि माझी तीच स्थिति आहे. माझ्याकडून आयुष्यांत फार कांही झालं आहे असं मला वाटतच नाही. ' ऊं: ! एवढंच ? ह्यापेक्षा खूप नांवलौकिक मिळायला पाहिजे ' असं सतत वाटतं. जर मी प्राइम मिनिस्टर झाले, तर तेव्हा कदाचित मी कुणी मोठी झाले असं मला वाटेल. पण तेंहि सांगता येत नाही. माझं समाधान नाही. पाहिलंस, हें असं होतं. कुठल्या कुठं जाते मी ! आणि म्हणे, प्राइम मिनिस्टर होण्याच्या गप्पा ! चिनी घरांत शिरले, तरी ते माझेच भाई भाई आहेत– म्हणून त्यांना गोंजारीत बसायची ! खरं की नाही ! तर काय लिहीत होते ? ना...ट...क.

मला आठवतं, मी स्वभावानं फार घुमी होते. घरांत नाही हं पण बाहेर, लोकांत गेले की निर्विकार चेहऱ्यानं चूप बसायची. त्या वेळी आमच्या घरीं गप्पा मारायला कै. श्री. वर्तक, अनंत काणेकर, के. नारायण काळे, सर्व येत असत. वर्तक तर नेहेमीं यायचे. त्यांच्या नेहमीं नाटकांबद्दल गप्पा चालत असत. एक दिवस त्या सर्वांनी मिळून ठरवलं, की ' नाट्य-

मन्वंतर' ही संस्था स्थापन करायची. इब्सेनचं गाजलेलं नाटक 'डॉल्स हाउस' हें मराठींत रंगभूमीवर आणायचं, हें त्यांतलं मुख्य. पण कां कोण जाणे, तें नाटक न घेतां 'आंधळ्यांची शाळा' हें पहिलं नाटक बसवायचं त्यांनी ठरवलं. हा बेत पक्का झाल्यावर एक दिवस वर्तक अकस्मात मला म्हणाले, "दुर्गाबाई, आमच्या आंधळ्यांच्या शाळेत तुम्हांला बिंबाचं काम करावं लागेल, बरं का!" हें ऐकल्यावर, 'बाळक्या, पत्करतोस का ठकीला?' हें ऐकून बाळक्याची जी स्थिति झाली होती, ती स्थिति माझी झाली. नाटकांत काम करायचं? अरे बाप रे! मला जमेल? नाही म्हणायला, मी कृष्ण फिल्म कंपनींत संत सखू या मराठी चित्रपटांत सखूची भूमिका केली होती. (त्यामुळं मला कधी कधी वर्तक थट्टेनं 'काय सखूबाई, बरं आहे ना?' असं विचारायचे). पण मला ती फारशी जमली नव्हती. खोटं काम काय करायचं, असं मला वाटत होतं. ह्या चित्रपटांत सासूचं काम होतं दुर्गाबाई शिरोडकरकडे. सासू सखूला खूपच छळत असते. ती मला शूटिंगच्या वेळीं मारीत असे. पण तो मार माझ्या चेहऱ्यावर उमटतच नसे. शॉट संपला की ती मला म्हणायची, "अग, इतकं मारलं तरी अशी काय ठोकळ्यासारखी उभी राहतेस? जरा चेहरा वाईट कर की!" एका प्रसंगाला तिनं माझा असा कांही कान पिरगळला आहे की मी खरंच कळवळले, आणि तो शॉट सगळ्यांच्या पसंतीला उतरला. मग मात्र मी तिला सांगितलं, "दुखलं तरी हरकत नाही, मला खरं खरं मारा. मारायचं ॲक्टिंग करूं नका." ती विचारी माझ्यावर इतकं प्रेम करायची. शॉटच्या आधी आणि मागून आईचं प्रेम, शूटिंगच्या वेळीं सासूचा छळ. ती मला म्हणायची, "अग, ही तुझ्यासाठीं सिनेमा लाइन नाही. इथं फार वेगळीं माणसं लागतात. तुला जमणार नाही हें सिनेमांतलं वागणं." आणि खरोखरच, पुढं मला तिचं म्हणणं पटलं. नंतर मोठमोठ्या सिनेमा डायरेक्टरांनी कामासाठीं विचारलं, तरी मी त्यांना नकारच दिला. 'अयोध्येचा राजा' फिल्म निघायच्या आधी कोल्हापूरचे लोक आमच्याकडे मला कामासाठीं विचारायला आले होते तें मला आठवतं. त्यांत व्ही. शान्ताराम होते. पण सिनेमांत काम करणं चांगलं नाही, असा समज मनांत दृढ झाला होता. त्यांनी खूप आग्रह

केला त्या वेळीं. पण त्यांना असल्या माझ्या समजुतीमुळं नकारच मिळाला. खरं म्हणजे, मी तारामती शोभलेही नसते. फार पोरगी वाटले असते. पण जरी तेव्हा सिनेमांत काम करणं पसंत नव्हतं, तरी पुढं एकदां शान्तारामबापूंच्या पिक्चरमध्ये काम करण्याची इच्छा झाली; अगदी मनापासून. कारण, तीं लहानपणचीं मतं आतां बदललीं होतीं. एकदां त्यांच्या पिक्चरमध्ये काम करण्याचा योग आलाहि होता. मला साजेशी स्टोरी तयार होती, सगळं जवळजवळ ठरलं होतं. पण, नंतर सहा-सात महिन्यांनी अनिलचा जन्म झाला ! असो.

तुला वाचायला मजा वाटते, पण कधीं इतका वेळ हातांत लेखणी धरून बसण्याची मला संवय नाही, बंदुशा. आणि तुला माहीतच आहे, ह्या हवेंत हात गारटतो. मात्र सगळे इथले लोक मला म्हणतात, तुमचं नशिब म्हणून अजून थंडी, धुकं, सुरू झालं नाही. असंच माझं नशीब सतत जोरावर राहूं दे, अशी मी देवाजवळ प्रार्थना करते, आणि आजचं पत्र-लेखन संपवते. चालेल ना ? अगदी, इतक्या गमती आहेत तुला कळवण्या-सारख्या, काय सांगूं ? जर का मला लेखनाची शैली माहीत असती, तर खरी 'सारस्वत' म्हणून नांवलौकिक कमावला असता. सर्व खुशाल. नील नवीन बोलायला शिकला आहे. 'सित् डाउन' बोट दाखवून मला बसायला सांगतो.

तुझी
आई

ता. क.

आज गगाला माझी खूपच आठवण झाली असेल. कारण, पूजेची तयारी मीच करीत असे. सारखं मन तिथं धाव घेतं. किती मंडळींना आपण सोनं देतों. पानं का असत ना, पण खरीं सोन्याचीं पानं दिल्या-सारखी ऐट असते. इथं कांही नाही. जर जवळ कॅलेंडर डायरी नसेल तर कुठला सण कधीं येऊन गेला, त्याचा पत्ता लागणार नाही. पत्ररूपी

तुला व सर्वांना हें सोनं देत आहे. देह इथं असला तरी माझं मन ( आज तरी ) तिथं आहे.

आणखी एक ता. क.

नाटकाबद्दल लिहायचं राहिलंच की ! तुझी उत्सुकता वाढवून ठेवते. कादंबरी लेखनांत हें फार महत्त्वाचं आहे. पुढील पत्रीं हं !

तिसरा ता. क.

कांही नाही ! !

० ० ०

: १६ :

लंडन,

ता. २६-१०-१९६५

प्रिय बंदू,

तुझं पत्र पोचलं. माझं मागचं पत्र वाचून तुला वाटेल, मी माझ्या नाटकांच्या सर्व आठवणी तुला लिहीन म्हणून. अग, मनांत खूप सांगायचं असतं. ओघ वाहतां वाहतां भलत्याच ठिकाणीं जाऊन भिडतो. जिथं वाट फुटेल तिथं वळतो पाण्यासारखा. अशीच वाट सापडेल तेव्हा तो इतिहास तुला कळवीन. इतकं वाईट वाटायला काय झालं ? तुला सांगणारच आहे मी कधीं तरी. मुख्य गोष्ट म्हणजे माझा २४ ऑक्टोबरला कॉमनवेल्थ इन्स्टिटयूटमध्ये गाण्याचा कार्यक्रम झाला. नवकला ह्या संस्थेनं तो ठरवला होता. त्या वेळीं माझ्याबरोबर गाण्याची साथ (अर्थात् तबल्याची) महापुरुष मिश्रा ह्यानं केली. (हा महा आहे मात्र अगदी लघु.) व्हॉयोलिनला श्री. इंदोलकर होते, आणि श्री. जोशी ह्यांनी हार्मोनियमची साथ केली. महापुरुष अलि अकबरबरोबर लंडनला दौऱ्यावर आले आहेत. बरं का, बंदुशा, महाराष्ट्रीय गायिकेचा लंडनमध्ये मोठ्या प्रमाणांत हाच कार्यक्रम पहिला म्हणायला हरकत नाही, असं लोक म्हणत होते. चंद्रहास पैंगणकर ह्यांनी हा कार्यक्रम ठरवला होता. कार्यक्रमाला आपले हायकमिशनर जिवराज मेहता, नेपाळचे राजदूत उपाध्याय व त्यांच्या पत्नी श्रीमती मदालसा उपाध्याय, सीलोनचे हायकमिशनर डॉ. मलयशेखर हे उपस्थित होते. त्यांच्याबरोबर आमचा फोटोहि झाला. कार्यक्रमाला कांही

इंग्रज लोकहि आले होते. गाणं ऐकतांना माना डोलवीत होते, ह्यावरून त्यांना भारतीय संगीत समजत होतं असं म्हणायला हरकत नाही. कांही तर डोळे मिटून तंद्री लागल्यासारखे बसले होते. त्या दिवशीं इतकी थंडी पडली होती, पण हॉल सेंट्रली हीटेड असल्यामुळं ती कुणालाच जाणवली नाही. गाण्याचा कार्यक्रम ७-३० ते १०-३० चालला होता. कार्यक्रम फारच छान झाला. त्यांतल्या त्यांत जलधर केदार आणि त्याच रागांतला (तुझा आवडता) तराणा श्रोत्यांना आवडला; भजनबिना हे कबिराचं भजन तर फारच आवडलं. ह्याच्या आधीं गणपतीला आजीबाईकडे व दुसऱ्या एका हॉलमध्ये अशा दोन बैठकी झाल्याच होत्या. दोन्ही बैठकी जमल्या होत्या. त्याबद्दल मी तुला लिहिलंच होतं. सांगायचं तात्पर्य म्हणजे, तुझ्या आईनं......

................

खरं म्हणजे, मी आधीं १५–२० दिवस आजारी होते, आणि कार्यक्रम कसा पार पडेल ह्याच्या मी काळजींतच होते. पण तंबोऱ्याचे सूर कानावर पडतांक्षणींच मी सर्व आजार विसरून गेले. मला बरं नसलं म्हणजे, कां तें कोण जाणे, मी गाण्यांत आणि नाटकांत नेहमीपेक्षां जास्त रंगते, असा माझा अनुभव आहे. आतां मला पुष्कळच बरं वाटूं लागलं आहे. लंडनला आले की माझी बरीच करमणूक होते. लिव्हरपूलला आपली दुसरी कुणीच मंडळी नसल्यामुळं कांही कांही वेळां फार कंटाळा येतो. किशोर कामावर गेला की तोंड बंद. मराठी तर अजिबात बंद. किशोर परत आल्यावर मी मराठींत कांही बोलायला लागले, की सिल्व्हिया लगेच म्हणते, "Aai, please speak in English." असं वाटतं, दोन ठेवून द्याव्या! पण नको, सासूनं सुनेला मारलं, म्हणून उगीच नांव वाईट व्हायचं. तुझी मात्र क्षणाक्षणाला आठवण होते. गाण्याच्या दिवशीं दादा इतका जवळ असून लंडनला येऊं शकला नाही, ह्याचं मला फारच वाईट वाटलं. अग, आपल्या तिथली गोष्ट वेगळी. माझे तिथं नेहमींच कार्यक्रम होणार; ते ऐकायला दररोज घरचं कोण येणार? पण, लंडनसारख्या ठिकाणीं माझा पहिलाच मोठा कार्यक्रम. आणि मुलगा शेजारच्या गांवीं असूनहि त्याला

कार्यक्रमाला येतां येऊं नये, ह्याचं मला फारच वाईट वाटलं. गाणं खरोखरच चांगलं झालं. तबलजीनं फारच छान साथ केली. तो कार्यक्रम टेप केला आहे. तुला केव्हा तरी तो ऐकायला मिळेलच. त्याचं महत्त्व दोन कारणां-साठीं. पहिलं म्हणजे, लंडनमधला कार्यक्रम म्हणून. दुसरं म्हणजे, १५–२० दिवस आजारी असतांना तब्बल तीन तास गायले. ह्यासाठी मी तर म्हणेन, माझं गाणं अविस्मरणीय झालं. बाकी असे अविस्मरणीय प्रसंग माझ्या आयुष्यांत बरेच वेळां आलेले आहेत. कांही वेळां नाटकांत काम करतांना इतकी चमत्कारिक अवस्था असायची, की आतां जर त्याची आठवण झाली तर अंगावर काटाच उभा राहतो. थोडा ताप, सेप्टिक टॉन्सिल्स, हीं झालीं नित्याचीं दुखणीं. त्याचं मला कांहीच वाटत नसे. एकदां बरं का, बंडुशा, जवळ जवळ ७–८ तास मला एकसारख्या उलट्याच होत होत्या. त्यांत आणखी राधामाईसारखं इमोशनल नाटक. सांगलीला ह्या नाटकाचा प्रयोग होता. त्याच दिवशीं आम्ही दुपारीं बेळगांवहून सांगलीला चाललों होतों. काय झालं कोण जाणे, पण तुला आश्चर्य वाटेल, इतकं पित्त उलटून पडलं, की ते कुठून येत होतं, ह्याचा मला पत्ताच लागेना. त्या स्थितींत मी नाटकाला कसा मेकअप केला, कोण जाणे. स्टेजवर माझी एन्ट्री झाली, आणि गाणं म्हणायला प्रारंभ करणार तोंच थकण्यामुळं डोळ्यांतून पाणी वाहूं लागलं. कसं तरी तोंड बाजूला करून डोळे पुसले, आणि ‘ खेळेल का देव माझिया अंगणीं ’ हें गाणं सुरू केलं,— आणि, नेहमींप्रमाणं मी तो प्रवेश संपवला. प्रत्येक वेळेला प्रवेश संपला की आंत पुनः पित्ताचा तोच कार्यक्रम. माझं ( आणि प्रेक्षकांचं ) नशीब, म्हणून रंगभूमीवर कांही अनुचित घडलं नाही. त्या स्थितींतहि मी गाणीं सुंदर म्हटलीं हं, बंडुशा. एकदां गाणं सुरू केलं, की तोंड आखडतं घ्यायचं नाही. ‘ मला बरं नाही, ’ तेव्हा प्रयोग बंद ठेवा ’ असे शब्द माझ्या तोंडून, मला कितीहि बरं नसलं तरी कधींच निघाले नाहीत. मला बरं नसलं तरी प्रयोग बंद ठेवीत नाहीत, ह्याचा मला राग येई, आणि त्या रागानंच मी कामाला उभी रहात असे. असे कित्येक प्रसंग येऊन गेले. फालतू नखरे, स्वतःचं स्तोम माजवून घेणं, मला ठाऊकच नाही. आमच्याकडे कांही पात्रं तशीं भेटलीं होतीं, मालकाला नाचविणाऱ्यांपैकीं, पण मला तें कधीच जमलं नाही; आणि तसं वागावं

अशी माझी इच्छाहि नाही. तसं वागणं हीन मनोवृत्तीचं लक्षण आहे, असं मला वाटतं. जो आर्टिस्ट मनानं मोठा आहे, केलेशीं निष्ठावंत आहे, तो असं कधीच वागणार नाही. उथळ पाण्याला खळखळाट फार. एवढा आपला बंगला सुखसोयींचा आहे, पण कंपनीबरोबर गेल्यावर कांही वेळां चांगल्या जागेच्या अभावीं मिळेल त्या ठिकाणीं रहावं लागे. जें असेल ते जेवण; कमी गोड, जास्त गोड, असेल तसा चहा; ह्या ज्या संवयी मी लावून घेतल्या त्यामुळं माझं कुठंच अडत नाही. जे मिळेल त्यांतच आनंदानं दिवस काढतां आले पाहिजेत. आपल्या घरांतील स्वच्छतेची डिग्री बाहेर लावून चालत नाही. ताप चढतो आणि वाढतोहि; आपल्या चांगुलपणाचा फायदाहि घेतला जातो. एखादीची— ती काम नीट करणार नाही म्हणून चोख व्यवस्था ठेवली जाते, आणि आम्ही कधींच तोंड उघडीत नाही म्हणून आमच्याकडे फारसं कुणी लक्ष देत नाही. अशा वेळीं नाचणारे आणि नाचवणारे ह्यांचा राग येतो. ह्यांच्याकडे कला आहे म्हणून आदर बाळगावा, पण बाकीच्या बाबतींत हे अगदी शून्य. पैसा, आणि स्वतःची मिजास, आणि द्वेष. नको वाटायचं हें, बंदुशा. कांही वेळां त्यांच्यांत विशेष गुण नसतांना त्या उगाचच भाव मारून दाखवतात, तेव्हा त्यांची फारच चीड येत असे. दुसरी करते म्हणून आपणहि करायचं,— त्या माणसाच्या योग्यतेकडे पूर्ण दुर्लक्ष करून. कीव करावी एवढीच त्यांची योग्यता. 'छोड दो, भाई. अपनेकु क्या करना है? क्या रे?' आम्हाला जशी थोडीशी अक्कल देऊन देवानं पाठवलं आहे तसं वागूं या. खरं की नाही? आपण हाच कित्ता गिरवावा बरं का! असो. आपले संरक्षणमंत्री चव्हाणसाहेब इथं येणार असं कळलं. कुठं तरी त्यांच्या सत्काराच्या वेळीं महाराष्ट्र-गीत मी लंडनमध्ये म्हणणार ह्यांत शंका नाही. आणखी काय, बंटू, गाडी शिकायला सुरवात केलीस का? जरूर शीक. मीहि शिकणार आहे तिथं आल्यावर. बाकी, गाडी माझ्या सहवासाला अंतरली, नाही? पापांची प्रकृति कशी आहे? तिसरं नातवंड भाव खाऊन राहिलं आहे. वाट पाहून तूं, मी, सर्वच थकलों. मोठेपणीं तिनं भाव खाल्ला, तर आपण सांगूं या बरं का तिला, जन्मापासून तुझी ही संवय आहे म्हणून. जर मुलगी झाली, त्यांतून मोठी आर्टिस्ट निघाली, तर भाव मारावाच लागेल;—

तुझ्या आईसारख्या फारच थोड्या ( इति लोक उवाच ) बरं, बंडुशा. तुझ्यासकट सगळ्या पोरट्यांना पापा.

तुझी
आई

ता. क.

आत्तांच गगाचं पत्र आलं. त्यांत निर्मलामावशींचं ऑपरेशन करावं लागेल, असं लिहिलं आहे. काय आहे बिचारीच्या नशिबांत, कोण जाणे! आपत्ति येण्याला कांही सुमार! मला फारच काळजी लागून राहिली आहे. सर्व आहेत म्हणा तिथं. शेवटीं संभाळणारा तो ईश्वरच!

० ० ०

# : १७ :

लिव्हरपूल,
ता. ४-११-१९६४
रात्रौ ११ वाजतां

प्रिय बंदुशा,

पहिली बातमी म्हणजे तुझी वहिनी आज दुपारीं ३–३० वाजतां प्रसूत होऊन मुलगी झाली. बाळ-बाळंतीण खुशाल. नातीला पाहून मला खूप आनंद झाला. कारण, मला नातच हवी होती.

खरं म्हणजे मी इंडियन सोशल क्लबच्या दिवाळी जेवणासाठीं आज लंडनला जायला निघणार होते. उद्यां बरीच बडी मंडळी त्याला येणार आहेत. ब्रिटिश पंतप्रधान हॅरोल्ड विल्सन, आपले हायकमिशनर जीवराज मेहता, हेसुद्धा येणार आहेत. जेवणानंतर माझ्या गाण्याचा कार्यक्रम आहे. पण आज सकाळपासून सिल्व्हियाचं पोट दुखत होतं, तरी पठ्ठीनं आपले सकाळचे सर्व व्यवहार आटोपून घेऊन हॉलमध्ये येऊन बसली होती. कळ आली की तिचा चेहरा एकदम उतरायचा. मी तिच्यासमोर बसून तिला पहात होते. हळूहळू १० चे ११ झाले, ११ चे १२ झाले, तरी हॉस्पिटलमध्ये जाण्याचं तिचं चिन्ह दिसेना. तेव्हा मी तिला म्हटलं, आतां " Sylvia, it is better you leave for the hospital." त्यावर ती मला म्हणाली, " Aai, I know best when to leave." शेवटी जोराच्या कळा सुरू झाल्या, तेव्हा मीच किशोरदादाला म्हटलं, ' ॲम्ब्युलन्स बोलावून घे आणि

तिला घेऊन जा." तेव्हा पट्टी १–३० वाजतां हॉस्पिटलमध्यें गेली. तिथं नर्सेस तिला म्हणाल्या, "तुम्ही आणखी थोडा उशीर केला असता तर तुमची डिलिव्हरी घरींच झाली असती." तिच्या सहनशक्तीची खरोखरच मला कमाल वाटली. हूं की चूं नाही. नाही तर आमच्याकडे बाळंतपणाचा केवढा मोठा बाऊ केला जातो, केवढी मोठी त्याची पूर्वतयारी. तेल लावायला बाई पाहून ठेवायची, डिंक तुपांत भिजवून ठेवायचा, बाळंतिणीची सुपारी करून ठेवायची, बाळंतीण घरीं आल्यावर तिच्या आवडी-निवडीकडे लक्ष न देतां खाण्यापिण्याची तिच्यावर सक्तीच केली जाते. प्रत्येकीनं येऊन वेगळं वेगळं सांगायचं. 'अगबाई, हें का खातां ? तसा नको हं खाऊं– अशा अशा तऱ्हेनं तो डिंक खा. ही सुपारी ? नको, मी पाठवीन हं बिब्बा घातलेली सुपारी." "मला बिब्बा नाही हो आवडत." "न आवडून कसं चालेल, खाल्लाच पाहिजे हो." एरवी आपण त्या बिब्ब्याला किती घाबरतों. पण तुपांत तळून तो बाळंतिणीला खायला घालतात. तीन महिने गरमागरम पाणी. थंड पाण्याचा स्पर्श नाही. आमच्या बाळंतिणींची जिरवायची असेल, तर सगळ्यांना इथं पाठवून द्यावं. बऽरं, तें जाऊं दे

संध्याकाळीं ७–३० वाजतां मी व दादा हॉस्पिटलध्यें गेलों. सिल्व्हिया अगदी खुषींत होती. बिछान्यांत उठून बसली होती. छोकरीचं फक्त तोंड बघायला मिळालं, नि मी कौतुकानं गालाला हात लावायला गेले, तशी सिल्व्हिया एकदम ओरडली, "Aai, Aai, don't touch her." इथं बेबीला स्पर्श करूं देत नाहीत बाकीच्या माणसांना. बेबीच्या दृष्टीनं तें कांही चूक नाही. मी बसले थोबाडींत मारल्यासारखी. असा राग आला होता मला. पण सिल्व्हियाला इतकी हुशारी पाहून मला खूपच बरं वाटलं. उद्यां लंडनला जायचं आहे. जेवणाचं आणि गाण्याचं आमंत्रण घेऊन बसलें आहे; आणि माझं गाणं त्यांनी जाहीरहि केलं आहे. तेव्हा गेलंच पाहिजे. आतां काय, १० दिवस ती हॉस्पिटलमध्येंच असणार. बिचारा नील इतका शहाण्यासारखा वागतो. आई म्हणून कुणी आपली आहे, हें तो विसरलेला दिसतो. कुणाबरोबरहि रमतो. मोठा गोड पोरगा आहे. सिल्व्हियाची आई इथंच आहे म्हणून बरं आहे. नाही तर माझा इथून पाय निघालाच नसता. बरं का, बंदुशा, एक गमतीदार गोष्ट तुझ्या लक्षांत आली

का ? दादाचा जन्म ४ नोव्हेंबरचा, त्याचं लग्न झालं ४ जूनला, नीलचा जन्म ४ मे चा, आणि ही छोकरी ४ नोव्हेंबर. आहे की नाही कमाल ! वाट पाहयला लावून लावून पठी लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं जन्माला आली. मी तिचं भविष्य केलं आहे, बंदू. ही पोरगी खूप नांवलौकिक मिळविणार. असो. हें पत्र मी घाईत लिहीत आहे. दादानं केलेली केबल ह्या पत्राच्या आधी पोचलीच आहे. ती वाचून तुला खूप आनंद झाला असेल. तुझ्यानंतर मुलगी अशी हीच घरांत. पुनः लाडोबा; कारण सुहासचे दोन चिरंजीव, दादाला पहिला मुलगाच. तेव्हा महत्त्व खाऊन आली आहे पोरटी. सर्वांना सांग हं, बंदु, माझी आई चार नातवांची आजी झाली आहे. पण इथं मला आजी मानायला कुणीच तयार नाही. पपांना नमस्कार. बाकी सर्वांना आशीर्वाद.

तुझी
आई

: १८ :

लंडन,

ता. १६-११-१९६४

प्रिय बंदु,

तुझं पत्र पोचलं. मला वाटलंच होतं, तूं अगदी आनंदानं नाचशील म्हणून. तुझ्या वेळीं अगदी अशीच परिस्थिति होती. ह्याहिपेक्षा थोडी जास्त मुलीच्या जन्माच्या स्वागताला उत्सुक. मला तीन मुलांवर तूं झालीस. तेव्हा मुलगीच पाहिजे होतीस सर्वांना. म्हणजे बाहेरच्या ओळखीच्या लोकांनासुद्धा. सगळे जण मला बजावायचे, ' आतां मुलगी झाली पाहिजे बरं का.' अगदी तुमच्यासारखी गाणारी, नाटकांत कामं करणारी, अशी निघाली पाहिजे. कमाल आहे की नाही ग. आतां सांग, इतक्या अटी मान्य करून तुला जन्म दिला,– करणार ना सगळ्यांची इच्छा तृप्त ? आतां सर्व मदार तुझ्यावर. ' बस, हमारा काम हो चुका.' बरं का, बंदुशा, काल महाराष्ट्र मंडळांत श्री. यशवंतराव चव्हाणांना मानपत्र दिलं. मला वाटतं, मागच्या कुठल्या तरी एका पत्रांत मी तुला लिहिलं होतं, की लंडनमध्ये मी महाराष्ट्र-गीत म्हणणार. तें खरं झालं. ५–६ दिवसांपूर्वी मंडळाचे सेक्रेटरी श्री. बिजवे माझ्याकडे आले. ह्या समारंभाच्या वेळीं मी महाराष्ट्र-गीत म्हणावं, अशी सर्वांची इच्छा असल्याचं त्यांनी मला सांगितलं. मी म्हटलं, ' जरूर म्हणेन.' त्याप्रमाणं, समारंभाच्या सुरुवातीला श्री. यशवंतरावांच्या उपस्थितींत महाराष्ट्र-गीत मी लंडनमध्ये मोठ्या अभिमानानं गायले. खरंच, बंदुशा, कालचा माझा दिवस फार

फार चांगला गेला. समारंभाच्या ठिकाणीं यशवंतरावांच्या स्वागताला मी उभी असलेली पाहून ते थक्कच झाले. त्यांनी मला विचारलं, "ज्योत्स्नाबाई, तुम्ही इथं कुठं?" मी म्हटलं, "तुम्ही इथं येणार, ह्यासाठीं महाराष्ट्र-गीत म्हणायला खास आले." अग, तिथं मी असतांना त्यांच्यासमोर किती तरी वेळां महाराष्ट्र-गीत गायले आहे. पण ह्या योगाची अपूर्वाई न्यारीच. नेहमीप्रमाणं त्यांनी थोडक्यांत, सुंदर भाषण केलं. त्यांचं भाषण मला नेहमींच आवडतं. पण आज जास्त आवडण्याचं कारण, ज्ञानेश्वरीबद्दल बोलतांना ते म्हणाले, "हा ग्रंथ एवढा मोलाचा आहे;—त्यांतलं पसायदान तर मला अत्यंत आवडतं. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी मी तें लताच्या गोड गळ्यांतून म्हणवून घेतलं." आणि लगेच माझ्याकडे वळून म्हणतात कसे, "त्या वेळीं ज्योत्स्नाबाई भेटल्या असत्या, तर मी त्यांच्याकडूनच म्हणवून घेतलं असतं." माझं गाणं त्यांना फार आवडतं, हें मला माहीत आहे. कालसुद्धां दोन गाणीं मी त्यांच्याचकरतां गाणार होते, तेव्हा मी त्यांनाच विचारलं, "कुठलीं गाणीं म्हणूं?" तेव्हा ते म्हणाले, "तुम्ही तर दोन-तीनच गाणीं म्हणणार. मला तर तुमचीं सगळींच गाणीं आवडतात! पण आज 'क्षण आला भाग्याचा' म्हणा." मी तें गाणं अगदी मूडमध्ये येऊन म्हटलं. खरंच, मला भाग्याचा क्षण वाटला. सहज एक गोष्ट आठवली, बंदुशा. दोन-तीन वर्षांनी श्री. यशवंतरावांचं ऑपरेशन झालं होतं. ते अगदी अस्वस्थ होते. तेव्हा म्हणे त्यांनी ज्योत्स्नाबाईंची 'माझिया माहेरा' ही रेकॉर्ड लावायला सांगितली होती. ही बातमी वर्तमानपत्रांत आली होती. 'आहे बुवा!' ह्या शब्दांत माझ्या एका मैत्रिणीनं मला ही सांगितली होती. पुष्कळ वेळां मी पाहिलं आहे, बंदू, आजारीपणांत माझी— म्हणजे माझं गाणं ऐकण्याची इच्छा पुष्कळांना झाली आहे. आणि लहान असो किंवा मोठा असो, ही इच्छा मी तृप्त केली आहे.

गेल्या वर्षीं असेच आपले अप्पासाहेब—रँग्लर परांजपे बरेच आजारी होते, आणि त्यांना डॉ. कोयाजींच्या नर्सिंग होममध्यें ठेवलं होतं. ते खूपच नर्व्हस झाले होते. कारण, आयुष्यांत म्हणे पहिल्यांदाच ते इतके आजारी पडले होते. एक दिवस दुपारीं मधुताई आली, आणि म्हणाली, "दुर्गाताई,

अप्पांना तुझं गाणं ऐकायची फार इच्छा झाली आहे. त्यांना बरं नाही. तूं येऊन म्हणशील का त्यांच्यासाठीं एखादं गाणं?" मी विचारलं, "म्हणशील का? कां ग असा प्रश्न विचारतेस? माझं कर्तव्यच आहे तें. आपण आज संध्याकाळींच जाऊं या." त्याप्रमाणं ताई व मी त्यांना तब्बल चार गाणीं गाऊन दाखविलीं. तसे त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. त्यांचा कंठ दाटून आला. मी म्हटलं, "अप्पा, जेव्हा जेव्हा तुम्हांला माझं गाणं ऐकण्याची इच्छा होईल, तेव्हा तेव्हा मला जरूर बोलावून घ्या. मी गाणीं म्हणत जाईन. तुम्हांला बरं वाटणं, हाच माझा आनंद." अग, आनंदाच्या वेळीं कुणीहि आपली आठवण करील. आनंद कुणाला नको असतो? पण माणूस ज्या वेळीं आजारी, दुःखी असतो, त्या वेळीं आपली आठवण होणं हें आपल्या प्रेमाच खरं लक्षण आहे, असं मी समजते. कारण, दुःखांत किंवा आजारीपणांत त्या व्यक्तीला स्वतःच्या विचाराखेरीज दुसरं कांही सुचत नसतं. त्या क्षणीं तो जग विसरलेला असतो अशा वेळीं तो बरं वाटण्याचा आशेचा किरण शोधीत असतो. त्याच प्रसंगीं आपली आठवण व्हावी, ह्याला भाग्य लागतं. १,००० रु. घेऊन मी गाणं केलं असतं, तरी मला आनंद झाला नसता– इतका आनंद अप्पांनी माझं गाणं ऐकण्याची इच्छा दर्शवली त्यानं मला झाला. ज्या व्यक्तीबद्दल प्रेम, आदर, भक्ती असते, अशाच व्यक्तीची त्या वेळीं माणूस आठवण करतं. ती इच्छा कुठं तरी तळाशीं असते. पण जेव्हा का माणसाला दुःखाचे कढ सहन होत नाहीत, तेव्हा ती खडबडून जागी होते. आणि त्याच दुःखानं माणूस खरं सांगतो. मला वाटतं, जर मनुष्य आयुष्यांत कधीं खरं बोलत असेल तर तो दुःखाच्या वेळीं. कारण त्या वेळीं तो असहाय होतो; जग विसरतो. आतां आपली शेवटची घटिका आहे. आतां तरी, देवा, माझी ही इच्छा पूर्ण कर! ही एकच भावना त्याच्या मनांत असते. तुला हें पत्र लिहितांना-सुद्धा, बंदुशा, माझं अंतःकरण भरून आलं आहे. आयुष्यांत खूप पैसा मिळविण्यापेक्षा ह्या ज्या अंतःकरणाला जाऊन भिडणाऱ्या गोष्टी होतात त्या कधीच माणूस विसरत नाही. असे गोड कप्पे माझ्या हृदयांत किती तरी साठले आहेत. प्रसंगाप्रमाणं ते आपोआप उकलतील. आणि अशा कित्येक सुंदर कप्प्यांत माझं हृदय लपल्यामुळं, असं वाटतं, उघड केलं तर

त्यावर सर्व झडप घालतील. आणि तें सुंदर स्वप्न फुटून, तुटून जाईल. माझ्या पोरीलाच त्याचं पावित्र्य कळेल, सर्वांना थोडंच समजणार,– आणि सांगतां येणार ! अग, मासा पाण्यांतच राहील; बाहेर तो तडफडणार नाही का ? तूं आतां म्हणशील, आई मला पत्र लिहिते, का फिलॉसफी सांगते ? नाही का, बंदुशा, मला आवडलं असतं मी फिलॉसफर झाले असते तर. आतां मी लंडनमध्ये आहे ना,– तीन महिन्यांपैकी एक महिना मी लंडनला राहिले असते. पण, काय सांगूं तुला, सर्वांच्या प्रेमानं मी गुदमरून जाते. म्हणतात, " तुम्ही लिव्हरपूलला गेलां तर करमत नाही आम्हांला." कोण जाणे अशी काय जादू भरली आहे माझ्यांत ! ही माझी तारीफ नाही बंदु, वस्तुस्थिति लिहिते आहे मी तुला. कांही वेळां मलाच कळत नाही, कां एवढं प्रेम करतात माझ्यावर. आज एकंदरीनं पत्रलेखन वेगळंच घडलं, नाही का ? ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणं, " जो जें वांच्छील तो तें लाहो, प्राणिजात । " यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तसंच चाललंहि आहे. बरं, असो.

बरं बेवड्या, सध्या इथं चार वाजतांच नऊ वाजण्याइतका काळोख पडतो. कंटाळा येतो अगदी. त्यांत ऑक्टोबरपासून एक तास म्हणे घड्याळ मागं. कहर आहे ह्यांचा, नाही ? आपला कोंबडा कधी एक तास मागं–पुढं करीत होता का ग ? एकंदरींत, इथलं सगळं और आहे एवढं खरं. मला आतां लवकर लिव्हरपूलला जावंसं वाटतं. मुलांची फार आठवण होते; आणि सुनेचीहि. पपांना नमस्कार. पुंडू-गुंडूला गोड पापा. सुहास काय म्हणतो ? बरेच दिवसांत पत्र नाही त्या अवलियाचं. आणि अनिल– नंदा ? सर्वांना आशीर्वाद.

तुझी
आई

० ० ०

: १९ :

लिव्हरपूल,
ता. २६-१२-१९६४
रात्रौ ११ वाजतां

प्रिय बंदुशा,

ह्या वेळेस पत्र लिहिण्यास बराच उशीर होत आहे. कारण, सरकार-स्वारीचा मुक्काम लंडनला होता. मी २० तारखेला लंडनहून इथं आले. नंतर ख्रिसमसची थोडी तयारी. मी आले घरीं, तर तिघंही आजारी होतीं. नीलला खूपच सर्दी-खोकला होता; आतां पूर्ण बरा आहे. आज मुद्दाम पत्र लिहिण्याचं कारण, आज संध्याकाळीं ४ वाजतां हिमवृष्टीला म्हणजे स्नो-फॉलला सुरुवात झाली. म्हटलं, लक्स साबणासारख्या कसल्या फ्लेक्स पडतात खाली. हाहि जाहिरातीचा एक प्रकार आहे की काय? कांही वेळानं पाहते, तों घरं—झाडं सगळीं पांढरीं दिसायला लागलीं. आणि पुनः रात्रीं पाहिलं, तों स्नो-फॉल चालूच होता. मला अगदींच राहवेना, म्हणून एवढी रात्र झाली आहे, तरी तुला पत्र लिहायला बसले आहे. कारण, तूं अमेरिकेहून मला गेल्या वर्षीं पत्रांत लिहिलं होतंस, "आई, जन्माला यावं आणि एकदां तरी बर्फ पडतांना पहावं." स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही, म्हणतात. पण बाहेरचं तें दृश्य पाहून जिवंतपणीं स्वर्ग पाहिल्याचं सुख मिळालं. क्षणभर तर असा भास झाला, की पृथ्वी आपला ख्रिसमस

साजरा करण्याकरितां स्वर्गांत गेली असावी, आणि स्वर्ग खाली उतरला असावा. ओह्! ब्यूटिफुल! अगदी सुंदर विलोभनीय दृश्य आहे तें. झाडं तर इतकीं सुदर दिसतात. आतां सगळीकडे पांढरं शुभ्र दिसतं आहे. जवळ जवळ बर्फाचा २ इंच थर जमिनीवर आहे. तूं पाहिलंच आहेस, म्हणा हें दृश्य आपल्याकडे कधीच बघायला मिळणार नाही, खरं ना. आपल्याकडे वळवाचा पाऊस पडतो, तेव्हा गारा पडतात. त्याचंच मला किती आश्चर्य वाटायचं. बरं का, बंदु, मी पुण्याला प्रथम आले ना, तेव्हा मी 'गारांचा पाऊस' म्हणून एक पुस्तक वाचीत होते गारा म्हणजे काय तें मला माहीत नव्हतं. मी पापांना त्याचा अर्थ विचारला. पापा म्हणाले, 'गारा म्हणजे बर्फाचे तुकडे. पावसांत अभाळांतून खाली पडतात.' मी इतकी हसले आणि म्हटलं, 'कांही तरी काय सांगतां? पावसाबरोबर बर्फ कसा पडेल?' (हें अस्मादिकांचं सायन्सचं ज्ञान) मला खरंच वाटेना. मुंबईला कितीहि धो-धो पाऊस पडला तरी गारा पडतांना कधीच पाहिल्या नव्हत्या. तसंच आमच्या गोव्यालाहि. आणि जेव्हा पुण्यांत गारांचा पाऊस पडला, तेव्हा मला खरं वाटणं भागच पडलं.

सांगायचं कारण, साध्या गारा पाहून आम्हांला किती आनंद व्हायचा. इथं तर सगळं संगमरवरी-पांढरं शुभ्र. खरंच, बंदू, मला वाटलं, बाहेर पडावं आणि नाचावं-अगदी कुण्णाची पर्वा न करतां. खरं अगदी मनांतलं सांगते हं तुला. पहिला पाऊस (मृगाचा) आपल्याकडे पडतो ना, त्या दिवशीं मला अजूनहि खूप आनंद वाटतो. खूप-काय काय खावं असं वाटतं, गावं असं वाटतं, इतकी मी प्रफुल्लित होते. खूप, खूप आनंद होतो मला. एकेका देशांत एकेक गंमत असते, नाही? आज त्यांचा बॉक्सिंग डे. झाला, संपला ख्रिसमस. अगदी आपली दिवाळीच. पण आपल्या दिवाळींत आणि त्यांच्या ख्रिसमसमध्ये किती फरक आहे. आपला तो सण सात्त्विक वाटतो, तर ह्यांचा त्याच्या उलट! दारू पिणं काय, वेडंवाकडं वागणं काय, कशालाहि धरबंध नाही. ख्रिसमस ईव्हला इथल्या मुली कुणालाहि चुंबन घेऊं देतात, म्हणे. कुणीहि किस मागावा, त्याला मुली नकार देत नाहीत. काय एकेक रीति, नाही? आपल्या मुली आपल्याकडे

लगेच त्याचं तोंड रंगवतील. एवढं मात्र खरं, खूप आनंदानं करतात सारं कांही. मी दिवाळीचं उदाहरण दिलं, पण खरं म्हणजे जवळजवळ शिमगाच तो. दिवे लावण्याचं साम्य, म्हणून दिवाळीची उपमा द्यायची, एवढंच. आपल्याकडे पणत्या, तर इथं विजेचे झगझगीत दिवे. जसा पणतींत आणि विजेच्या दिव्यांत फरक आहे, तसाच त्यांच्यांत आणि आपल्यांत आहे. एक झगझगीत, तर दुसरा शान्त; कुणाच्याच डोळ्याला त्रास न देणारा. सजीवता, सात्त्विकता, दिव्यता,—त्या पणतीच्या दिव्यांत दिसतं, नाही ? म्हणूनच मला दिवाळीला पणत्या लावलेल्या आवडतात; आणि कितीहि काम असलं तरी मीच आपल्या घरीं दिवाळीला पणत्याच लावतें, तुला माहीतच आहे.

दिवाळी ! यंदा चुकली मला. तरी बरं, दर वर्षी येते म्हणून. नाही तर आली असती पंचाईत. हें ग काय बंदुशा, तूंहि मला मोठं पत्र लिही ना. फक्त विचारतेस. मला लेखिका बनवायचा विचार दिसतो आहे तुझा ! अशीं पत्रं लिहून लेखिका होतां येतं का ? तशी थोडीशी आधीच झाली आहे; तेव्हा होईनहि, कुणी सांगावं ! बरं, बाया, आतां पत्र पुरं करते हं. मला आतां झोप येत आहे. पुनः रात्रीं एकदा उठून बर्फाचा थर किती वाढला आहे तें पाहीन. घर काय म्हणतं ? तुम्हांलाच करावं लागतं ना सगळं ? मी म्हणतें, नोकर ठेवूंच नये. त्यांनी तरी आपलीं कामं किती करावींत ? इथल्यासारखं आपणच सारं करावं. आपल्याला पसंत आहे हें. बाकी ह्या लोकांची मजा आहे हं. सगळं तयार अन्न त्यांना मिळतं. फ्रोझन फूड. घरीं आणलं की त्यांत काय घालायचं तें घालून खुशाल खा. लहान मुलांसाठीं तर नाना तऱ्हेचं टिन्ड फूड मिळतं इथं. सर्व पौष्टिक.

ह्याच्यावरनं आठवण झाली, मला इथली सर्वांत कुठली गोष्ट आवडली असेल तर हॉस्पिटल्स. केवढंहि मोठं ऑपरेशन असू दे, सर्व कांही मोफत. औषधांना अगदी कमी किंमत. सरकार तुमची खूपच काळजी घेतं. आपल्याकडे मोफत हॉस्पिटल्स् आहेत, पण वरती पुष्कळच खर्च येतो. तुमच्या मुलांच्यासाठीं स्वस्त दुधाची व्यवस्था; त्याचप्रमाणं मूल पोटांत असणाऱ्या आईसाठीं. ह्या कांही गोष्टी इथं फारच चांगल्या आहेत.

आपल्याकडेहि होतील हळूहळू. मी आशा बाळगून आहे. पण वागण्याच्या बाबतींत इथले लोक फारच पुढं पोचलेले. आपल्याला नाही पत्करत, नाही ना ग ? सहज आपलं तुला लिहावंसं वाटलं म्हणून लिहिलं. तुम्ही काय, आमच्याहिपेक्षां जास्त पुढचं पाहून आलांत– म्हणजे अमेरिका. काय विचारतां ! जाऊं दे, झालं. खूप थंडी आहे ग; हात नुसता आखडतो आहे. सारखे बूट वापरून माझ्या पायाचीं बोटं सुजल्यासारखीं झालीं आहेत. पण बर्फांतसुद्धा हिंडून आले. आतां बरंचसं माहीत झालं आहे. भाषा धीरे-धीरे आत्मसात् होत चालली आहे. पूर्ण पचनीं पडली नाही अजून. पुण्याला आल्यावर मात्र पचनीं पाडायची ठरवलं आहे. आणखी काय बंदू ? कंटाळली का, आई घरीं नाही म्हणून ? अभ्यास जोरांत कर. छोटे काय म्हणतात ? आणि बडे ? सर्वांना आशीर्वाद. पापांना नमस्कार. इथं सगळे खुशाल.

तुझी
आई

ता. क.

सकाळीं ११ वाजतां.

आतां पत्र पोस्टांत टाकणार आहे. मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट, बर्फ अजगरासारखा पहुडला आहे, अगदी शान्त व थंड. त्यांत सूर्यमहाराज उगवले आहेत. पण ते त्याहिपेक्षां थंड. इंग्रजांना म्हणे आपले लोक घाबरत होते. तसा सूर्यहि त्यांना घाबरूनच आहे, असं मला वाटतं. त्यांच्याकडे डोळा वर करून बघायची त्याची ताकद नाही. नाही तर आपल्याकडे सहस्र डोळे उघडे ठेवतो की काय, कोण जाणे ! इथं सूर्य कुठला आणि चंद्र कुठला, पत्ताच लागत नाही. सूर्य चंद्राइतकाच शीतल असतो. सकाळीं कधी कधी उगवतो म्हणून त्याला सूर्य म्हणायचं. कित्येक महिने घाबरून, तो तोंडच लपवतो. त्यालासुद्धा इथं न बघण्याजोगं काय आहे, कोण जाणे ! चंद्र मात्र अगदीं मजेंत विहार करीत असतो. प्रणयी जोडप्यांना

चंद्र नेहमीच प्रिय असतो. समुद्राला जशी भरती येते तसा प्रेमिकांनाहि चांदण्यांत बहर येतो, असं म्हणतात. (बऱ्याच कविता वाचल्या आहेत, म्हणून हा दाखला.) तेव्हा चंद्राला घाबरण्याचं कारण नाही. त्याला संवयीचं वाटत असेल. कांही का असेना, मला एवढाच आनंद आहे, की सूर्य-महाराजांनी आम्हांला थंड ठेवलं आहे. हाश्य हुश्य कांही नाही. उलट हुः हुः हुः म्हणून चिक्कार कपडे चढवावे लागतात अंगावर. तीं चिलखतं घालायला इतका कंटाळा येतो, पण करणार काय? इ इ–ला ऽ ज नाही!

—आई

० ० ०

## : २० :

लिव्हरपूल,
१२-१-१९६५

प्रिय बेबड्या,

आज सकाळींच तुझं आणि पप्पांचं पत्र मिळालं. वाचून किती आनंद झाला म्हणून सांगूं ! मोजतां आला असता तर टनावारी सांगितला असता. प्रेम मोजायला कुठला तराजू किंवा डिग्री लावावी हें कांहीं समजत नाही. ऐवढे मोठमोठाले शोध लावतात, पण कोण कुणावर किती प्रेम किंवा माया करतो हें कळायला कांहीं मार्ग नाही. कारण प्रत्येक माणसाची प्रेम व्यक्त करण्याची तऱ्हा वेगळी असते. कुणाची माया पोटांत असते, कुणी खूप बोलून दाखवतात—कुणी कशी, कुणी कशी. हें बघ, आधीच मी तुला लिहावं की नाही ? वा रे पठ्ठे, पहिलं बक्षीस मिळवलंस, आणि तेंहि गळा खराब असतांना. अशी जिद्द पाहिजे. खरंच, बंदुशा, मी पाहिजे होते तिथं. गोरख कल्याण गायलीस, होय ! कमाल तुझी ! अगदी चांगली मेहनत करून-सुद्धा कांहीं वेळां मुष्किल होऊन जातो तो राग ! एकंदरींत ६५ सालीं यूथ फेस्टिव्हलमध्यें माझी बंदुशा पहिली आली. ' मेरे पितर सरग भये ! ' तूं मॅट्रिक झालीस तेव्हा गाण्यांत एस् एस्. सी. त पहिली आलीस. इंग्लिशमध्यें शाळेंत पहिली आलीस. तेव्हा तुला बक्षिसं मिळालीं होतीं, नाही ? आपल्याला मिळालेलं बक्षीस, मग तें एका पैशाचं नाणं का असे ना, केवढा अभिमान वाटतो, नाही ! बरं का, मी मुंबईला शाळेंत होते, तेव्हा सगळ्या शाळांच्या गाण्याच्या स्पर्धा होत असत. त्या वेळीं मी

आग्रेवाडीच्या शाळेंत होते. कितवींत होते, तें कांही आठवत नाही. बहुधा तिसरींत असेन. बालपणीं माझा आवाज खूपच गोड होता म्हणे. म्हणून शाळेंतून माझी स्पर्धेसाठीं निवड झाली होती. म्हणतां म्हणतां स्पर्धेचा दिवस येऊन ठेपला. त्याच्या आदल्याच दिवशीं लॅमिंग्टन म्युनिसिपल शाळेंत सगळ्या मुलींची गाण्याची चाचणी होणार होती, त्याप्रमाणं आम्ही शाळेंत जमलों. कांही मुलींनी दिवसभर तोंडांत लवंगा धरून आधींच आपल्या घशाचं खोबरं करून ठेवलं होतं. आणि मलाहि त्यांचा आग्रह चालला होता, "ए दुर्गा, लवंगा घे ना." गायनमास्तर आले होतेच. दोन-चार शाळांच्या मुलींचीं गाणीं झाल्यावर माझं गाणं झालं. त्या वेळीं लॅमिंग्टन शाळेच्या हेडमास्तरीण शान्ताबाई नाडकर्णी म्हणून होत्या. चहा-कॉफी-फराळ झाल्यावर मला शाळेचा गडी निरोप घेऊन आला, "दुर्गा केळेकरला मोठ्या बाईंनी हपिसांत बोलावलं आहे." मी घाबरूनच गेले ग. न जाऊन चालण्यासारखं नव्हतं. मनांत म्हटलं, 'बाईंना माझं गाणं आवडलं नाही की काय?' भीतभीतच ऑफिसांत गेले. बाई खुर्चीवर बसल्या होत्या, त्या एकदम उठल्या, मला मिठींत घेतलं, आणि माझ्या तोंडावरून हात फिरवीत म्हणाल्या, "किती ग गोड गळा दिला आहे तुला परमेश्वरानं!" त्या आणखी म्हणाल्या, "माझ्यासाठीं म्हणशील का तें गाणं पुन:?" मीं लगेच सुरुवात केली. अजूनहि मला तें गाणं आठवतं. 'बोल ब्रिज लाला रे' ह्या गाण्याच्या चालीवर 'मोल हरिनामाचे हृदयीं न दिसे' असं तें गाणं होतं. गाणं संपल्यावर मी भीतभीतच बाईंच्याकडे पाहिलं, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहतांना दिसले. मला कळेना, ह्या रडतात कां म्हणून. पुन: तेच त्यांचे उद्गार, "पोरी, कुठलं ग पुण्य केलं होतंस असा गळा मिळवायला?" मला माझा गळा किती गोड आहे ह्याची कल्पनाच नव्हती. ज्याच्याजवळ जो गुण असतो तो दुसऱ्यानं पारखावा लागतो. उसाला काय माहीत आपण किती गोड आहों तें. त्याला दुसऱ्यानंच चाखावा लागतो; तेव्हाच त्याची गोडी कळते. कस्तुरीमृग म्हणे—कुठून जीव घेणारा वास येतो म्हणून जीव जाईपर्यंत तो शोधायला धावत सुटतो. पण तो वास त्याच्या स्वत:मध्येच आहे, हें कांही त्याला कळत नाही. असं होतं पुष्कळ वेळां.

आपल्यापेक्षां दुसऱ्यालाच बरं का वाईट हें जास्त चांगलं कळतं. नंतर बाई काय म्हणाल्या माहीत आहे का? " त्या शाळेंतून नांव काढ आणि माझ्या शाळेंत ये. येशील ना?" मी काय उत्तर देणार? ' हो ' म्हटलं. खरोखरच काय योगायोग, आम्ही राहण्याची जागा बदलली आणि बाईंच्या शाळेच्या जवळ रहायला आलों. आणि अस्मादिकांचं नांव लॅमिंग्टन रोडवरच्या शाळेंत दाखल झालं. बाईंचा आनंद गगनांत मावेना. दुर्गा म्हणजे शाळेचं एक ' प्रस्थ ' होऊन राहिलं. शाळा पाह्यला कुणी आलं, की लागलीच दुर्गाला बोलवा. झालं. आम्ही चाललों गाणं म्हणायला. असं हें रोज चालायचं बघ. मलाहि अभ्यासापेक्षां गाणंच जास्त आवडायचं. मग वर्गशिक्षिका सांगायच्या, " चला, बोलावणं आलंय,—शाळा सोडा आणि गाणंच करा आतां." बिचारी कुठं आहे आतां कुणास ठाऊक. या वेळीं जर भेटली असती तर तोंडभर साखर घातली असती,—बेहेत्तर रेशनिंग असलं तरी,—आणि मिठी मारून सांगितलं असतं, " किती त्रिकालज्ञानी मुनीप्रमाणं खरं झालं तुमचं म्हणणं; असंच कांही चांगलं बोला."

अग हो, तुझं पत्र वाचल्याबरोबर मी काय केलं तें लिहिलंच नाही. असंच कांही होतं बघ माझं. दादाच्या हॉलमध्यें तुझा अमेरिकेंत काढलेला, गाउन आणि गोंड्याची टोपी घातलेला फोटो आहे. त्याचा पापा घेतला, आणि म्हटलं, ह्याच टोपीला आणखी एक फीत लागली. असंच चालूं दे, बंदुशा. मला गाणं अतिशय आवडत होतं. त्यामुळं शिक्षणाकडे दुर्लक्ष झालं. पण तुझं तसं नाही होतां कामा. एकदां बी. ए. झालीस की वाटेल तेवढी प्रॅक्टिस करा. गाण्याबरोबर तुझं शिक्षणहि झालं म्हणजे तुझं कुठं अडणार नाही. मला राहून राहून वाईट वाटतं, की लहानपणी मी इंग्रजी शिकले असते तर किती बरं झालं असतं. नाही म्हटलं तरी थोडं अडतंच. बोलण्याची खूप प्रॅक्टिस असावी लागते. नाही तर, घसरगुंडीवर मनुष्य बसतो, तो खाली केव्हा पोचेल हें त्याला कळत नाही, तसाच कांहीसा प्रकार होतो. जाऊं दे; जवळजवळ अर्धशतक ओलांडण्याची वेळ आली आहे. असो. प्रॅक्टिस रोज होईल तेवढी कर. गळा फिरता पाहिजे. अग, कलेसारखा कशांतच आनंद नाही. हजारों लोकांना एकाच वेळीं एकच जण आनंद देऊं शकतो. कुणी दुःखी असला तर त्या वेळेपुरता

तरी तें विसरायला लावतो. हें थोडं का आहे? एखाद्या दिवशीं गाणं फारच जमलं म्हणजे त्या वेळीं इतका आनंद होतो, त्याच्याइतकं सुख– दुसरं कुठलंहि सुख आयुष्यांत उपभोगण्यांत नाही, असं मला वाटतं. कांही वेळां, आपलं गाणं आपल्यालाच बेचैन करतं. मला तर कांही वेळां असा अनुभव येतो की, गाणं म्हणतां म्हणतां गळा दाटून येतो. डोळे भरून येतात. जे स्वर लागायला पाहिजेत तसे लागले म्हणजे तीर घुसल्यासारखा आपल्यावरच त्याचा परिणाम होतो. मी तर फार वेळां बेचैन होते अशी. माझाच आवाज मला ऐकवेनासा होतो. म्हणावंसं वाटतं, " थांब, पुरे कर; आतां मलाच सहन होत नाही. त्यांत खूप भावनाप्रधान एखादं भावगीत असलं म्हणजे झालंच. माझी मलाच मग लाज वाटते. गाणं संपवून उठल्यावर कांही जण विचारतात, " सरदी झाली आहे वाटतं तुम्हांला ? " त्यांना बिचाऱ्यांना काय माहीत, की आनंद पोटांत मावेनासा झाला की नाका-तोंडांतून, डोळ्यांतून वाट फुटेल तिथून बाहेर पडायला पाहतो. कांही रागिणी तर अशा आहेत की ' जवाब नहीं ! ' शंभर नंबरी सोन्याची लगडी घडविणारा सोनार चांगला असला, म्हणजे त्याची किंमत काय सांगावी ? संगीतकलेला सर्वांत मोठा मान आहे, बंदू. अगदी वरच्या स्थानावर विराजमान झालेली आहे ती कला. तेव्हा तिचा वापर तिच्या योग्यतेप्रमाणंच झाला पाहिजे. कमी गायलीस तरी चालेल, पण सूर सोडतां कामा नये. आपण सुरांत असलों तर नुसता तंबोरासुद्धा पुरतो; आणि तंबोऱ्यावरच जास्त प्रॅक्टिस झाली पाहिजे. गाणं म्हणण्याची संधी येईल तेव्हा तेव्हा गात जा. तेवढीच जास्त प्रॅक्टिस. त्यांतूनच आपण तयार होतों. मागं राहूं नकोस. जिद्द असावी, पण गर्व नको. माझ्या लहानपणची एक गोष्ट आठवली म्हणून तुला सांगते. मला कुणी गाणं म्हण म्हटलं की माझी रेकॉर्ड सुरू व्हायची. जेवढीं पदं येतील तेवढीं दम न खातां म्हणायची; ऐकणारांचा विचार मी करीत नसे. तो त्यांनीच सांगायच्या आधीं करावा. बेबड्या, मला खूप खूप आनंद झाला हं, तुझ्या पत्रांतला मजकूर वाचून. मागच्या एका पत्रांत मी तुला लिहिलंच होतं, की अशा अशा अपेक्षा तूं पुऱ्या करणार ना. आतां तूं मला न सांगतां उत्तर मिळालं. आगे बढो. ' रुकना तेरा काम नहीं, चलना तेरी शान.' खरं सांगायचं म्हणजे केव्हा तुला कडकडून मिठी

मारीन असं झालं आहे. पण हा प्रान्त एकदां डोळ्याखालून घालायचं ठरवलं आहे. पण डोळे मात्र तिकडे लागले आहेत. सर्व ठीक. गीता मोठी गोड दिसते. नील गवई होणार अशीं चिन्हं दिसतात. सध्या भूप रागांत तयार होत आहे, स्वारी. 'पीऽया' एवढं छान म्हणतो. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, अशी म्हण आहे. कळेलच पुढं. पुंडू-गुंडू काय म्हणतात? त्यांना गोड गोड पापा दे. सुहास-नंदा-अनिल ह्यांस आशीर्वाद. पापांना नमस्कार. तुला गोड मोठा पापा. ( दम न सुटणाऱ्या तानेएवढा. )

तुझी
आई

ता. क.

तूं म्हणशील, गाण्याची चढाओढ लिहिलीस, पण निकाल काय झाला तें कळवलं नाहीस. खरंच, मी लेखिका झाले नाही, हें एका परी बरंच झालं, नाही? वाचकांचे हाल झाले असते. माझा पहिला नंबर आला होता, आणि मला सोन्याचं फूल बक्षीस मिळालं होतं. (तरी बाई माझ्यावरच खूष होत्या. )

० ० ०

## : २१ :

लिव्हरपूल,
फेब्रुवारी, १९६४

प्रिय बंदुशा,

आज तुला ब-याच दिवसांनी पत्र लिहीत आहे. तुला मी मागच्या पत्रांत लिहिलंच होतं, की मी दीक्षितमामा, सौ. मामी (मुक्ताबाई), व सौ. कावेरी पोतनीस एवढी मंडळी पाँडेचरीला जाणार म्हणून. एकदां केव्हा तरी सहज मी दीक्षितमामाला म्हटलं होतं, की तुम्ही पुनः केव्हा जाल तेव्हा मी तुमच्याबरोबर येईन. यंदा ते जाणार होते, तेव्हा त्यांनी ही बातमी पाँडेचरीला कळविली. आणि त्याहि लोकांनी लगेच मी येणार म्हणून माझा प्रोग्रॅमहि ठरवून टाकला. त्यामुळं मला जावंच लागलं. इच्छा होती, ही गोष्ट वेगळीच.

हा सर्व थोर विभूतींचा प्रवास भल्या मोठ्या मद्रास जनतेनं करायचं ठरलं होतं. त्याप्रमाणं, सर्वांत 'उच्च क्लास' म्हणजे जनता ह्यांत आरूढ (हा शब्द अश्वारूढलाच वापरतात) म्हणजे बाकारूढ होऊन मद्रासला जायला निघालों. तूं म्हणशील, कशी ग तूं, आई, थर्डमध्यें बसून मद्रासपर्यंत गेलीस. नाही हं, आम्हीं वर जास्त पैसे मोजले होते, आम्हाला झोपतां यावं म्हणून. आहेस कुठ, तूं? ढेकणांमुळं झोप आली नाही, त्याला बिचारी रेल्वे काय करणार? अर्थात् त्यांना न जुमानतां डाराढूर

झोपणारे खूप मनष्यप्राणी आहेत. पण आम्हीं त्यांचा मान राखला. त्यांनी मात्र जागेपणीच आमच्यावर हल्ला चढवला. मस्त इंजेक्शन देत होते. पण काय सांगू तुला ? हात भलताच हलका. सुई टोचलेली कळतच नसे. एखादा ढेकूण फटकन हातांतच सापडायचा. काय म्हणून बघायला गेलं, की नुसतं लाल रक्त लागायचं. म्हटलं, हें आपलंच ! ब्लड बँकेला दिलं असं समजून गप्प बसायचं, झालं. अशा नाना करमणुकींतून आम्ही प्रवास करीत होतों.

मुक्ताबाईंनी जगाच्या प्रवासाला निघावं तशी सामुग्री बरोबर घेतली होती. असला नवरा बरोबर म्हणून काय झालं, फार तर धोतरं चार जास्त घेतलीं. पण इथं ? अं हं. सर्व कांही भरपूर होतं. त्यांत नुसती पाँडिचरीच काय, हिमालयालासुद्धा आम्हीं भेट देऊन, पुनः वजन वाढवून, उरलेलं बरोबर घरीं घेऊन आलों असतों. जवळ इतकं भरपूर असतांनासुद्धा एका स्टेशनवर जेवणाचीं ताटं मागविलीं; दही कमी पडेल म्हणून दीक्षितांची स्वारी खालीं उतरली. आम्ही “ नको, नको ” म्हणतों, पण ऐकतोय कोण ? पठ्ठे उतरलेच. ते दही घेऊन येण्याच्या आंत, शिट्टी न देतां गाडी चालू झाली. ( कां, तें कळलं नाही. ) मी तर इतकी घाबरले; म्हटलं, हे मागं राहिले. आतां नंतरच्या कुठल्या गाडीनं येणार ! आमची सर्वांची तिकिटं त्यांच्याच खिशांत होतीं. मला तर जेवण गेलंच नाही; मुक्ताबाई त्याच्या उलट, शान्तपणं जेवत होत्या. मी म्हटलं, “ अहो, ते आले नाहीत, आतां काय करायचं ? ” त्या म्हणाल्या, “ तुमचा हा प्रवास त्यांच्याबरोबर पहिल्यांदाच आहे. ह्या गोष्टीची मला संवय झाली आहे. तासाभरानं पुढच्या स्टेशनावर गाडी थांबली. मी उठून बाहेर जाणार, इतक्यांत दीक्षित महाराजांची स्वारी हातांत दही असलेला ग्लास, अर्धं दही कोटावर सांडून बुटापर्यंत पोचलेलं, अशा स्थितींत, जणु कांही कांहीच घडलं नाही अशा पवित्र्यांत डब्यांत चढत होते. मात्र, तो अवतार पाहून मी पोट धरधरून हसले. आणि बरं का ग, बंदू, सर्वांत गंमत म्हणजे दह्यासाठी दिलेला रुपया, त्यांनी त्याचं दही घेऊनसुद्धा, परत आणला होता. दही घेतलं, पण पैसे देईपर्यंत गाडी सुटली म्हणून धावले, आणि आमच्या मागच्या एअर कंडिशन डब्यांत चढले. बाकी माणूस नशिबवान.

एक तास का होईना, थंड डब्यांत, थंड दह्यासह, फुकटांत आराम केला. माझा जीव मात्र इथं उगाच खाली-वर होत होता. पण त्यांना पाहिल्यावर आतां जीव खालीं पडला. ते मात्र जणुं कांहीच घडलं नाही, अशा आनंदांत जेवूं लागले. हात धुतल्यावर ते म्हणाले, "अग, सुपारी आहे का ?" त्याच्यावर मी म्हटलं, "नसल्यावर, पुनः उतरणार आहांत का ? आतां मद्रास येईपर्यंत जें तुम्हांला पाहिजे तें आम्ही इथं देऊं. पण तुम्ही हालायचं नाही." मस्त सुपारी वगैरे खाऊन झाल्यावर ( हल्लीं त्यांनी पान सोडलं आहे. ) अगदी ऐसपैस गप्पा सुरू झाल्या. शेवटीं, अशा सुखसोयींनी आणि करमणुकींनी युक्त असा आमचा प्रवास संपला, आणि मद्रासला पोंचलों.

माझी मैत्रीण इंदूताई ताम्हणे ( आतां मिसेस जयवंत ) स्टेशनवर आली होती. तिच्याबरोबर तिच्या घरीं गेलों. खूपच मोठा बंगला होता त्यांचा. तिनं खूप आदरातिथ्य केलं आमचं. भटजींना काय म्हणा,–जेवण मस्त मिळालं की खूष. खरोखरच, तिनं इतकं मनापासून केलं सर्व. दुसऱ्या दिवशीं थोडं मद्रास हिंडून आलों. दुपारीं श्री. पाध्ये आमच्यासाठीं आश्रमाची मोटार घेऊन आले होते, त्यांच्याबरोबर पॉंडिचरीला जाण्यास निघालों. रात्रीं आठ–साडेआठच्या सुमारास आम्ही तिथं पोंचलों. एका हॉटेलांत आमची उतरायची सोय केली होती. श्रीमाताजींच्या दर्शनासाठीं आम्ही सर्वच जण उत्सुक होतों, तर मी गाण्यासाठीं आले म्हणून सर्व मंडळींना कोण आनंद झाला होता. बाहेरचे खूपच लोक आले होते. खूप गर्दी होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही आश्रमांत गेलों. सुंदर वातावरण. अगदी शान्त. आश्रमांतील फुलझाडं पाहून मन प्रफुल्लित होतं, तर लगेच अरविंदांची समाधी पाहिली की मन कसं जड होऊन जातं. समाधीवर वहाण्यासाठीं आम्हीं फुलं खरेदी केलीं, त्यांतलीं मला टवटवीत म्हणून शेवंतीचीं आवडलीं, आणि तींच मी घेतलीं. "तुम्ही शेवंतीचीं फुलं घेतलीं, होय !" पाध्यांनी मला विचारलं. मीं म्हटलं, "कां हो ?" त्यावर ते म्हणाले, "माताजींनी पुष्कळशा फुलांना विशेषणं दिलीं आहेत. त्यांत शेवंतीला 'एव्हर फ्रेश' असं म्हटलं आहे. "वा ! मला अगदी हवं तेंच फूल मी उचललं तर !" मी उद्गारले. कारण, माझ्या मनांतली अंतरीची हीच इच्छा आहे, की थकवा ही गोष्ट माझ्या वाट्यास कधीच येऊं नये;

माताजींच्या शेवंतीच्या फुलांच्या वर्णनाप्रमाणं मीहि शेवटपर्यंत ताजं रहावं. २९ फेब्रुवारीला माताजी दर्शन देणार होत्या. सकाळपासून लोकांनी रस्ते कसे फुलून राहिले होते. तुला मुद्दाम सांगण्यासारखी गोष्ट, हजारों लोक होते, पण शान्ति विलक्षण होती. हें तिथलं वैशिष्ट्य. प्रार्थनेच्या वेळेससुद्धा लोक इतके गप्प असतात; फक्त श्वासोच्छ्वास तेवढे ऐकूं येतात. अशी शान्तता मी कुठंच पाहिली नाही. त्यामुळं जे विचार लोकांना ऐकवतात, त्यांत माणूस एकाग्र होतो. असो.

आम्हीं जिथं उतरलों होतों, तिथं फक्त उतरायचीच सोय होती. तेव्हा आम्ही खाली शेजारच्या हॉटेलांत चहासाठी गेलों, तर तिथं फक्त कॉफी. चहाचं नांव नाही. (कमनशिबी कुठले !) सहज मी पाध्यांना म्हटलं, "हें काय, सकाळीं चहा मिळणार नाही वाटतं ? कॉफीच प्यायची ?" त्यांना काय वाटलं, कोण जाणे. दुसऱ्या दिवशीं भल्या पहांटे दार कोण वाजवतो म्हणून पाहिलं, तर हे हातांत चहाची किटली घेऊन दत्त म्हणून उभे. मला इतकं शरमल्यासारखं झालं. मीं म्हटलं, "कशाला मुद्दाम चहा आणलात !" पण दुसऱ्या दिवशीं तोच प्रकार. माझं स्नान वगैरे आटोपून आश्रमांत गेलों. तिथं भेटली सौ. कालिंदी वेलिंगकर. तिनं आपल्या घरीं नेलं. तिची धाकटी मुलगी वृंदा,– प्रथमदर्शनींच तिला माझ्याबद्दल काय प्रेम वाटलं, कोण जाणे. तिनं आईला सांगून "मावशींना त्या हॉटेलमध्यें नको, नाठाजींच्या बंगल्यावर घेऊन जाऊं" म्हणून हट्ट धरला. नाठाजी हे एका मिलचे मॅनेजर आहेत. नको नको म्हणत आम्ही त्या बंगल्यावर रहायला गेलों. बंगला फारच छान होता. खूप मोठाहि होता. त्यांची गाडीहि होती दिमतीला. मग काय विचारतां ? त्या पोरीनं तर इतके कष्ट घेतले आमच्यासाटीं. इतका जिव्हाळा, इतकं प्रेम. मनांत आलं, कां ग बाई इतकं प्रेम लावतेस ? एक दिवस ती नाठाजींना म्हणाली, "मावशी मला इतकी आवडते,–जर ती पुरुष असती तर मी लग्नच केलं असतं."

इच्छा होती, माताजींना खूप जवळून पहावं. पण अलीकडे त्यांची प्रकृति ठीक नसते, म्हणून त्या कुणाची भेट घेत नाहीत. २९ तारखेला आश्रमाच्या गॅलरींत संध्याकाळीं बरोबर ६ वाजतां माताजी उभ्या राहिल्या.

हजारों लोक दर्शनासाठीं खालीं उभे होते. त्या दिवशीं त्यांनी गोल्डन पेहेराव केला होता. मात्र बऱ्याच थकलेल्या वाटत होत्या. मग मी अरविंदांचं विश्रान्तिस्थान पाहिलं. इथं साधुसंतांची ती मठी वाटत नाही. सर्व आश्रम पाहिल्यावर असं वाटतं, आपण एखाद्या पॅलेसमध्ये तर नाही ना? सौंदर्य टिकवणं हें ह्यांचं वैशिष्ट्य. सौंदर्य नष्ट होऊं द्यायचं नाही. सौंदर्य आहे म्हणून जग आहे. तें शेवटपर्यंत टिकवलं पाहिजे. मलाहि हें पटतं. असो.

तिथल्या प्ले-ग्राउंडमध्यें सर्वांच्यासाठीं माझं गाणं झालं. तिथंसुद्धा प्रार्थनेला बसल्यासारखे लोक शान्त बसले होते. माताजींच्यासाठीं मी खास एक तासाचं ( क्लासिकल, भजन आणि तुला मुद्दाम सांगायचं म्हणजे पसाय-दान ) रेकॉर्डिंग करून दिलं. तें सर्व इतकं सुंदर झालं,—माझं दिल खुष झालं ! कांही वेळां असं घडतं खरं. मूड म्हणून यावा लागतो.

चार-पांच दिवसांनी आम्ही मद्रासला परतलों. इथं माझी व दीक्षित-मामांची फारकत झाली. ती मंडळी आली पुण्याला, आणि मी निघाले कोइमतूरला माणिकमामाला भेटण्याकरितां. माझ्याबरोबर माझे साथीदार छोटू गोखले आणि बाळ माटे हे होतेच. कोइमतूरच्या स्टेशनवर पद्मामामी आली होती. माणिकमामा मात्र वरती, टी. इस्टेटवर, शोलियारला होता. लगेच आम्ही वर जाणार होतों, पण रात्रींच पद्मामामींनी कोइमतूरला माझ्या गाण्याचा प्रोग्रॅम ठरविला होता, म्हणून दुसऱ्या दिवशीं टॅक्सी करून आम्ही माणिकमामांकडे गेलों. एक दिवस तिथं मुक्काम करून पुनः खालीं म्हणजे कोइमतूरला आलों, आणि लगेच तिथून मी उटीला गेले. कारण, खानोलकरांनी खूप आग्रहानं मला "तुम्ही उटीला या; मी व सौ. सरोजिनी येतों" अशी तार केली होती. मलाहि कसला भटकण्याचा मूड आला होता, कोण जाणे. गेले उटीला, तर तिथं तें जोडपं आणि त्यांचा मित्र हजर होतेच. दोन-तीन दिवस उटीला हॉटेलमध्यें मुक्काम केला. नंतर म्हैसूर. पुढं बॅंगलोरला एक रात्र राहून स्वारी पुण्याला वापस आली. येतांना दीक्षितमामा बरोबर नसल्यामुळं प्रवासांतील सुरस व चमत्कारिक गोष्टींना मी मुकले. खरं सांगायचं म्हणजे, भटकायला निघालं म्हणजे दिवस

कसे भर्रकन जातात. तेवढाच महिना गेला म्हणजे तुझं येणं जवळ आलं, असं वाटतं. घरीं असले की आठवण. दिवस जाता जात नाही, हेंच रडगाणं चाललेलं असतं. हा माझा प्रवास छानच झाला. पत्र फारच मोठं झालं. आतां खास कांही असलं, तरच तुला एवढं मोठं पत्र लिहीत जाईन. नाही तर पापांच्या पत्रांत एखादं पान लिहीन. छोट्यांना – मोठ्यांना मद्रासहून काय काय आणलं होतं. त्यामुळं मंडळी खूष. तुलाहि एक साडी आणली आहे. तुझ्यासाठीं ती ठेवली आहे. सर्व ठीक.

तुझी

आई

० ० ०

## : २२ :

लंडन,
७-३-१९६५

प्रिय बंदू,

बरेच दिवसांनी तुला विशेष कांही तरी पाहिल्याचं असं पत्र लिहीत आहे. काल मी ' कॅमेलॉट ' हें नाटक पाहिलं. खरोखरच आपण नाटक पहात आहों, की सिनेमा, हें क्षणभर समजेना. काय सीन्स दाखवतात ग ! अगदी मन थक्क होतं. त्यांत कामं करणारेहि चांगले होते. एखादा सीन संपला की तो सीनच्या सीन, थोडा काळोख करून, वर उचलला जायचा. इतकं ह्यांचं सगळं व्यवस्थित कसं होतं, कोण जाणे. आम्हीं तिकडे एखादा सीन जरा वेगळा करायचा म्हटला, तरी त्यांत किती घोटाळे माजतात. नेमके दिवे लावायच्या ऐवजी घालवतील, घालवायच्या वेळेला लावतील; घोटाळेच फार. ' कसं तरी ' हें इथल्या लोकांना माहीतच नसावं. सर्व कसं ठीकठाक असावं लागतं. ही जी त्यांची शिस्तप्रियता आहे, ती मला खूप आवडते. आपल्या इकडे ' होईल रे ' ह्यावर फार अवलंबून राहतात. कुठलीहि गोष्ट करायची म्हटली तर त्याची मांडणी जर सुव्यवस्थित झाली नाही, तर मग त्याचा कांही उपयोग होत नाही. खरं म्हणजे, यंत्रांनी सगळीं कामं होणार. शहर असलं तरी अखेर माणसांनाहि कामं व्यवस्थित करावीं लागतात, कष्ट करावे लागतात. आळस चालत नाही. उदाहरणार्थ, कष्टांना घाबरून, जेवायला बसतील तेव्हा प्रत्येक पदार्थाला वेगळी बशी घेतल्याखेरीज राहणार नाहीत. तेव्हा ती बाई असा विचार करीत नाही,

की ह्या सर्व बशा मला धुवाव्या लागतील. आपण म्हणूं, कशाला इतकीं भांडीं वापरतेस, त्यांतच कर ना. वास्तविक, आपण मोलकरणीला भांडीं घासायला टाकतों, तरी ही तऱ्हा; इथं तर स्वतःलाच सगळं करावं लागतं. त्यांतल्या त्यांत भागवणं त्यांना पसंतच पडत नाही. घरगुती उदाहरण मी कां दिलं, तर साध्या गोष्टींतहि त्यांचा व्यवस्थितपणा दिसतो म्हणून. कंटाळून 'जाऊं दे बाई' असं म्हणून कामं ते ठेवीत नाहीत. नाटकांतून मी एकदम सैंपाघरांत प्रवेश केला, म्हणून तूं हसशील. पण, खरोखरीच मला त्यांचा व्यवस्थितपणा फार, फार आवडतो. आतांपर्यंत मी त्यांचीं दोनच नाटकं पाहिलीं. दुसऱ्या नाटकाचं नांव 'डिफरन्स ऑफ ओपिनिअन.' हें मला आवडलं, पण 'कॅमेलॉट' तेवढं नाही. 'डिफरन्स ऑफ ओपिनिअन'चा सेट त्यांनी छान मांडला होता. एकाच वेळीं त्यांच्या सेक्रेटरी टाइपरायटरवर टाइप करीत बसलेल्या अशा वर दाखवल्या होत्या, आणि वरून दरवाजा साइडनं उघडून ती कामासाठी मालकाकडे येत असे, तो भाग खाली दाखवला होता. त्यांनी सेट मांडला आहे, असं मुळींच वाटत नव्हतं, इतकं तें वास्तवपूर्ण होतं. एकदंरींत, त्यांचं डोकं खूपच चालतं एवढं खरं. आपली रंगभूमि त्या मानानं बिचारी गरीबच, नाही का. आपल्याकडे 'डोकीं' नाहीत असं नाही, त्यांत पैसा आधी ओतावा लागतो, तो नाही. आणि एकाच थिएटरांत सतत प्रयोग लावणं जमत नसल्यामुळं गांवोगांव तें सर्व सामान घेऊन हिंडावं लागतं. त्यामुळं त्याची नासाडी होते. खूप पहावं अशी इच्छा आहे. पण इथं पैशाची थैली सोडून ठेवावी लागते. थैलींतच जर कांही नाही, तर ती सोडून त्यांतून काय बाहेर पडणार ? पौंड पडण्याऐवजी एखाद दुसरं चॉकलेट मात्र बाहेर पडेल. अजून ऑपेरा बघण्याची माझी इच्छा आहे. आणि शेक्सपिअरच्या गांवाला जाऊन त्यांचं एक तरी नाटक. ह्यापेक्षां गरीब पामर (तुझी आई) जास्त काय करणार ? आणखी काय, बंदुशा ? मजेंत आहेस ना ! तूं पटकन म्हणशील, नाही. आतां अभ्यास जोरांत असेल. केलाच पाहिजे, होय ना ? असो. इथं कुणाचे वाढदिवस, जेवणं, सतत चाललीं आहेत. कांही वेळां मी तुमच्यापासून हजारों मैल दूर आहे, असं वाटतच नाही बघ. बरींच आपलीं माणसं भेटतात ना. मी इथं असतांना तुला इकडे बोलवावं, असं

खूप मनांत आहे. तूं केव्हाहि येशील, म्हणा. मला तरी कुठं वाटलं होतं, मी येईन म्हणून. कधी संधी येईल सांगतां येत नाही, एवढं मात्र खरं. पपांना बरं नव्हतं, पपा आतां ठीक आहेत, असं मागच्या पत्रांत होतं. खरंच बरं आहे ना? बाकी, बरं नसलं तरी ते पहांटे उठून वाचत बसलेले असतील. एक पुस्तक बाजूला ठेवा, दुसरं घ्या, एखादा शब्द अडला की लगेच डिक्शनरी काढून तो शब्द आणि त्याचा अर्थ बरोबर आहे की नाही हें चष्मा बाजूला करून पहात असतील. बघ, अजून किती अभ्यासू वृत्ति आहे त्यांची. नाही तर आम्ही. सुहास भय्याचं काय चाललं आहे? दिवसभर ताना मारीत हिंडत असेल. त्याच्या उलट अनिल म्हणत असेल, काय दिवसभर कटकट लावली आहे ह्यानं. नंदा ठीक ना? आमच्या गोड गोड पुड्डू-गुंडूला माझा पापा दे, आणि तुलाहि बरं का.

तुझी

आई

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७३९४८ ...... वि: ९१-प्रवास
क्रमांक ४४४ ...... ५१३१५७
म. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५४८३
स्थळ प्रत



पॅरिस,
२८ मार्च, १९६५

प्रिय बंदुशा,

२५ ला संध्याकाळी आम्ही ' पारी ' म्हणजे पॅरिसला येऊन थडकलों. माझा लंडन सेक्रेटरी प्रभाकर दीक्षित बरोबर होताच. ज्या दिवशीं मी मुंबईहून लंडनला जाण्यास निघाले तेव्हा विमान आपले पंख कुठं कुठं खाली उतरविणार हें मी पाहून ठेवलं होतं. त्यांत पॅरिसहि होतं, त्यामुळं जाता जाता थोडा वेळ का होईना आपण पॅरिसला भेट देणार, म्हणून मला आनंद झाला होता. पण हें स्वप्न जागेपणांतच विरून गेलं. कारण, विमानाचा तिथं ३० मिनिटांचाच हॉल्ट असल्याकारणानं कुणालाच बाहेर पडू दिलं नाही. आणि जैसे थे अशी आमची निराशा झाली. पण म्हणतात ना, अगदी तीव्रतेनं कुठली गोष्ट हवीशी वाटली तर ती मिळाल्याशिवाय सहसा रहात नाही. त्याप्रमाणं परवां मी पॅरिस पाहिलं. एक प्रकारचं विलक्षण कुतूहल होतं मनामध्यें. वाटलं होतं, अगदी गंधर्वनगरी असेल. कल्पनांना काय तोटा ग !

पॅरिसचं लिहिण्याच्या अगोदर तुला प्रवासांतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी लिहायला पाहिजेत. गाण्याच्या प्रोग्रॅमच्या बाबत त्यांच्याशीं ( फ्रेंच असोसिएशनशीं ) खूपशीं पत्रोत्तरें, तारातारी झाल्यावर, जेहेत्ते आम्ही एकदांचे २५ तारखेला सकाळीं टॅक्सीनं व्हिक्टोरिया स्टेशनवर जायला निघालों. नेहमींप्रमाणं लंडन ट्रॅफिक अगदी दाटीनं चालला होता.

त्यांत आमची भर पडली. मला वाटलं होतं, की आपली गाडी नक्की चुकणार. कारण अस्मादिकांचा लंडन सेक्रेटरी वॉटफोर्डहून यायला बराच उशीर झाला होता, आणि त्यांत ह्या ट्रॅफिकच्या मंद गतीची भर. पण त्याचं नशीब जोरांत होतं. 'बाई मला काय म्हणतील', म्हणून तो घाबरूनच होता. नशिबानं टॅक्सीवाला हुशार भेटला होता; त्यानं माझा तंबोरा पाहिला होता; आणि आम्हाला वेळेवर पोचवायला पाहिजे हें त्यानं ओळखलं होतं. माझ्या तंबोऱ्यानं असंच माझं पुष्कळ वेळां रक्षण केलेलं आहे. आम्ही एकदाचे व्हिक्टोरिया स्टेशनवर येऊन पोंचलों, आणि टॅक्सीचं भलं मोठं बिल चुकतं करून आंत गेलों. म्हटलं, लगेच गाडींत शिरावं. पण आमचं रिझर्व्हेशन असलेला डबा लवकर कुठला सांपडायला. इंजनापासून गार्डापर्यंतचे डबे शोधून पाहिले, तेव्हा शेवटच्या डब्यांत आमचं रिझर्व्हेशन आढळलं. मनांत धागधुग होती, की आपल्या डोळ्या-समोरून गाडी निघून जाणार. पण आमचं नशीब बलवत्तर, हेंच खरं. कारण ती गाडी पांच मिनिटं लेट होती. आम्ही गाडींत चढलों आणि निश्चिंत झालों; कारण आतां मात्र मी पॅरिसला नक्की जाणार ह्याची खात्री, आणि त्यामुळं पारा बराच खाली उतरला, अर्थात् माझा.

आम्ही दुपारीं १२ च्या सुमाराला डोव्हरला पोंचलों. इथं ब्रिटिश हद्द संपली. आता डोव्हर ते कॅले हा बोटीचा प्रवास. मला इतकं बरं वाटलं, बंदुशा. मी किती वर्षांत बोटींत बसले नव्हते. लहानपणीं गोव्याला जायचं म्हणजे बोटींतून जात असूं. काय तो आनंद ! अगदी धक्केबुक्के खात आम्ही बोटीवर आपोआपच पोंचत होतों. थोडीशी तशीच परिस्थिति इथंहि झाली. आंत जायला क्यू नव्हता, तेव्हा इतरांच्याप्रमाणं आम्हांला घुसावंच लागलं. बोटींत डेकवर अगदी उघड्यावर बसलों. समुद्राचं दर्शन होतांच अगदी आंतून उचंबळून आलं. मी नकळत हळू आवाजांत गाणीं म्हणूं लागले. आमच्या मागंच एक फ्रेंच पोरगी बसली होती. ती एकदम मला म्हणाली, 'तुझं गाणं मला फार आवडलं.' मी तंद्रींतून जागी झाले. अलीकडे रस्त्यानं जातांनासुद्धा मी गुणगुणते. तू केव्हा केव्हा मला म्हणतेस, "अग आई, रस्त्यांत काय गातेस ?" मी गुणगुणते, हें खरंच मला कांही वेळां कळतच नाही. ह्या प्रवासांत अगदी मनांतून आठवण झाली

असेल तर गोव्याची. फ्रेंच भाषा जवळजवळ पोर्तुगीजसारखीच कानाला वाटते. येतां जातां– बॉन ज्यूऽऽर कॉमाँ तालेव्हू– अशीं वाक्यें कानावर पडत होतं. बरं का, बंदू, अग भाषा येत नसली की फार हाल होतात. पत्ताच लागत नाही ते काय विचारतात त्याचा. तिकिट दाखवा म्हणून तो सांगायचा, आणि आम्ही पासपोर्ट त्याच्या हातांत देत होतों. जेव्हा त्यांनी पासपोर्ट मागावा तेव्हा आम्ही तिकिट बाहेर काढीत होतों. असा गोंधळ व्हायचा. तरी थँक्ससाठीं काय म्हणतात, तें पाठ करून गेलों होतों. नाही तर पाठीवर खायची वेळ आली असती. बोटींत बसतांक्षणींच खरोखर गोव्याकडे माझ्या मनानं धांव घेतली. लहानपणीं मी घरीं जायला निघाले की इतका आनंद व्हायचा,– तो मी तुला कसा सांगूं ? बोट पणजीच्या धक्क्याला लागली आणि सभोंवार तांबडी माती दिसली, की एकदम आईच्या कुशींत शिरल्यासारखं वाटायचं. अडीच वाजतां आम्ही पैलतीरीं पोंचलों. पण इथं कुठंच ती तांबडी माती मी पाहिली नाही.

आता पुनः गाडीचा प्रवास सुरू झाला, आणि आम्ही संध्याकाळीं साडेसहा वाजतां पॅरिसला पोंचलों. प्रभाकरनं आपल्या मित्राला ( सिंहेन्द्र सिन्हा ) स्टेशनवर बोलावलं होतं त्याला पाहून एकदम जीव भांड्यांत पडला. आमच्या डब्यांत इंग्रजी थोडंफार येणारा एक मनुष्य होता. एक बाई आणि तिची मुलगी, आमची तर अशी एकदम गट्टी जमली होता ! ती पोरगी तर मला खूप आवडली;– अगदी दलालांच्या चित्रासारखी दिसत होती. तिची आईसुद्धा हंसतमुख होती. तिच्याकडे माझी नजर गेली की ती पटकन हंसायची. असं एकसारखं व्हायचं, आणि शेवटीं तें हास्य मला हास्यास्पद वाटायला लागलं. पण आमची मैत्री मात्र छान जमली. आम्ही एकमेकींना खायला दिलं, तिनं मला फ्रेन ( काळीकुट्ट कॉफी ) दिली. हा खाण्यापिण्याचा सर्व व्यवहार खाणाखुणांनीच चालला होता. पण सर्व जम्या ! हजार वेळां पासपोर्ट दाखवा, तिकिट दाखवा, कांही येतांना आणलं का त्याची चौकशी; कांही विचारूं नकोस.

गाडी चालूच होती. आणि मनहि त्याच वेगानं धांवत होतं. येऊन जाऊन तें धांव कुठं घेत होतं, माहीत आहे तुला ? आतां घरीं काय

चाललं असेल, तूं काय करीत असशील, तुझे पेपर कसे गेले असतील, छोट्या बाबा-लोकांचं काय चाललं असेल ? पण हे विचार मी करीत होते, तेव्हा तुम्ही तिथं झोपेंत असाल. लंडन ते पॅरिस आम्ही विमानानं न जातां ट्रेननं निघण्याचं कारण म्हणजे जातां जातां कांही पाहतां येईल ही इच्छा. पण विशेष प्रेक्षणीय असं कांही दिसलं नाही. अगदीच माळरान होतं. कांही ठिकाणीं पडकीं घरं. त्यामुळं आपल्या इकडची जास्त आठवण होत होती. गाडी मात्र चांगली होती. थोड्या वेळानं वेटर मध्येच घंटा वाजवीत कांही तरी बडबडून गेला, तेव्हा मी प्रभाकरला म्हटलं, ' चल रे, जेवायचीं पानं मांडलीं वाटतं.' एकंदरीनं, ह्या प्रकारानं आम्हांला इतकं हंसूं आलं,—नाटक कंपन्यांतून अशी घंटा वाजवतात, जेवायला बोलवायचं म्हणजे. पण, नाट्यनिकेतनमध्यें मात्र नाही हं ! असे निरनिराळे प्रकार पाहून मोठी मौज वाटत होती. नाही म्हणतां म्हणतां मी पॅरिसला तर पोंचलेच होते.

पॅरिस ! तूं म्हणशील, पॅरिसमध्यें एवढं काय पाहिलंस ? तशी कांही कल्पनेंतली गंधर्वनगरी पाहिली नाही. पण आता शहर पाहतांना पुनः एकदम आठवण झाली आमच्या गोव्याची. लोक तसेच ऐसपैस. रस्त्यात मोटारी हव्या तशा धांवत होत्या. मी उजव्या बाजूनं गाडी येईल म्हणून थांबायची, तर नेमकी समोरून धडक मारायला यायची. त्यामुळं माझा खूपच गोंधळ उडत असे. लंडनच्या थंडीला मी पार कंटाळले होते, पण नशिबानं पॅरिसला पोंचले आणि हवा एकदम आपल्या पुण्यासारखी वाटली. सूर्यमहाराज अगदी खुषींत आमची सोबत करीत होते. त्यामुळं हिंडतांना मजा वाटत होती. रस्त्यांच्या दुतर्फा आणि मध्येंसुद्धा फुलांचीं झाडं लावलेलीं; त्यामुळं रस्त्याला शोभा आली होती. लोक कॅफेमध्यें, फुटपाथवर, रंगीबेरंगी खुर्च्या टाकून मजेंत बसले होते. तें दृश्य पाहिल्यावर हे फ्रेंच लोक अगदी मनमोकळे असतील असं वाटलं. पणजीलाहि असंच कॅफेच्या-बाहेर खुर्च्या टाकून लोक चहा-कॉफी किंवा सोमरस पीत बसलेले असतात. तीच नेमकी आठवण झाली. फ्रेंच लोकांना रस्त्यांत खात हिंडायची आमच्या गोव्याच्या लोकांसारखीच संवय. मला खूप आवडतं असं खायला. मला चणे तर फार आवडतात; मुंबईला मी ते घ्यायची

आणि खात खातच घरीं जायची. तर गगा माझ्यावर रागवायचा. तो म्हणायचा, रस्त्यांत काय खातेस? आतां मी चटकन सांगेन, पॅरिसमध्यें-सुद्धा असंच खात हिंडतात म्हणून. आतां मी फॉरिन-रिटर्न्ड आहे; नाही कसली डिग्री घेतली तर नाही,– उडत गेली, काय ग, बंदुशा? फॉरिन-रिटर्न्ड तर आहे?

शुक्रवारीं रात्रीं ९–३० वाजतां फ्रेंच सोसायटींत गाण्याच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. हॉल चिक्कार भरला होता. हॉलमध्यें लावलेलीं ओरिएंटल चित्रं पाहून, आपण हिंदुस्थानांतल्याच एखाद्या हॉलमध्यें आहोंत की काय असा क्षणभर भास झाला. १५–२० मंडळी सोडली, तर एकजात सर्व फ्रेंच मंडळी होती. या लोकांनी भारतीय संगीताचा बराच अभ्यास केला असावा. राग, ताल, हे सर्व त्यांना कळत असावेत, असं दिसलं. आम्हांला प्युअर क्लासिकलच हवं आहे, असं त्यांनी अगोदरच कळविलेलं होतं. मी पहिल्याप्रथम गोरख कल्याण गायले; नंतर जलधर केदार. तबल्याच्या साथीला दामु वाडेगांवकरला लंडनहून नेलं होतं. ईश्वरानं त्याच्या बाबतींत कां एवढा अन्याय केला, कोण जाणे. वयाच्या चौथ्या वर्षींच त्याची देवीनं दृष्टि गेली. नांव मात्र देवी, पण येऊन गेली की कांही वेळां कशी भयानक खूण ठेवून जाते. दामूची हुशारी पाहून स्वतः पंडितजींनी आपल्या खासगींतून परदेशांत जाऊन शिक्षण घेण्यासाठी त्याला पैसे दिले होते, ही गोष्ट तो फार मोठ्या अभिमानानं सांगतो. अभ्यासाच्या बाबतींत तो घेत असलेले कष्ट मी पाहिले आहेत. तो त्या मदतीचं पुरेपूर चीज करील अशी माझी खात्री आहे. इंटरनॅशनल लॉ हा त्याच्या अभ्यासाचा विषय आहे. पूर्वजन्मीं ह्यांनीच कुठल्या तरी देवीला नवस करून सांगितलं असावं, माझं अमुक अमुक काम कर; तूं मागशील तें मी तुला देईन. जिथं देवी भेट देते तिथं ती पुनः डोकावीत नाही, म्हणतात. आणि त्याच कारणासाठीं ती त्याच्याकडून घेऊन गेली ती अशी गोष्ट, की तिलासुद्धा पाहणं त्याला शक्य होऊं नये. आणि अशा स्थितींत तो जेव्हा बाहेरचं 'सुंदर' म्हणून वर्णन करतो, तेव्हा आपलं आतडं तुटतं. असं वाटतं, अरे देवा, ह्या बिचाऱ्याला काय माहीत आहे, काय बाहेर आहे तें! पण, मी मनांत म्हटलं, 'दामू, कांही वाईट वाटून घेऊं नकोस. आम्हीं सुंदर बघतों, तें

त्याच क्षणीं विसरून जातों. पण तूं जें पाहून ठेवशील, तें कधीच विसरणार नाहीस. दृष्टि गेलेल्यांना गलिच्छ पहावं लागतच नाही. बिचारा तूं नाही ?— बिचारे आम्हीच !'

कालपासून भटकायला सुरुवात केली आहे. लंडनप्रमाणं इथंहि अंडरग्राउंड रेल्वे आहे. पण लंडनच्या मानानं इथली अगदीच भिकार वाटली. पण त्यांतूनच हिंडणं भाग होतं. कारण, टॅक्सी फार महाग. अग, तुला सांगायचंच राह्यलं. गाण्याच्या हॉलमध्यें इंटरव्हलमध्यें माझी ओळख करून घेण्यासाठी इंदुमति डिके ( मिसेस आर्मलांग ) आली होती. तिनं एका फ्रेंच डॉक्टरांशीं लग्न केलं आहे. स्वभावानं फारच चांगले आहेत ते गृहस्थ. त्या दोघांनी मला आणि प्रभाकरला जेवायला घरीं बोलावलं. जेवायच्या आधी रेकॉर्ड लावली, आणि त्याचे शब्द कानावर पडल्यावर मी एकदम कुठं आहे ह्याचा पत्ताच लागेना. ते शब्द म्हणजे, 'आधीं बीज एकलें' हे होते. तुकाराम सिनेमांतला तो अभंग पॅरिसमध्यें त्यांच्या घरीं ऐकून मी खरोखरीच थक्क झाले. त्यांच्याकडे हिंदी-मराठी गाण्यांचा स्टॉक भरपूर आहे. त्याला आमच्याबद्दल विलक्षण आपलेपणा वाटला. स्वतःच्या गाडींतून त्यांनी आम्हांला पॅरिस दाखवलं. एफेल टॉवर पाहिल्यावर माणसाच्या बुद्धिमत्तेची कल्पना येते. तो टॉवर म्हणजे अजस्र काम आहे. मला वाटतं, लोखंडानं खूपच मिजास मारली मानवाजवळ. 'तुम्ही मला काय वाकवणार ?' त्याची मिजास जिरवण्यासाठीं हा टॉवर बांधला की काय, कोण जाणे ! आम्ही लिफ्टमधून अगदी वरपर्यंत गेलों होतों. स्वर्ग दोनच बोटं उरला, असं वाटायला लागतं. नंतर व्हर्साय हा राजवाडा पाहिला. अजूनहि तो चांगला ठणठणीत उभा आहे.

पॅरिसचं सौंदर्य वाढवणारी सेन नदी शहराच्या मधून वाहते. त्या नदीकिनाऱ्यावर, कलेनं वेडेपिसे झालेले चित्रकार हातांत कुंचले घेऊन रंगांत रंग भरण्याचा प्रयत्न करीत असतात. पुष्कळ चित्रं विकायलाहि ठेवलेलीं होतीं. भीतभीत मी किंमत विचारून पाहिली, पण तुझ्या आईला ती परवडण्यासारखी नव्हती. एकंदरींत हें पॅरिस शहर फार महागच. वरं का, बंडुशा, अंघोळ केली तर ती ३ रुपयांना पडली. अक्षरशः पाणी ओतलं ३ रुपयांवर !

हळूहळू इथला वसंतऋतु सुरू झाला आहे. अगदी खराटे झालेलीं झाडं संजीवनी शिंपडल्याप्रमाणं फुलं घेऊनच तुमच्या स्वागताला सामोरीं येऊं लागलीं आहेत. इतक्या तऱ्हेचीं फुलं आहेत इथं,—फार फार आवडलीं मला.

नुकतेच इथं श्री. बाणवलीकर हे फर्स्ट सेक्रेटरी म्हणून आलेले आहेत. त्यांनी मला सगळ्या बाबतींत खूपच मदत केली. मिसेस बाणवलीकरांनी शॉपिंग एरिआ दाखविली ( डिपार्टमेंटल स्टोअर्स, वगैरे ). प्रभाकरच्या मित्रानं म्हणजे सिन्हानं बरेच कष्ट घेतले. शेवटीं पठ्या मला म्हणतो, ' ज्योत्स्नाजी, तुम्ही पॅरिसला येऊन न जेवतां फक्त हात धुतला; आग्र्याला आलांत पण ताज नाही पाहिला.' तेव्हा मी म्हटलं, ' तुमच्या बोलण्याचा अर्थ नाही मला कळला. ताजशीं बरोबरी करणारं सौंदर्य इथं आहे का ? ' तशी त्यानं विचारलं, " तुम्हीं इथला नाइट क्लब पाहिल्याशिवाय जाणार ? " ह्याला मी काय उत्तर देणार ? मनांत म्हटलं, जी स्त्री लज्जा पांघरून असते, तेव्हाच ती फार सुंदर दिसते. तें वस्त्र बाजूला सारलं, तर स्त्री-सौंदर्यांत आणि पुरुषांत काय फरक उरणार ? आजूबाजूला पुरुष बघत असलेले असतांना अशा स्त्रीचं असलं प्रदर्शन मला सुंदर वाटलंच नसतं. बरं का, बंदुशा, मला या वेळीं आमच्या गोव्याच्या कवींनी, ' शंकर रामाणी ' ह्यांनी लिहिलेल्या कवितेची आठवण झाली. तो म्हणतो, " माझ्या मना मोगरेकळी, फुलत जाल्यार फुलतली. एक सुरीच काळखां कुशींत, रात जागैत परमळतली." तुझ्या लक्षांत आला का अर्थ ? कवी म्हणतो, " जर माझ्या मनांत मोगरेकळी फुलणार असेल, तर ती अशी फुलावी, की एक सुरीच—काळखां कुशींत म्हणजे, मी एकटा, काळोखांत असतांनाच ती फुलावी. सबंध रात्रभर त्या कळीचा वास परिमळत रहावा.'' काय सुंदर कविकल्पना आहे ! मोगरेकळी परिमळत असतांना तुला कुशींत घेऊन झोप आली, तर पाहीन.

तुझी

आई

० ० ०

## : २४ :

कलोन,
१ एप्रिल १९६५

प्रिय बेबी,

आज १ एप्रिल. तुला फूल करायचा बेत नाही, बरं का. नाही तर म्हणशील, आई जर्मनीला पोचली हें खोटंच. ३० तारखेला दुपारीं २ वाजतां आम्ही पॅरिस सोडलं. पॅरिसची ट्रिप चांगली झाली, हें तुला कळवलं होतंच. तिथली आर्ट गॅलरी पाहतां आली नाहीं म्हणून रुखरुख लागून राहिली आहे. चार-पांच दिवसांत सगळं पॅरिस कसं पाहणं शक्य आहे ग? खूप पाहण्यासारखं आहे तिथं. नोत्रदाम हें चर्च एवढं भव्य आहे,– दोन डोळ्यांत सामावलं तेवढं पाहून घेतलं असं म्हणतें. बाकी, दोन डोळ्यांत काय सामावत नाही, म्हणा! असो. खरं म्हणजे, गाडी कलोनला रात्रीं ८ वाजतांच पोंचायची. पण लेट झाली आणि आम्ही १० ला पोंचलों. ज्यांच्याकडे मी उतरणार होते ते श्री. विष्णु काळे हे आधीच स्टेशनवर येऊन गेले. नेमकी त्या वेळी म्हणे एक गाडी आली, त्यांत मी नव्हते. स्टेशनवर उतरल्यावर आमचे हाल कांही विचारूं नकोस. जर्मन भाषा येत नसल्यामुळं कुणाला काय विचारावं, कांहीच कळेना. प्रभाकर दीक्षितनं प्लॅटफॉर्मवर दोन-चार फेऱ्या मारल्या. नंतर तो मी जिथं उभी होते, तिथं जिना उतरून खाली आला आणि म्हणाला, "बाई, कुणी कांही दिसलं नाही. आतां तुम्ही तंबोरा घेऊन बाहेर जा. जर काळे आले असले तर तंबोऱ्यावरून ते तुम्हांला ओळखतील." पण मला

ओळखून काढायला काळे तिथं थांबले होते कुठं ? मी आपली मारते आहे फेऱ्या तंबोरा घेऊन ! इतक्यांत एक महाराष्ट्रीय माणूस दिसला. धीर करून त्याला विचारलं, " तुमचं नांव काय ? " त्यांनी हिंगे म्हणून सांगितलं. मी त्यांना म्हटलं, " कृपा करून माझ्याजवळ हा पत्ता आहे, तिथं कसं जातां येईल तें मला सांगाल का ? " ते म्हणाले, " चला, मी तुम्हांला टॅक्सींत बसवून देतों आणि टॅक्सीवाल्याला पत्ता सांगतों. तो बरोबर नेईल. पण आपलं नांव काय ? " मी म्हटलं, " ज्योत्स्ना भोळे." तशी ' ऑं ! ' म्हणून ते क्षणभर थांबले आणि म्हणाले, " माफ करा हं, इथं काळोख असल्यामुळं मी तुम्हाला ओळखलंच नाही. अहो, लंडनला तुमच्या कॉमनवेल्थ-मधल्या प्रोग्रॅमला मी हजर होतों. मी व माझी बहीण, दोघंहि तुमचे फॅन आहोंत. तुम्हांला पाहून खरोखर मला खूप आनंद झाला. चला, मीच येतों तुमच्याबरोबर." म्हणतात ना, आंधळा मागतो एक डोळा, आणि देव देतो दोन्ही, त्याची मला आठवण झाली. मला इतका उपकार वाटला त्यांचा त्या वेळीं. विचारा प्रभाकर वाट पहात होता. मी एकटीच न येतां कुणाशीं तरी बोलत, हंसत येत असलेली पाहून त्याचाहि चेहरा मोगऱ्याच्या कळ्यांसारखा फुलला. मग आम्ही तिघं टॅक्सींतून काळ्यांच्या घरीं आलों. ते पांचव्या मजल्यावर राहतात, असं हिंगे म्हणाले. कॉलबेल दाबल्यावर थोड्याच वेळानं खालचा दरवाजा आपोआप उघडला आणि समोर तर कुणी दिसेना. मी हिंग्यांना विचारलं, " इथं कुणीच नसतांना दरवाजा कुणी उघडला ? " ते म्हणाले, " इथं हें सगळं ऑटोमॅटिक काम आहे. आपण त्यांच्या फ्लॅटची बेल वाजवली, तशी त्यांनी त्यांचा स्वतःचा दरवाजा उघडला; त्याबरोबर ' तिळा, दार उघड ' प्रमाणं खालचाहि दरवाजा उघडला गेला. ते जर घरांत नसते, तर त्यांचा दरवाजा उघडला न गेल्या-मुळं खालचाहि बंद राहिला असता." आम्ही वर गेलों. स्टेशनवरच्या चुकामुकीच्या घोटाळ्यावर गप्पा झाल्यावर आम्ही झोपीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं काळ्यांच्या बबल कारमधून ( तिला मी पिटुकली नांव दिलं होतं. ) कलोन बघायला बाहेर पडलों. मला फार आवडलं हें शहर. किती स्वच्छ आहे ! जर्मनी म्हटलं, की हिटलरसाहेब डोळ्यांसमोर येतात, नाही ? डिपार्टमेंटल स्टोअर्स एवढीं प्रचंड आहेत,

की लंडनचीं अगदीं छोटीं वाटतात. काय स्वस्त माल ग! खरेदी करायला पण पैसे कुणाजवळ आहेत? आज श्री. टिके यांच्याकडे जेवण्याचं आमत्रण आहे. नुसतं जेवण्याचंच आमंत्रण नाही हं, तर जेवण बनवायचंहि. त्यांची भावी वधू जर्मन मुलगी आहे. कदाचित् तिनं केलेला सैंपाक मला आवडणार नाही, ह्या सबबीवर त्यांनी माझ्याकडून मस्त मसाले चिकन करून घेतली. एका दगडांत दोन पक्षी. ती मंडळी समाधानानं जेवतांना पाहून माझंहि समाधान झालं. तिथंच मला शकू नागेशकर (आतां मिसेस हाकर) हीहि भेटली. रात्रीं ह्या सात-आठ मंडळींना गाणं ऐकवलं. तबला नसतांना काय गाणार, कर्म! तरी आपलं ऐकवलं त्यांना, आणि तेहि खूष झाले. बऱ्याच वर्षांत त्यांना मराठी गाणीं ऐकायला मिळालींच नव्हतीं. विष्णु काळे हे धारवाडकडचे. त्यांच्या बायकोचं नांव प्रभा. आणखी रहा म्हणून त्यांचा खूप आग्रह चालला होता. पण मला लवकर लंडनला जायचं होतं. त्यामुळं जास्त राहू शकले नाही. तिथल्या रेडिओच्या हिंदी विभागासाठीं पांच मिनिटांची माझी हिंदींत मुलाखत झाली.

कलोनवरून आम्ही ब्रुसेल्सला गेलों. तिथं आम्हांला स्टेशनवरून घरीं नेण्यासाठीं मालिनी गोळीकेरी (आतां मिसेस दोमियो) येणार होती. आम्ही पॅरिसहून येणार ह्या कल्पनेनं पॅरिसहून येणारी गाडी पाहून आम्ही आलों नाही ह्या कल्पनेनं परत गेली. म्हणजे इथंहि पुनः फजिती. शेवटीं, स्टेशनच्या जवळच असलेल्या एका हॉटेलांत गेलों, आणि तिथून तिला फोन केला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच ती आम्हांला आपल्या घरीं घेऊन गेली. दिवसभर खूप हिंडलों. एफेल टॉवरसारखंच इथं एक वंडर पाहिलं— ॲटोमियम. केवढं तें चक्र! त्या चक्रांतल्या प्रत्येक गोळ्यांत (आपल्या पोटांत केव्हा तरी उभा राहतो तो कांहीच नाही त्याच्यापुढं) मोठमोठीं हॉटेल्स, दुकानं होतीं. अशीं कांही प्रसिद्ध स्थळं तिनं दाखविलीं. फर्स्ट क्लास जेवण तिनं घरींच केलं होतं. पोटभर जेवलों. परदेशांत आपल्या मंडळींना सुस्थितींत, आनंदांत पाहून मला किती बरं वाटलं! स्वतः मालिनी एम्. ए. आहे. वाचन फारच चांगलं आहे. दोन मुलं व यजमान, आणि मोठं थोरलं घर छानच मॅनेज करते. ४ तारखेला आम्ही लंडनला वापस आलों. लवकर धडपडत येण्याचं कारण, लंडनमध्यें 'कुलवधू'चा

प्रयोग करण्याचा बेत होता. पण म्हणतात ना, जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला, ती स्थिति माझी झाली. माझी अतिशय इच्छा होती, की 'कुलवधू 'चा प्रयोग करायचा आणि त्याचं उत्पन्न लंडनमध्यें मौंटबॅटन यांनी योजलेल्या पंडित नेहरू स्मारकाला द्यायचं. ही एवढी एकच गोष्ट माझ्या मनासारखी झाली नाही, बघ. आणि म्हणूनच ती मनाला लागूनहि राहिली. तुम्हा सर्वांची लवकरच आता भेट होणार म्हणून आनंद होतो, तर किशोर, सिल्व्हिया आणि दोन्ही मुलं ह्यांना सोडून खूपच दूर जाणार ह्याचं वाईट वाटतं. इथंहि सर्वांनी अशी कांही माया लावली आहे,– त्यांतल्या त्यांत प्रभाकर दीक्षितनी तर माझ्यासाठीं खूपच कष्ट घेतले. तो म्हणायचा, "एकसारखं कशाला बोलून दाखवतां ? तुमच्यासाठीं कुणीहि खुषीनं कष्ट घेतले असते." शनिवार-रविवारीं लंडन-मधलीं कांही प्रख्यात स्थळं तो मला दाखवीत असे. फार व्यवस्थितपणा आहे त्याच्या वागण्यांत. अमुक गोष्ट अमक्या दिवशीं, अमक्या वाजतां करायची बरं का, असं त्याला एकदां सांगितलं, म्हणजे आपण अगदी स्वस्थ रहावं. काम करण्याची त्याची पद्धत टापटिपीची. त्याला मी सांगितलं, "प्रभाकर, तूं पुण्याला आलास म्हणजे चार वेळां मस्त जेवण करून वाढीन तुला. तें जेवूनहि जर उपाशी राहिलास तर पोटभर गाणं ऐकवीन." आजीबाईच्या घरीं प्रो. आडारकर, श्री. व सौ. देव, जोशी इत्यादि बऱ्याच मंडळींची ओळख झाली.

शालिनीताई तुंगारे ह्यांनी तर बहीण म्हणून स्टँपच मारला. त्यांनी मोठ्या प्रेमानं आपल्या घरीं ठेवून घेतलं. त्यांना सोडून मलाहि दुसरीकडे रहायला जाववेना. अशी एकंदरींत जिवाला जीव देणारी मंडळी लंडनला भेटली. नशीब थोर म्हटलं पाहिजे, नाही ग, बंदू ? आतां तूं मोठं पत्र पाठव. वाट पहात आहे. सर्वांस नमस्कार. मुलांना पापा.

तुमची
आई

## : २५ :

लंडन,
२६-४-१९६५

प्रिय बंदुशा,

आज बरोबर एका महिन्यानं मी तुझ्याजवळ लंडनच्या गोष्टी समक्षच बोलत असेन. नाही म्हणतां म्हणतां, आठ महिने मी इथं राहिले. आनंदाची गोष्ट म्हणजे बरंचसं पाहून घेतलं. आणि त्याप्रमाणं तुलाहि पत्ररूपानं थोडं थोडं पोंचतं केलं. आतां मात्र संपला हं पत्रव्यवहार— म्हणजे खास असा. नोव्हेंबर महिन्यांत मी केंब्रिजला गेले होते, आणि मला केंब्रिज कसं वाटलं तें तुला कळवलं होतं. पण तें पत्र तुला मिळालंच नाही, असूं तूंहि मला कळविलं होतंस. खरं म्हणजे तुला मी लगेच दुसरं पत्र पाठवायला हवं होतं, पण नेहमींप्रमाणं आळस केला.

केंब्रिजला जातां जातां आधीं नॉरिच् टी. व्ही. वर माझा प्रोग्रॅम होता. किती मिनिटांचा असेल ? इंटरव्ह्यू धरून साडेतीन मिनिटांचा. तुला सांगायचं म्हणजे, अँग्लिआ टी. व्ही. वर मराठी भावगीत ठोकलं— 'नको वळुन बघूं माघारी' गंमत अशी की, माझ्या हातांतला तंबोरा पाहून मी तो वाजवते कसा, ह्याचंच सर्वांना नवल नि कौतुक वाटलं ! अगदी सिनेमा स्टुडिओसारखं वातावरण असतं. स्टुडिओंत जायच्या आधीं थोडासा मेकअपहि करावा लागतो. अर्थात् मला त्यांत कांहीच नवीन नव्हतं. टी. व्ही. स्टेशनवर गेल्यापासून एक गौरांगी

आमच्या दिमतीला दिलेली होती. ती आम्ही तिथून बाहेर पडेपर्यंत आमची काळजी वाहात होती. फारच गोड होती ती छोकरी. कांही आम्ही समजावून सांगितलं, की त्यानंतर ‘ ऑल राइट ’ हें इतकं सुंदर म्हणायची, की तें अजूनहि माझ्या कानांत बसलं आहे. तिथं आल्यावर तुला म्हणून दाखवीन हं ! सारखी मला म्हणायची, ‘ तुमची साडी किती सुंदर आहे, गळ्यांतलं किती छान आहे.’ एकंदरीत, त्यांना आपलं सगळंच सुंदर वाटतं. साडेतीन मिनिटांचा टी. व्ही. कार्यक्रम आटोपल्यावर लगेच गाडींत बसून जायला निघालों गाडींत विशेष गर्दी नव्हती. रात्रीची गाडी होती. ११ वाजता केंब्रिजला पोंचणार होतों. म्हटलं, झोपलों तर झोंप लागून जायची, आणि भलत्याच स्टेशनवर उतरायची पाळी यायची. म्हणून शहाणपणा करून जागंच राह्यचं ठरवलं. मी विचार करीत होतें, लंडनला आल्यापासून काय काय घडलं. इतक्यांत माझी समाधि भंग केली प्रभाकर दीक्षितनी. म्हणाला, “ बाई, अहो ज्योत्स्नाबाई, अशा अगदी चुपचाप कां झालांत ? तीन तास आहेत केंब्रिजला पोंचायला. तेव्हा आम्हांला कांही सुनवा की. मघाशी म्हटलेलं गाणं डास गुणगुणल्याप्रमाणं क्षणांत निघून गेलं. म्हणा ना बाई.” त्याचं नेहमींचं असं टुमणं असायचं. मी तोंड बंद ठेवलेलं त्याला आवडत नसे. चुकून मी त्याला ‘ बागों में पडे झुले ’ ही बरकतअलीची ठुमरी ऐकविली होती. त्या ठुमरीची फर्माईश त्यानं केली. आणि ‘ जाऊं दे रे, जाऊं दे रे—’ म्हणतां म्हणतां हळूहळू मीं नकळत सुरुवात केली, झालं ! एकदां आ केलेलं तोंड लवकर थोडंच बंद होणार ! केंबिज येईपर्यंत एकामागून एक, सारखीं गाणीं चाललीं होतीं. आयता गाडीचा ठेका चालूच होता. बाकी, गाडींत पुष्कळ वेळां नवीन सुचतं, नाही का, बंदू ? मी कांही चिजा, चाली, गाडींतच रचल्या आहेत. बाकी, ती ठुमरी गाडींत इतकी मस्त जमली म्हणून सांगूं ! कारण, बाहेरचं पावसाळी वातावरण त्याला अगदीं पोषक होतं. ‘ सावनका महीना है, साजनसे जुदा रहेकर, जीना कोई जीना है.’ काय काव्य आहे, होय ना, बंदू ? श्रावणांत आपल्याकडे पाऊस असतो, अगदी तसाच बाहेर पाऊस पडत होता. थंडी मी म्हणत होती. ( गाडी ऊबदार होती, म्हणा. ) बैठकींत जमणार नाहीत

अशीं गाणीं जमत चाललीं होतीं. मधून मधून रेल्वेचा अटेंडंट ' आपणहि ऐकतों बरं का ' असं दाखविण्यासाठीं आंत डोकवायचा. त्यांनी मनांत आम्हांला वेड्यांत काढलं असावं. बाकी बरं का, बंदुशा, ही ठुमरी आणि ' भजन बिना–' हें भजन लंडनला भलतंच पॉप्युलर झालं. कुठंहि गायला बसले की आधी ही फरमाईश व्हायची. तीन तासांत बरींच गाणीं ' गळ्यावेगळीं ' केलीं. आमचा सेक्रेटरी अगदी खूष झाला. म्हणाला, " बाई, आतां कुठल्याहि कामाची फरमाईश तुम्ही मला करा, हा बंदा हार जाणार नाही." मी त्याला कसली फरमाईश करणार होते? फक्त ' जरा तंबोरा धर रे,' एवढीच! तीन तास मनसोक्त गाणं ऐकल्यावर पठ्यान काम काय केलं, तर फक्त गाडींतून उतरतांना तंबोरा सांभाळला. कारण, सामान मुळी जास्त नव्हतंच. केंब्रिजला पोचायला १० मिनिटं उरलीं असतील, तेवढ्यांत आमचा डोळा लागला असावा. इतक्यांत एकदम " केंब्रिज, सर " हे शब्द ऐकूं आले, आणि आम्ही पटकन उठून बाहेर पाहिलं, तों एक उंचापुरा माणूस डबे पहात हिंडत असल्याचं दिसलं. आम्ही खाली उतरलों. माझ्या हातांतला तंबोरा पाहून " हॅलो, मिसेस भोळे!" असं म्हणून त्यानं आमचं स्वागत केलं. ( उतरल्यानंतर पुनः तंबोरा माझ्याच हातांत आला होता, हें सांगायला नकोच. ) विल्यम कोट्स ह्या नांवाचे गृहस्थ हेच होते. स्टेशनच्या बाहेर पडल्यावर लागलीच टॅक्सींतून त्यांनी माझी जिथं व्यवस्था केली होती तिथं पोंचवलं, व स्वतः आणि प्रभाकर दीक्षित त्यांच्या घरीं गेले. दुसऱ्या दिवशीं जेवणाचं आमंत्रण आनंद राजवाडे ह्यांच्याकडे होतं. सकाळींच सौ. राजवाडे आमंत्रण देऊन गेली होती. पाऊस आणि थंडी ह्यांनी मी अगदी हैराण झाले होते. जेवण झाल्यावर तिथूनच आम्ही कोट्सच्या घरीं गेलों. घरांत शिरल्याबरोबर गणपति, सरस्वति, विष्णु, ह्या देवांच्या तसबिरी पाहून मी थक्कच झाले. एकंदरींत ह्या गृहस्थांना हिंदुस्थानबद्दल भलतंच प्रेम. जेव्हा त्यांचं लग्न जमण्याच्या बेतांत होतं, तेव्हा त्यांनी आपल्या नियोजित वधूला विचारलं, " हनीमूनला कुठं जायला तुला आवडेल?" तिनं सांगितलं, " इंडियाला." म्हणाला, " ठरलं लग्न!" दोघेहि इतकीं साधीं आहेत. ती आपल्या-सारखाच केसांचा अंबाडा घालते, साडीहि नेसते. कोट्स तर घरांत लुंगी-

मध्येंच वावरत असतात. आपल्या पद्धतीचा सैंपाक ती उत्कृष्ट करते. त्यांना आपली भारतीय बैठक ( गाण्याची ) फार आवडते. म्हणतात, "किती सुंदर वातावरण असतं, तुमच्या गाण्याच्या वेळीं. गागाराचा व ऐकणारांचा कसा एकजीव होतो. किती समरस होतात. नाही तर आमच्याकडे. आर्टिस्टला कांही पत्ताच लागत नाही, श्रोत्यांना गाणं आवडतं का नाही त्याचा." आता परवांच बघ ना. रात्रीं ८॥ ला माझ्यापासूनच गाण्याला सुरुवात झाली. माझ्यानंतर कल्याण मुकर्जी ह्यानं सरोद वाजवला, आनंद राजवाडेनी सतार वाजवली, पुनः माझं गाणं, पुनः आणखी कुणाचं तरी कांही, असं होतां होतां सकाळीं ७ वाजेपर्यंत त्यांनी प्रोग्रॅम चालू ठेवला होता. दर वर्षीं ते एक दिवस रात्रभर अशी बैठक करतात म्हणे. मला खरोखरच धन्य वाटली त्यांची. इंडिया म्हटलं की त्यांचा चेहरा पिकलेल्या आंब्याप्रमाणं लाल होतो. तो पठ्ठ्या रात्रीं ८ पासून सकाळीं ७ पर्यंत खडा होता. अग हो, खरंच, तुला एक सांगायचं राह्यलंच की. गाण्याच्या मध्यंतरांत त्यांच्या सौभाग्यवतीनं कांद्याचीं भजीं बनविलीं होतीं. मला इतकं हसूं आलं;— मी तिला म्हटलं, "हें बघ, पुनः गाणाऱ्यांना गाणं चालू असतांना भजीं कधीं खायला देऊं नकोस." तिला बिचारीला काय माहीत, की भजीं खाल्ल्यावर आवाजाचंहि भजं होतं म्हणून. त्यांना एकुलती एक मुलगी आहे. तिचं नांव त्यांनी नोरा आणि जयंती असं ठेवलं आहे. खरंच, बंदू, अशा वेळी माझ्या मनांत विचार येतात, की आम्ही मात्र ह्यांची नक्कल करण्यांत, त्यांचं संगीत ऐकण्यांत, त्यांच्या चालीरीति उचलण्यांत धन्यता मानतों. इंडियाबद्दल प्रेम वाटणारी बरीच इंग्लिश मंडळी मला भेटली. चव्हाणसाहेबांना हायकमिशनर डॉ. जीवराज मेहता ह्यांनी पार्टी दिली होती. तेव्हा अशीच एका गृहस्थांशीं श्री. ताम्हणकरांनी माझी ओळख करून दिली. तेहि गृहस्थ इंडियाला भेट देऊन आले होते. त्यांना मी विचारलं, "कसं काय वाटलं तुम्हांला, तिथं?" ते म्हणाले, "कसं वाटलं म्हणून काय सांगूं? माझं हार्ट मी तिथंच ठेवून आलों आहे! फार, फार मला आवडला तुमचा देश."

केंब्रिज! मला केंब्रिजचं एवढं मोठं आकर्षण कां होतं, माहीत आहे तुला? आपले पंडितजी तिथल्याच कॉलेजांत शिकले, एवढ्याचसाठीं. मागच्या

वेळीं गेले, तेव्हा गाण्यापेक्षा तें कॉलेज मला पाह्यचं होतं. आणि दुसऱ्याच दिवशी पहिलं काम केलं तें म्हणजे ट्रिनिटी कॉलेज पाह्यलं. आजूबाजूनं कॅम नदी वाहते, त्यांत लहान लहान होड्या सोडलेल्या, पांढरे पांढरे हंस उगाचच इकडून तिकडे हिंडतात. जणूं कांही ह्यांचीच कॉलेजची वेळ झाली आहे ! हें दृश्य पाहून खूप खूप आनंद झाला. किती शान्त वातावरण ! अगदी पहिल्या पुण्यासारखं वाटलं. लहान लहान बोळ, त्यांत सायकलींचा घोळ. एवढाच फरक, की धस्कन अंगावर सायकल घालीत नाहीत. कमाल आहे ह्यांची, नाही ग, बंदुशा ! विद्यार्थ्यांनी इतक्या सभ्यपणानं वागायचं असतं का ग ? पोरींची मस्त थट्टा करावी, सायकली अंगावर घालाव्या, ' फिरवा ना जरा डोळा 'सारखीं कांही तरी गाणीं म्हणावीं;—कोण जाणे, करीतहि असतील. इथलं शान्त वातावरण पाहून वाटलं, ह्या नदीकिनारीं लहानशी झोपडी बांधावी आणि तंबोरा छेडीत गाण्याच्या स्वरांनी तें वातावरण धुंद करीत रहावं. पण एवढं खरं, अभ्यास म्हणून जिथं करायचा असतो, तिथं भडक वातावरण उपयोगी नाही. जेव्हा त्या एकाच गोष्टीवर लक्ष केन्द्रित होतं तेव्हाच तो अभ्यास नीट होतो. तुला मी काय सांगणार ? आम्ही थोडंच कॉलेजांत गेलों आहों ? असो. कोट्सप्रमाणं लंडनला आणखी एक जोडपं भेटलं त्याचं नांव स्पायर. हे संस्कृतचे प्रोफेसर आहेत लंडन युनिव्हर्सिटीमध्यें. त्यांनीच माझ्या गाण्याचा कार्यक्रम तिथं ठेवला होता. तेहि फारच चांगले गृहस्थ आहेत. त्यांचं घर काय सांगूं तुला ? अग नुसत्या पुस्तकांनी भरलं आहे. त्यांच्या घरीं गेल्यावर एकसुद्धा धड खुर्ची तुला बसायला सापडणार नाही. फक्त आपल्या व्यासंगाकडेच त्यांचं लक्ष. बिचारी बायको घरांतलीं काय काय म्हणून कामं करणार ? तीन छोटीं मुलं आहेत त्यांना. हेंहि जोडपं आपल्या संगीताचं प्रेमी आहे. खूपच शौकिन आहेत दोघंहि. त्यांना पाहून माझ्या मनांत नेहमींच विचार येतात, जर हे हिंदुस्थानांत आले, तर पपांचं आणि त्यांचं मस्त जमेल. दुसरे म्हणजे, नानासाहेब. कारण संस्कृत म्हटलं की शकुंतलेला पाहून दुष्यन्ताला जितका हर्ष झाला असेल, तितका नुसता ' संस्कृत ' हा शब्द ऐकून त्यांना होतो. सर्वच दृष्टीनं तो मोठा राजा माणूस आहे. एकंदरींत इथं मला बरेच चांगले लोक भेटले. आणि मला वाटतं, त्यामुळंच मी इथं जास्त वेळ रमले. मात्र

जेव्हा खरी आंतून घरची आठवण होते, तेव्हा वाटतं, "पळा आतां." मागचं तुझं पत्र वाचून असा बेचैन झाला जीव;—तुला कांजिण्या निघाल्या होत्या ना. आणि त्या वेळीं तुला माझी आठवण होते म्हणून तूं माझं जुनं पातळ पांघरून बसली होतीस, असं मला कळवलं. वाचून काय वाटलं म्हणून सांगूं, तुला ? छान, घट्ट असलेलं दूध लिंबू पिळल्यावर जसं एकदम फुटून जातं, तस्सं,—अगदी तस्सं घट्ट असलेल्या ( ? ) माझ्या अंतःकरणाची स्थिति झाली. खरं म्हणजे, मुळांत तें घट्ट नाही. पण तें तसं असल्याचं मी कधी कधी बहाणा करते. एकदम काळजाला हात घातलास की ग. आता लवकर येते हं, वंदू. अगदी थोडे दिवस राहिले आहेत. खरं सांगूं तुला, हल्ली असं वाटायला लागलं आहे, ह्या मायेंतून आतां हळूहळू काढता पाय घ्यावा. मुलांचीं लग्नं झालीं, की कसे आईबापांपासून वेगळे होतात ? तसा प्रयत्न आईनंहि केला पाहिजे. पण तें आईला जमेल का ग ? ह्याचं उत्तर तूं लग्न होऊन गेल्यावर आणि तुला मुलं झाल्यावर दे हं.

तुझी
आई

: २८ :

सिलिशिया स्टीमर,
अँकर लाइन,
६-५-१९६५

प्रिय बंदू,

आज हें पत्र मी तुला बोटीवरून लिहीत आहे. आत्ता संध्याकाळचे ५ वाजले आहेत. नुकताच चहा घेतला आणि मनांत आलं, माझ्या बंदूला पत्र लिहावं. हें पत्र मी डेकवर बसून लिहीत आहे. नुकताच दादा, सिल्व्हिया, नील, प्रीता, मम, आणि ज्यानं लंडन मुक्कामीं अगदी मनोभावे मला मदत केली तो प्रभाकर दीक्षित, ही मंडळी माझा निरोप घेऊन गेल्यावर मला काय वाटलं असेल ? तीं दोन पोरं तर सारखीं डोळ्यांसमोर नाचत होतीं. नील मला खूपच चिकटला होता. माझ्या तंबोऱ्याला त्यानं "आईचा पिया" ही पदवी बहाल केली होती. तरी बरं, तंबोराच होता म्हणून. कारण, मी त्याला भूप राग शिकवीत होते, ( बरं का, त्याचं वय वर्षं पावणे-दोन ) त्यांत पिया हा शब्द आहे ना. म्हणून, तंबोऱ्याला त्यांनी पिया हें नांव ठेवलं. पोरगं मोठं गोड आहे. प्रीता तर इतकी गोड हसते. आणि बरं का, बंदु, दोघांच्या गालाला हसतांना खळी पडते, पण फक्त एकाच बाजूनं. त्यांना सोडतांना मला फारच वाईट वाटलं. गंगा-यमुना येऊं द्यायच्या नाहीत, म्हणून ठरवलं होतं. पण, नदी शेवटी समुद्राला मिळालीच. खाऱ्या पाण्यांत गोड पाणी मिसळून गेलं, आणि पोक्त विचार करून

मीहि हळूहळू पाणी बाजूला सारून बाहेर पडले. पण अतोनात त्रास झाला मनाला. डोळे पुसून आजूबाजूला पाहिलं, तर गोरे व गौरांगी सर्वत्र वावरत होत्या. मध्येंच कांही काळे तीळहि होते. म्हणजे आम्हीच,– ह्या सर्व देखाव्यांत दृष्ट लागूं नये म्हणून. समोर अथांग समुद्र डोळ्यांना दिसतो आहे. देवादिकांनी समुद्रमंथन करून जशीं रत्नं बाहेर काढलीं, तसंच कांहीसं मंथन माझ्याहि पोटांत चालू आहे. त्यांतून काय बाहेर येतं, पाहूं या. जेव्हा कांही घुसळावं, तेव्हाच त्यांतून कांही बाहेर पडतं. ताक घुसळलं की लोणी निघतं. बोटींत बसलं की एक प्रकारं मळमळायला लागतं. आपण म्हणतों नाही का, की बरेच दिवस मळमळत होतं, तें बाहेर पडलं. तशीच कांहीशी माझी स्थिति झाली आहे. आठ महिन्यांचं लंडन वास्तव्य संपलं. आतां घरीं आलं, की सर्व पूर्ववत् रूटिन चालू होणार. मुलं विचारतील, “ आई, हें करूं का, तें करूं का ? ” मीहि तुमच्यावर पुनः दादागिरी करीन. असं हें सर्व सुरू होईल. असो.

पहिली गोष्ट, बोट छान आहे. माझी केबिन तर छानच आहे. केबिनमेटहि चांगली आहे. तिचं नांव गझाला. सगळे किरिस्तांव. “ हांव गोयची आस उलैतां म्हणून माजेर मर्जी.” आतांपर्यंत बरींच पत्रं मी तुला लिहिलीं. माझ्या आयुष्यांत काय काय घडलं, ह्याचा आरसा तुझ्यासमोर धरला. त्यांत तुला काय दिसलं ? बरं दिसलं असेल तें घे. आरसाच तो; जसं आपलं रूप असेल तसं दाखविणारा. आयुष्यांत सगळ्याच गोष्टी मनासारख्या घडतात असं नाही. सगळं सुरळीत झालं, तर मग तें जीवनच नाही. घडामोडी पाहिजेत. थोडक्यांत तुझी आई काय आहे ? जवळ जवळ वयाच्या बाराव्या– तेराव्या वर्षापासून चांगल्यापैकीं गात होते. गाण्याच्या वेडामुळं शाळा होऊं शकली नाही. हें सर्व मागील पत्रांतून तुला लिहिलं आहेच म्हणा. पण वाचनाची आवड आणि चांगल्या लोकांचा सहवास ह्याचा मला खरोखरीच लाभ झाला. लहान वयांतच गाण्यांत नांव झाल्यामुळं तेव्हांपासून बऱ्याचशा लोकांना मी माहीत आहे. मुंबईतल्या प्रभात-फेऱ्यांच्या वेळची ही गोष्ट आहे. एक कार्यक्रम आखला होता. त्यांत मी दोन गाणीं म्हटलीं होतीं, आणि हिंदमातेची भूमिका केली होती. तोंपर्यंत मी फारशी कुणाला माहीत नव्हते. पण, काल भिकारीण,–आणि रात्र

उलटल्यावर आज ती राणी झालेली पहावी, तसंच एका रात्रींत माझं नांव मुंबईभर झालं—दुर्गा केळेकर. " आम्ही उभे राहून गाणं ऐकूं, पांच रुपये देऊं, दहा रुपये देऊं--" इतकीं तीं मी म्हटलेलीं गाणीं सर्वांना आवडलीं होतीं. मग रेडिओ, गाण्याची माझी शिकवणी, हें सर्व सुरू झालं. मला आठवतं, बहुधा त्या वेळीं रेडिओवरील कार्यक्रमासाठी मला फक्त १० रुपये मिळत असत. पण महिन्यांतून पांच सहा वेळ कार्यक्रम मिळत, आणि महिन्याची ५०–६० रुपयांची कमाई होई. नागनाथ खोटे हे त्या वेळीं रेडिओच्या संगीत-विभागाचे प्रमुख होते. आयत्या वेळीं कुणी आलं नाही की " दुर्गा, चल लवकर " असं म्हणून गाडींत घालून मला घेऊन जायचे. त्या वेळीं रेडिओ प्रायव्हेट कंपनीकडे होता. आयुष्यांत अशी एक वेळ यावी लागते, तशी ती आली होती. नंतर खांसाहेब खादिम हुसेनकडे गाणं शिकत होते. बरं का, बंदू, तेव्हांची एक आठवण तुला मुद्दाम सांगण्यासारखी आहे. ती म्हणजे, खांसाहेब खादिम हुसेननी मला कां कोण जाणे, ' पियाको मिलनेकी आस ' ही जोगिया असावरीची ठुमरी शिकवायला सुरुवात केली. मी म्हणूं लागले. ऐकतां ऐकतां ते एकदम गहिंवरून म्हणाले, " बेटा, बंद कर; नहीं गाना. मैं नहीं सुन सकता. आज इतनाहि बस." एकदम त्यांना कां गहिंवरून आलं, कोण जाणे. पण ती आठवण सांगतांना अजूनहि त्यांचे डोळे पाणावतात. नंतरचे गुरुजी म्हणजे खांसाहेब बशिरखां. भाऊच्या म्हणजे तुझ्या मोठ्या मामाच्या ओळखीमुळं पापांची ओळख झाली. त्यांनी मला भावगीतं शिकवलीं. त्यापूर्वीं मी जुन्या मराठी नाटकांतलीं गाणीं म्हणत असे. पण ह्या भावगीतांनी मला नव्या प्रान्तांत आणलं, असं म्हणायला हरकत नाही. भावनांसह गाणं हें त्या भावगीतांनी मला शिकवलं. स्वरांच्या द्वारं तुम्ही दुसऱ्याचं हृदय हालवूं शकतां, हें मला त्या वेळीं कळलं. तोंपर्यंत मी नुसती गात होते. त्यांत भावना असायची की नाही हें आठवत नाही. थोडक्यांत म्हणजे, मला भावगीतांची खूपच गोडी लागली. त्यांतूनच आमचं लग्न झालं. हें आनंदानं कबूल करायला पाहिजे की, पापांच्यासारखा नवरा मिळाला म्हणून माझी गायनकला जिवंत राहिली. नाही तर मी आज कशी असते, कोण जाणे ! आधीं कितीहि आवड असली तरी लग्नानंतर ती कायम राहतेच असं नाही. अशीं पुष्कळ

उदाहरणं मी पाहिलीं आहेत. लग्न झालं की स्त्रीची इतिकर्तव्यता संपली असं वायकांना वाटतं. लहान वयामुळं मलाहि कदाचित् तसं वाटलं असतं. पण पापांनाहि गाण्याची अत्यंत आवड होती, त्यामुळं माझी ती कला जोपासली गेली. नंतर घुसल नाट्य. तो इतिहास मोठा मजेदार आहे. श्री. वर्तक, काणेकर, काळे, नेहमीं आमच्या घरीं यायचे. मला वाटतं, मागच्या एका पत्रांत हें मी तुला लिहिलंच होतं. वर्तकांनी खूपच गळ घातली, म्हणून मी नाटकांत काम करण्याचं पत्करलं. तीन महिन्यांच्या दीर्घ तालमींनंतर आंधळ्यांची शाळा डोळसपणं रंगभूमीवर प्रयोग करूं लागली. खरोखरच, मी आरंभी अभिनयाच्या बाबतींत आंधळी होते. जसजसे प्रयोग होत गेले, तसतसा डोळ्यांवरचा पडदा दूर सरूं लागला, व आपल्यालाहि कांही येतंय ह्याचा प्रकाश दिसूं लागला. मग त्यांत इतकी गोडी वाटूं लागली,– आंधळ्याला दृष्टि आल्यावर कसा आनंद होईल, तशीच थोडीशी माझी स्थिति झाली, असं म्हणायला हरकत नाही. नाट्य-मन्वंतर हें संस्थेचं नांव. खरोखरीच मन्वंतर केलं त्या वेळीं. लोकांना नाटक खूप आवडलं. पण सुशिक्षित वर्गाला. सर्वसाधारण लोकांना तें पेलत नव्हतं, असं म्हणत असत. कांही का असेना, नवीन असं कांही दिलं ह्यांत शंकाच नाही. माझी प्रकृति त्या वेळीं बरीच अशक्त होती. म्हणून कंपनींत मी जास्त दिवस काम करूं शकले नाही. मला वाटतं, एक किंवा दीड वर्ष काम केलं असेल. मात्र, मधून मधून प्रयोग लागले म्हणजे मी काम करीत असे. नंतर जवळ जवळ ८–९ वर्षं मी गाण्याखेरीज कांही केलं नाही. आणि १९४१ सालीं आम्ही नाट्यनिकेतन ही संस्था स्थापन केली. तो इतिहास तुला समग्र लिहायचा, म्हणजे एक ग्रंथच होईल. कधी तरी लिहिण्याचा विचार आहे. २३ वर्षांची ही महत्त्वाची कारकीर्द लिहून ठेवली पाहिजे, नाही का? पत्रांतून जास्त काय लिहिणार ग? तूं कंटाळशीलहि. म्हणून तो इतिहास स्वतंत्र लिहीन.

११-५-१९६५

आज तारीख ११ मे. वरचं पत्र तसंच राहिलं होतं. बोटींत हें असंच व्हायचं. आज माझा वाढदिवस. तुला खूप, खूप आठवण होईल, नाही?

नको, नको म्हटलं तरी कांही तरी वस्तू तूं माझ्यासाठीं आणायचीस. मला खूप खूप बरं वाटत असे. यंदा मात्र मी बोटीवरून, पत्ररूपी का होईना, तुझ्याशीं हितगुज करीत आहे. आणि ११ तारीख कधीहि न चुकविणारे नानासाहेब व ताई. मी माझा वाढदिवस कदाचित् विसरेन, पण ते कधी विसरले नाहीत. अशीं दुनियाभर माझ्यावर प्रेम करणारीं (मी पाहिलेली दुनिया, बरं का) माणसं आहेत, म्हणून आगळाच आनंद आहे आयुष्यांत. आतां आणखी भर पडली लंडनमधल्या मंडळींची. आज खरोखरीच घर दिसतं डोळ्यासमोर. सहा दिवसांनंतर आज बोट वरीच स्थिरस्थावर झाली आहे म्हणायला हरकत नाही. अथांग सागरांत बुडी मारल्यावर कांही तरी हाताला लागेल. पण गेलेल्या जीवनाच्या तळाशीं जाऊन कांही हाताला लागतं का पाहण्याचा खूप प्रयत्न करते. नीटसं कांही गवसलं असं वाटत नाही. तुला वाटेल का ? हीं पत्रं वाचून खूप घडलं, ह्यांत शंकाच नाही; पण त्यांतलं तुला काय देतां आलं ? काय चांगलं वाटलं ? चांगलं तेवढं जरूर उपयोगांत आण. कांही वेळां खारं पाणी लागतं, पण तेंसुद्धा जीवनाला चैतन्य आणतं. मीठ नसेल तर जेवण बेचव होईल. तसंच जीवनाचं आहे. साखरहि हवी, मीठहि हवं. तरच त्यांत गोडी. आतां कांही ठळक गोष्टी मी तुला लिहिणार आहे.

मी सात-आठ वर्षांची झाल्यापासून माझं सगळं लहानपण मुंबईतच गेलं. मुंबईतल्या शाळेंत मराठी चौथी-पांचवीपर्यंत शिकले. मागं एका पत्रांत तुला मी लिहिलंच होतं, कीं मी क्लासिकल फार छान गात असे. त्यांत तुला मुद्दाम सांगण्यासारखं म्हणजे, कुणीहि मोठा गवई समोर बसला, तरी भीति हा शब्द माझ्या कोशांत नव्हता. खरं म्हणजे, मी चांगल्यापैकी (डान्सर) नर्तिका झाले असते. पण मी नाचायचं कां सोडलं कोण जाणे. सुखदेवप्रसादांच्याजवळ मी कथ्थक नृत्य शिकले होते. काय सांगूं तुला, माझे पाय तर इतके तयार होते, आणि अंगानं पण हलकी असल्यामुळं फार तयारींत नाचत असे. लहानपणीं मला गाण्याइतकाच नाच पण आवडत असे ग. अजूनहि कुणाचं चांगलं नृत्य पाहिलं कीं पाय थरथरूं लागतात. आतां, त्यांतून कांही निघणार नाही ही गोष्ट वेगळी. तूं विचारशील, इतकं चांगलं नाचत होतीस तर मग नाच कां

बंद केलास ? त्या वेळीं अस्मादिकांना भयंकर मलेरिया झाला, आणि त्या आजारांत मी नाचाचे बोल पार विसरले. नाही म्हणायला मी हार्मोनियमहि चांगला वाजवीत असे. शिवणकाम तर मला फार आवडायचं. दिवसाला एक ब्लाउज तर शिवायचीच, आणि सतत वडील बहिणीला ते घालावे लागत असल्यानं ती कंटाळायची. माझं ब्लाउज बेतणं तिच्या बिचारीच्या जिवावर बेतायचं, असं म्हणायला हरकत नाही. नेहमींच वाढत्या अंगाचं माप– असं हें शिवण झालं. जें दुसऱ्याला येतं, तें मला आलंच पाहिजे, हा अट्टाहास. गाण्यांतहि असाच हट्ट. ताईमावशीला मी म्हणायची, “ तूं मात्र गातांना ताना मारतेस, मला मात्र सावकाश सूर शिकवतेस. मला ह्याच ताना शिकव.” ती बिचारी माझ्या मूर्खपणाला हंसायची. बालगायिका म्हणून रेडिओवर खूप कौतुकानं प्रसिद्ध. हा काळ झाला पंचमापर्यंत.

आता पंचम ते वरचा सा फार महत्त्वाचा आहे. एवढं कबूल करायलाच पाहिजे, की लग्नानंतर शनिमहाराजांनी ( मला लहानपणीं साडेसाती होती म्हणे ) मला एकदम सुख देण्याचं ठरविलं. ( लहानपणीं दुखणीं खूप झालीं. ) पंचम स्वरांत येईपर्यंत लहानपण संपलं. आता मधली स्थिति. ( फार कठीण, नाही ? ) त्यांत अनेक कलांचा समावेश– सिनेमा, नाटक. १९३१ सालीं कृष्ण फिल्म कंपनींत संत सखूची भूमिका. १९ दिवसांत सबंध पिक्चर तयार ( मारो गोली ! ) नंतर आंधळ्यांची शाळा नाटक. पुनः ‘ सुवर्णमंदिर ’ हें गगानं काढलेलं पिक्चर. ( आता प्रख्यात नाटककार, डायरेक्टर, नाट्यनिकेतनचे संचालक – मो. ग. रांगणेकर. ) मग कांही काळ विश्रान्ति. मग धैवत स्वरावर मुक्काम. तो काळ म्हणजे आयुष्यांतला उज्ज्वल म्हणायला हरकत नाही. ‘ ध नी ’ धमाल उडवली. १९४१ साल उजाडलं, त्याचबरोबर नवरात्र संपलं, आणि दसरा उजाडला; आणि दसऱ्याला नाट्यनिकेतन ह्या संस्थेनं थकलेल्या रंगभूमीला पुनः हात देऊन उठवण्याचा प्रयत्न केला. तीन महिने तिला थोडा आराम वाटला. पुनः ती झोपते की काय, असं वाटूं लागलं. पण एकदां थोडं चैतन्य आल्यावर, ज्याच्या अंगांत ताकद आहे असा माणूस थोडाच पडून राहणार ? तसंच कांहीसं गगाच्या बाबतींत घडलं. आणि १९४२ ऑगस्टला ‘ कुलवधू ’ने अत्यंत थकलेल्या सासूची मनापासून सेवा

बजावली. इतकी सेवा केली, की २३ वर्षांत सासूचे दिवस चांगले की सुनेचे दिवस चांगले, हें समजणं मुष्किल झालं. आणि तीच आपली रंगभूमि आज डौलानं मिरवीत आहे. सुकलेल्या झाडाला खतपाणी दिलं म्हणजे तें टवटवीत होतं; एकदां जीव धरला— मग फुलांफळांना काय तोटा ग ! तें रंगभूमीचं ऐश्वर्य मी आज पाहते आहे. नाट्यनिकेतन ही संस्था टिकावी म्हणून इतका त्रास सोसला आहे, बंदुशा ! तुम्हांला त्याची कल्पना येणार नाही. आज गगाबद्दल चार शब्द तुला जरूर लिहावेसे वाटतात. स्वतःचं रक्त जर कुणी आटवलं असेल, तर तें गगानं. तहान-भुकेचीसुद्धां त्यानं पर्वा केली नाही. पहिला प्रयोग ज्या दिवशीं असेल, त्याच्या आधीच्या दिवसापासून गगा जो थिएटरमध्यें असायचा तो नाटक पार पाडल्यावर जेवायचा. कामाची पद्धत ऐन वेळीं सर्व कांही करायची. त्याच्याइतका स्टॅमिना मी कुठं पाहिला नाही. अतोनात कष्ट. त्याचे ते कष्ट पाहिले, म्हणजे आम्हाला ‘ थकलों ’ म्हणायला शरम वाटायची. ‘ कुलवधू ’नं अपरंपार यश दिलं, पैसा दिला, आणि ४२ साल माझ्या जीवनांत सुवर्णाक्षरांनी दसऱ्याच्या सोन्यावर कोरून ठेवावं लागलं. १९४२ पासून सतत मी ‘ कुलवधू ’मधली भानुमतीची भूमिका करीत आले आहे. ही गोष्ट मला अत्यंत अभिमान बाळगण्याइतकी मोठी वाटली, तर त्यांत कुणाचं दुमत होईल असं वाटत नाही. गेल्या वर्षी पुण्याच्या रिमांड होमच्या मदतीसाठीं ‘ कुलवधू ’चा प्रयोग केला होता; तेव्हा प्रत्येकानं आंत येऊन कशाचं अभिनंदन केलं असेल? म्हणाले, २० वर्षांपूर्वी पाहिलेली ‘ कुलवधू ’ त्याच आवाजांत, त्याच स्वरूपांत आजहि पहात आहों. ( कदाचित् ही अतिशयोक्ति असेल, नाही ग, बंदू ? ) हे शब्द ऐकल्यावर किती बरं वाटलं म्हणून सांगूं ? आता सिल्व्हर ज्युबिली आली, की सासूला सांगावं— नाही, खूप सेवा केली तुझी; आता माझीच सासूबाई होण्याची वेळ आली. ( अर्थात्, मला स्वतःला तसं मुळीच वाटत नाही. ) आता सुनेला विश्रान्ति घे म्हणून सांग. नाही तर म्हणायची, विश्रान्ति कशाला पाहिजे; तूंच हो सासू. )

इथपर्यंत मजल मारली, बंदुशा;— संसार, मुलं, गाणं, नाटक— कांही वेळां मुलांना बरं नसतांना घरीं ठेवून नाटकांत काम करायला जावं लागलं,

म्हणजे इतकं वाईट वाटायचं,– स्वतःचाच राग यायचा. अशा वेळीं पापांनी खूप धीर दिला. त्यांनी तुमची खूपच काळजी घेतली. माझ्यापेक्षां त्यांनी घर जास्त सांभाळलं. तशीच मलाहि सांभाळली. कधींहि नवरेपणा, रागावणं, त्यांच्याकडून घडलं नाही. एकदां मला आठवतं, बाहेरगांवी नाटकाकरतां गेले होते. त्या वेळीं तूं जेमतेम ३ वर्षांची असशील. मी घरीं येऊन पाहते, तों तुला सर्दी व ताप होता. मी अशी– सकाळच्याच वेळीं घरीं पोंचले. तूं जेवणाच्या टेबलाजवळ, खुर्चीवर कानाला रुमाल बांधून बसली होतीस. मी एकदम घाबरून म्हटलं, " काय झालं ग बबडे, तुला ? " पण तुझ्या तोंडून हूं की चूं नाही. इतकी तूं चूपचाप बसून राहिलीस इतक्या लहान वयांत. तूं माझ्यावर भयंकर चिडली होतीस; पण मी जवळ घेतल्याबरोबर आपण दोघींनी रडायला सुरुवात केली. खूप–खूप वाईट वाटलं मला त्या दिवशीं. क्षणभर असं वाटलं, ' कां म्हणून आपण मुलांना सोडून जातों ? ' असे कांही वेळां प्रसंग यायचे. अर्थात् त्यांतून नेहमीं पार पडायची. काम करतांना तर माझ्यावर कित्येक प्रसंग आले आहेत. पण त्यांची मी कधीच पर्वा केली नाही.–आणि अजूनहि करीत नाही. अभिमान बाळगण्याजोगं जर कांही माझ्यापाशीं असेल, तर तें म्हणजे मनोधैर्य. –तें माझ्याजवळ भरपूर आहे.

संगीत, नाट्य, ह्या दोन कला मी हस्तगत केल्या, असं मला वाटतं. नंतर त्यांत हळूच डोकावून पाहूं लागलं लेखन. आतां मात्र येऊन ठेपली कठीण परिस्थिति, खरं की नाही ? पांच वर्षांपूर्वीं पुण्याच्या रेडिओ स्टेशननं ' मखमलीचा पडदा ' म्हणून एक सीरीज सादर केली. त्यांत रंगभूमीवरचे नामांकित कलावंत घेतले होते. विषय असा होता थोडासा– स्वतः केलेल्या भूमिका, रंगभूमीवरील कामांना केव्हांपासून व कशी सुरुवात केली, वगैरे. प्रश्न पडला भाषण लिहिण्याचा. मी पपांना म्हटलं, मला लिहिण्यासाठीं जरा मदत करा. कां, कोण जाणे, त्या वेळीं पापा म्हणाले, " मी आतां तुला ह्या वेळीं मुळींच मदत करणार नाही. तूं स्वतःच प्रयत्न कर. तू चांगलं लिहिशील." वरं का, बंटुशा, मला त्यांचा थोडा रागच आला. मीं म्हटलं, " बरं, बरं, लिहितेच मी." बनारसला म्यूझिक कॉन्फरन्सला मी गेले, तेव्हा गाडींत भाषणाचा सर्व आराखडा तयार केला, आणि लिहिण्यासहि

सुरुवात केली. खरोखरच, तें भाषण फार छान झालं. रेडिओंतहि सर्वांना आवडलं. कांही गाणीं पण ओघानं त्यांत आलीं, तींहि म्हणतां आलीं. तिथून माझं लेखन खरं सुरू झालं.

दुसरा मोठा प्रयत्न म्हणजे नाटक लिहिण्याचा. कां कोण जाणे, एक दिवस वाटलं, आपण नाटक लिहावं. आणि माझं मलाच हंसूं आलं ! त्या वेळीं घरांत दुसरं कुणीच नव्हतं. पापा रेडिओच्या नोकरीनिमित्त मुंबईला होते. तुम्ही शाळा-कॉलेजांत. घरीं मी एकटी. असेच नाटकाचे विचार डोक्यांत चालू होते. मला उगाचच भास होऊं लागला, की कुणी तरी मला सांगताहे, "ऊठ, लिहायला लाग. जमणार नाही असं कां गृहीत धरतेस ?" तशीच मी उठले आणि वही काढून लिहायला सुरुवात केली. हळूहळू जणु आधींच कांही डोक्यांत शिजत असल्यासारखं– पात्रं जमूं लागलीं, आणि सर्व पात्रं कागदावर नाचूं लागलीं. एका अंकाची तर तयारी झालीच. मात्र विषय घोळत होता एक, आणि नाटक निर्माण झालं दुसरंच. म्हणतां म्हणतां पांच दिवसांत, लहान का होईना, नाटक लिहून झालं. आतां कुणाला वाचून दाखवावं ? विचार केला, आधीं आपलीं मुलं. तुम्हांला वाचून दाखवलं. मग धीर करून शेजाऱ्यांना. नाटक सर्वांना आवडल्याचं दिसल. नंतर मला वाटूं लागलं, हें नाटक रंगभूमीवर आणावं; आणि एका वर्षा-नंतर तें रंगभूमीवर कसं आलं, हें तुला माहीत असल्यामुळं कांही लिहीत नाहीं. ह्या पत्रलेखनाचा उद्देश असा आहे, तूं मुलगी का असेनास, पण 'मान सांगावा जनाला' ह्या उक्तीप्रमाणं कांही अप्रिय तुलासुद्धा सांगण्याची माझी इच्छा नाही. एवढंच राहून राहून वाटतं, जर कुणी मला जास्त मदत केली असती, तर तें नाटक एक वेगळा टाइप म्हणून चांगलं ठरलं असतं. माझं स्वतःचं मत विचारशील तर "आराधना" मला खूप आवडलं. कांही त्यांत लेखनाच्या दृष्टीनं कमी-जास्त असेल, पण आहे ह्या स्थितींतसुद्धां तें चांगलं आहे. खरं म्हणजे, नाटक म्हणण्यापेक्षां तें एक काव्य आहे, असं म्हणतां येईल. बाकी, प्रत्येक आईला जसं वाटतं,–माझी मुलगी सुंदर आहे ! पण पाह्यला आलेला मुलगा नांवं ठेवून चालता होतो, तशांतली गत माझ्या नाटकाची झाली असेल. मला लाख चांगलं वाटलं, पण पसंत करणारे लोक दुसरेच ना ? तरीसुद्धां, मी तें नाटक हिंमतीनं रंगभूमीवर

आणलं. त्या वेळीं मी काविळीनं किती हैराण झाले होते, हें तुला आठवत असेल. मींच तें बसवलं, मींच त्याचं संगीत केलं, मींच त्यांतलीं गाणींहि रचलीं. सर्व कांही मीच. कारण, मी असा विचार केला, बरं-वाईट होईल त्याचा एकच धनी असलेला बरा. पहिल्याच प्रयोगाच्या दिवशीं तुला आठवतच असेल, २४ तास संतत धारेमुळं अर्धी मुंबई पाण्यांत होती. मराठा-मंदिरांत तर गुडघाभर पाणी झाल्यामुळं ठरल्या दिवशीं प्रयोग होऊं शकला नाही. पहायला येणाऱ्या लोकांची मला खरोखरच कमाल वाटली. धडाधड त्या पाण्यांत त्यांनी मोटारी लोटल्या. सर्व प्रेक्षकांची ती अवस्था पाहून मला मनापासून वाईट वाटलं. नंतर दुसऱ्या आठवड्यांत 'आराधने'चा प्रयोग त्याच थिएटरांत झाला. पण कां कुणास ठाऊक, त्या नाटकाला वेळच वाईट लागली होती, असं मला वाटतं. नाटक सुरू झालं आणि लाउडस्पीकरनं दगा दिल्यामुळं पहिला अंक लोकांना चांगला ऐकूं गेला नाही. नाटकाच्या दृष्टीनं पहिला अंक फारच महत्त्वाचा असतो. प्रेक्षकांना जर कांहीच ऐकूं आलं नाही, तर ते तरी बिचारे काय करणार ! पण खरं सांगूं का, बंदुशा, प्रेक्षकवर्ग त्या दिवशीं दृष्ट लागण्यासारखा होता, नाही ! अशा स्थितींत एकदांचा प्रयोग पार पडला. आतांपर्यंत दुसऱ्यांच्या नाटकांत भूमिका केल्यामुळं रंगभूमीवर गेल्यावर डोक्याला कांही काळजी नसायची. पण इथं स्वतःच मी नाटककार बनल्यामुळं, लोकांना नाटक कसं आवडेल, इकडे माझं निम्मं लक्ष होतं. अर्थात्, रांगणेकरांनी रंगभूमीची बाजू सांभाळली होतीच. ह्या सर्वांत आनंदाची गोष्ट एवढीच, की सर्व खर्च वजा जातां १००० रु. मी त्या वेळीं अंथरूण धरलेल्या श्री. शिवरामबुवा वझे ह्यांना दिले. खरोखरीच, त्याचं मला खूप समाधान वाटलं. संदर्भात आलं म्हणून मी हें लिहिलं. वास्तविक अशी मदत मी कित्येकांना केली आहे, पण त्याचा उच्चार मी करीत नाही.

अशीच एक आठवण ओघानं आली, म्हणून तुला लिहिते. बहुधा १९४० सालची गोष्ट असावी. एका दिवशीं सकाळीं सुप्रसिद्ध शिल्पकार करमरकर माझ्याकडे आले आणि म्हणाले, "आमची आर्टिस्टस असोसिएशन आहे. तेव्हा तुमच्या गाण्याचा प्रोग्रॅम आम्हांला करायचा आहे. तुम्ही त्यासाठी काय घ्याल ?" मी म्हटलं, "तुम्ही आर्टिस्ट, मीहि पण

आर्टिस्ट. तुमच्याकडून पैसे घ्यावे असं मला वाटत नाही. मी फुकट गाईन." एखाद्या गायिकेकडून हे शब्द ऐकायला मिळतील, असं त्यांना वाटलं नसावं. ते आनंदानं एकदम उद्गारले, "काय म्हणतां,–तुम्ही फुकट गाल ? इतका मोठेपणा तुम्ही दाखवतां, तर असं करा, आणखी थोडा मोठेपणा दाखवा. दोन दिवस तुम्ही माझ्या स्टुडिओंत या. मी तुमचा बस्ट करतों." मलाहि खूप आनंद झाला. दोन दिवसांत माझा पुतळा केला. दसऱ्याच्या दिवशीं, म्हणजे त्यांच्या असोसिएशनमधील माझ्या गाण्याच्या वेळीं त्यांनी मला तो नजर केला. तो पुतळा किती भाग्याचा निघाला म्हणून सांगूं ? निर्जीव असूनसुद्धा त्यानं 'कुलवधू'त जें ठाण मांडलं, तो अजून घरीं आला नाही. बहुतेक त्याचीच सिल्व्हर ज्युबिली मला करावी लागेल. दोनच दिवसांत नाना आणि माई करमरकर ह्यांनी फारच जिव्हाळा लावला.

एकंदरींत, अशा सर्व घडामोडी घडल्या. फार चांगल्या लोकांशीं नेहमी संबंध आल्यामुळं दिवस कसे आनंदांत गेले. खूप चांगल्या लोकांत वावरतां आलं. तें एक वेगळंच सुख असतं. मात्र, कितीहि नाटकं, गाणीं केलीं तरी घर कधीं सुटलं नाही,– त्याच्याकडे दुर्लक्षहि झालं नाही. तिखटा-मिठापासून ते लोणचीं-पापडापर्यंत घरींच केलेलं. बाजारचं कधींच वापरलं नाही. घरीं होत नाही म्हणून हॉटेलं कधीं पाहिलीं नाहींत. मुलं चांगलीं शिकलीं, आपआपल्या मार्गाला लागलीं. आई-बाप कामाला बाहेर गेल्यावर मुलं कशीं निपजणार, हें कुणाला म्हणूं दिलं नाही. बरं का, बंदू, एकदां एका शिक्षिकेनं मला प्रश्न केला, "तुम्ही दोघंहि कामासाठी बाहेर जातां; मुलांचं कसं होतं ?" आणि गंमत म्हणजे ती दिवसभर शाळेंत जात असे; शिकवण्याहि करीत असे. मी विचारलं, "तुम्ही नाही का नोकरी करीत ? तुमच्या मुलांचं कसं होतं ? मी आठवड्यांतून फक्त दोन तीन वेळां नाटकांत कामं करते. तुम्हांला तर मुलांना दररोजच सकाळपासून टाकून जावं लागत असेल." हें उत्तर मिळाल्यावर चूप बसली. कांही वेळां असला फार अनुभव येतो. दुसऱ्याचीच पंचाईत ह्या लोकांना फार ! असो.

× × ×

१९५३ सालीं खूप दूर,– म्हणजे चीनला जाण्याची संधि मिळाली. कल्चरल डेलिगेशनमध्यें २९ आर्टिस्टस् होतों आम्ही. पुण्यांतले आम्ही चौघेजण होतों– मास्तर कृष्णराव, हिराबाई बडोदेकर, मधुकर गोळवलकर, आणि मी. मास्तर बरोबर असल्यामुळं त्यांच्या विनोदांनी प्रवासांत खूप मजा यायची. आमची ट्रिप फारच छान झाली. 'हिंदी चिनी भाई भाई' ह्या गीतांना आठ-दहा वेळां वन्समोअर देणारे– त्या वन्समोअर-सारखंच दहा वर्षांनी जोरदार आपल्यावर हल्ले करतील, असं त्या वेळीं स्वप्नांतसुद्धा आलं नव्हतं. हिंदी-चिनी भाई भाई, म्हणे! भाई ह्या शब्दांतील प्रेम त्यांना कुठून कळणार? चौ-एन्-लायबरोबर आम्हीं किती थाटांत मेजवान्या झोडल्या होत्या! खरोखर कुणाला हेवा वाटावा, इतक्या बादशाही थाटांत त्यांनी आम्हांला ठेवलं होतं. छोड दो भाई!

चीननंतर भारताबाहेरचा प्रवास म्हणजे इंग्लंडचा. नाही म्हटलं तरी लंडनला येऊन इंग्रज लोकांना भारतीय संगीत काय आहे ह्याची थोडी ओळख करून देतां आली. ह्याच्या आधी कुणी तशी करून दिली नव्हती, असा ह्याचा अर्थ नव्हे. लंडन विद्यापीठांत खूपच गायले. फारच आवडलं गाणं त्यांना. तिथून निघण्यापूर्वी जॉयराजबॉय यांनी माझं खास रेकॉर्डिंगहि करून घेतलं. सर्वजण अतिशय प्रेमानं वागले. आणखी काय पाहिजे ग, बंदू? खूप पैसा असला म्हणजे कांही सुख नाही. मला तर असं वाटतं, की फार श्रीमंती असूंच नये. सुव्यवस्थित राहतां यावं एवढा पैसा मिळावा. तुला लिहिण्यासारखं आईजवळ खूप आहे. पण मला देतां येत नाही ग, नीटसं. आठवतहि नाही सगळं. लंडनला येऊन दादाचा संसार पाहिला. तो सुखी आहे. दोन मुलं, त्याची बायको;—ती त्याची व मुलांची खूप काळजी घेते. सुहास व तुझी वहिनी पण मजेंत असतात. आतां अनिल खरं म्हटलं म्हणजे लग्नाचा झाला आहे. दुसऱ्याची मुलगी घरांत यायची आहे,– चांगलीची अपेक्षा. आणि नंतर म्हणजे आमच्या वंदनाबाईंचं लगीन.

बोटींत बसून आतां दहा दिवस झाले. आज सकाळीं पोर्टसैदला पोंचलों आहों. आतां बोटीचा कंटाळा यायला लागला आहे. समुद्राला

जशी भरती व ओहोटी असते, त्याचप्रमाणं माझं पत्रलेखन चाललं आहे. एखाद्या दिवशीं खूप लिहावंसं वाटतं,– एखाद्या दिवशीं कांही नाही. असंच चालेल हं. हें पत्र खूप मोठं लिहायचं ठरवलंच होतं. कांही वेळां बोटींत खूप मजा वाटते. कांही मंडळी छान भेटली आहेत. पण एकदां घरची आठवण आली, की मग सारं कांही झूट! तूं अमेरिकेला गेली होतीस, तुझाहि हाच अनुभव आहे ना? कुठं दूर गेलं, की सुरुवातीला घरची आठवण सतावते, आणि जेव्हा आपण तिथं थोडं रमतों तेव्हा तिथून निघण्याची वेळ येते. अलिकडे अलिकडे लंडन मला आवडायला लागलं होतं. हवाहि जरा चांगली पडूं लागली होती. सकाळीं कोकिळा नसल्या तरी छोट्या चिमण्यांचा चिवचिवाट ऐकूं येत होता. झाडं फुलत होतीं. आतां गरम कोट 'झटकून' आपल्या इकडच्यासारखं नुसता ब्लाउझ घालून बाहेर हिंडतां आलं असतं. नाही तर, सुंदर साड्या नेसायच्या आणि वर मोठा टॉपकोट चढवायचा. साडीची सगळी सुंदरता लुप्त व्हायची त्यांत. त्या मोठ्या डगल्यासारखींच त्यांचीं बंद घरं. आंत गेल्यावर सुंदर वाटतात, पण बाहेरून तकडबंद. बाहेरची स्वच्छ हवा आंत यायला जागाच नाही. थंडी असली म्हणून काय झालं, गुदमरल्यासारखं व्हायचं. असो.

ईजिप्त पाहून मला पणजीची आठवण झाली. बाकी भारी अस्ताव्यस्त लोक. चहा किंवा कोल्ड्रिंकसुद्धां घेण्याची इच्छा इथं झाली नाही. आम्ही थोडा वेळ लॉंचनं किनाऱ्यावर जाऊन भटकून परत आलों. स्फिंक्स पिरॅमिड पाहण्याची इच्छा होती. पण ते २०० मैल दूर असल्यामुळं आम्हांला जातां आलं नाही. कांही वस्तू घ्या म्हणून तिथले लोक असे कांही मागं लागतात– मुंबईला तीं पोरं कशीं मार्केटमध्यें सतावतात—अगदी तोच नमुना. सुवेझ कालवा पाहिला. बोट आंत शिरतांना खूपच मजा वाटते. दोन्ही बाजूला वस्ती दिसत असल्यामुळं आतां आपण पृथ्वीवर आहोंत असं वाटतं. अरुंद असलेला कालवा बारा–चौदा तासांनंतर मोठ्या समुद्राला मिळतो. उद्यां पोचूं एडनला. पण बहुतेक संध्याकाळीं बोट तिथं लागेल. त्यामुळं परवां सकाळीं आम्हांला एडनला उतरतां येईल. जे कांही थोडे पैसे राखून ठेवले आहेत, त्यांची वाट तिथं लावली की संपला प्रवास,– अन् पैसा!

२१-५-१९६५

प्रिय बंदू,

काल आम्ही ब्रेकफास्ट आटोपून पांच मिनिटांतच एडन शहरांत पोंचलों. मला न्यायला प्रकाश खंवटे आले होते. ( हे आमच्या गोंयचे ! ) त्यांच्या घरी आधीं गेलों. तिथून १५ मिनिटांनी मार्केट धुंडाळायला बाहेर पडलों. अगदी अस्वच्छ गांव वाटलं. माल मात्र चिक्कार स्वस्त आहे !– पण खात्री नाही. अशी एकंदर परिस्थिति आहे. एडनमध्यें सर्व बोट खाली झाली, व पुनः बोटीवर सर्व चढल्यावर बोटीचं वजन दुप्पट झालं असेल. सौ. पुष्पा खंवटेनी अगदी आपल्या तिकडच्यासारखं जेवण केलं होतं. मासळी मस्त तळली होती. मुडदुशाचं कालवण केलं होतं. हें जेवण पाहिल्यावर खरोखरीच घर डोळ्यासमोर उभं राहिलं. इतकी पोट भरून जेवले त्या दिवशीं. जेवणानंतर पुनः थोडं बाहेर पडलों, आणि संध्याकाळीं ७–३० वाजतां बोटींत विराजमान झालों. आतां मुंबई अगदी चार दिवसांवर राहिली असल्यामुळं बेचैनी वाढत चालली आहे. बोटीवरच्या जेवणाचा आतांशी अगदीच कंटाळा आला आहे. खरं म्हणजे हें पत्र मी तुला एडनला टाकणार होते. पण नाही जमलं. आतां कराचीहून, बरं का. आणखी चार दिवसांनी मी तुम्हा सर्वांना पाहणार, आणि तुम्ही मला.

लंडनची सर्व मंडळी याद करतात. त्यांचा निरोप घेऊन बोटींत बसले. आतां बोटीवरच्या ओळखीच्या मंडळींचा निरोप घ्यायचा. अग, हो; बोटीवरती आम्ही करमणुकीचा एक कार्यक्रम केला, त्यांत मी म्हटलेलीं गाणीं ऐकून एकानं मला माझं नांव विचारलं. मी सांगितलं, "ज्योत्स्ना भोळे." तर म्हणतो कसा, "ज्योत्स्ना ? तुम्हांला पाहिल्यावर– जो कभि ना भूले, ती ज्योत्स्ना !" बहुतेक हा कवि असावा ! काय एकेकाचीं डोकीं चालतात, नाही ग ! तुम्हास्नी सांगायचं म्हणजे, इंग्लंडमधील एकूण मुक्काम चांगलाच झाला. बोटींत बसून पाण्यावर तरंगण्याचे दिवसहि संपत आले. आयुष्य हेंहि समुद्रासारखं अफाट वाटतं, केव्हा केव्हा. जर खरं कशाचं चित्र रेखाटतां येत नसेल, तर तें आपल्या आयुष्याचं, असं मला वाटतं.

२३-५-१९६५

आतां रात्रीचे १० वाजले आहेत. बाहेर व्हरांडा कॅफेमध्यें सर्व मंडळी सिनेमा बघण्यांत दंग झाली आहेत. पण मला तीं डिटेक्टिव्ह पिक्चर्स आवडत नाहीत, म्हणून मी आंत येऊन बसले. त्या मारामारींत सर्व जण कसे रमूं शकतात, कोण जाणे ! बोट थोडी उडत उडत चालली आहे. बोटींत बसल्यावर नाना तऱ्हेचे विचार मनांत येतात. कांही वेळां आकाशाला दोर बांधून आपण मोठा झोका घेत आहोंत असं वाटतं. सारखं वाटतं, पहात रहावं समुद्राकडे. कांही वेळां मी तासन् तास बघत बसते पाण्याकडे. मोठी लाट उसळली की वाटतं, आकाश खाली आलं. मग त्या छोट्या, चमचम करणाऱ्या चांदण्या– फार सुंदर ! अग बाई, पाहिलंस बंदू ! तारा निखळला ! उल्कापात !

अरेरे ! उगाच सांगितलं मी तुला. सांगूं नये म्हणतात ना. म्हणे, जी मनांत इच्छा असेल ती त्या वेळीं मागावी. मागितली, बरं का. पण तुला सांगणार नाही. नाही तरी तूं आहेस कुठं माझ्याजवळ ? काय पण वेडी मी. बरं का, बंदुशा, ह्या निखळलेल्या ताऱ्यावरून, २० वर्षांपूर्वी मी एक स्वप्न पाहिलं त्याची आठवण झाली. केव्हा तरी मला तें तुला सांगायचंच होतं. तर आज तुला सांगतेच. तें लक्षपूर्वक वाच. तुझ्याबद्दल फार, फार वेगळं असं कां वाटतं, व एक प्रकारचं मनांत काय गूढ आहे तें तुला मी लिहिणार आहे. स्वप्नं खरीं ठरतात, की स्वप्नाप्रमाणंच विरून जातात, कोण जाणे ! कांही वेळा ह्या स्वप्नाप्रमाणं स्वप्नाव्यतिरिक्तहि फार आश्चर्यकारक अनुभव आले आहेत. तो एक परमेश्वरी आशीर्वाद असावा, अशी माझी श्रद्धा आहे. देव प्रत्यक्ष दिसत नसला, तरी ती एक फार मोठी बलाढ्य शक्ति आहे !– ह्यावर माझा पूर्ण विश्वास आहे.

जवळ जवळ नऊ महिने तुझ्या वेळीं पुरे होत आले होते. तेव्हा आम्ही शशिविहारमध्यें रहात होतों. एका पहांटे अत्यंत सुंदर पण कुणालाहि न दिसणारं, सांगून न पटणारं, असं स्वप्न मी पाहिलं. पहांटे साडेतीन– चारचा सुमार असेल. मी ज्या खोलींत झोंपत असे त्याच्याच बाहेर व्हरांडा होता. मला असं स्वप्न पडत होतं, की मला मुलगी झाली आहे; ( तिचीच आम्ही

सर्व वाट पहात होतों ) व ती लहान वयांतच इतकी सुंदर नाच करते,– आणि तो नाच पाहायला आम्ही सगळे हॉलमध्यें जमलों आहोंत, बरं का.– आणि नाच पाहतांना, मी माझ्या आईला सांगते, की 'आई, बघ,– ही इतक्या लहानपणींच किती सुंदर नाचते ! अशी ही नाचतांना कुणी पाहिली तर तिला दृष्ट नाही का लागणार ?' आणि स्वप्नांतल्या तुझ्यामागं सुंदर वलय होतं ! मी ह्या स्वप्नांत असतांनाच माझ्या चेहऱ्यावर कुणी तरी अतिशय पॉवरफुल प्रकाशाचा झोत टाकला. कोण माझ्यावर बॅटरीचा झोत टाकतो, म्हणून मी डोळे उघडले. तर, बंदुशा, मला काय दिसलं, सांग ? केवढा तरी मोठा शुक्राचा तारा ! तो झोत जो ताऱ्यापासून निघाला होता, तो किरण टाकल्यासारखा थेट माझ्या तोंडावर. आणि, त्यामुळं मी खडबडून जागी झाले. जिथून तो झोत आला होता, तिथपर्यंत अर्थात् माझी नजर गेली, आणि दिसलेलं दृश्य पाहून मी थक्क– नव्हे भांबावून गेले. पौर्णिमेच्या चंद्राच्याच आकाराची ती शुक्राची चांदणी होती !

—ती पाहिल्यावर वाटलंच, की ह्याच चांदणीचा तो प्रकाश. नुसती न्हाऊन निघाली होते मी. दोन-तीन मिनिटं मी तें दृश्य पाहिलं आणि आतां सर्वांना उठवून ही केवढी तरी मोठी चांदणी दाखवावी असं मनांत आलं. पण मी जागच्या जागींच खिळून राहिले, आणि पाहतां पाहतां ती चांदणी पुनः नेहमीसारखी झाली !

तुझा जन्महि शुक्रवारींच पहांटे झाला. तुझ्या कुंडलींत शुक्र तेजस्वी आहे. ह्याला काय म्हणूं ? दैवी म्हणूं ? एवढा साक्षात्कार होण्याइतकी मी देवाची सेवा केली आहे कुठं ? काय,– काय म्हणूं मी ह्याला, ह्याचं उत्तर तुला तरी देतां येईल का ?

आज २० वर्षं मी त्या स्वप्नाचा विचार करते आहे. तें स्वप्न खरं होईल का ? त्या चांदणीनं टाकलेला प्रकाशाचा झोत तूं माझ्यावर केव्हा टाकणार, ह्याकडे माझं संपूर्ण लक्ष आहे. आतां माझ्या जीवनांत आणखी मी फार कांहीं करूं शकेन असं वाटत नाही. जें माझ्या हातून घडलं, त्याचं मला समाधान आहे !

—असं जरी मी म्हटलं, तरी माणसाचं समाधान कधीच पुरं होत नाही. पण मी म्हणते,—खूप केलं, खूप पाहिलं;—आयुष्यांत समाधान लाभलं. ह्या अंतरीच्या खुणा आहेत. आतां वाट पाहते ती फक्त त्या चांदणीच्या प्रकाशाची. तो प्रकाशाचा झोत 'माझ्या चांदणी'वर पडून तिनं जगाला त्यांतून न्हाऊन काढूं दे, हीच माझी इच्छा !

उरलेल्या आयुष्यांत वाट पाहण्यासारखं कांहीं जवळ पाहिजे. माझा उल्कापात होण्यापूर्वी तो झोत पुनः तूं दाखवावास, हीच शेवटची इच्छा !

तुझी

आई

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमा.
अनुक्रम १०३९४८ वि: भू-प्रवास
क्रमांक ७७४ नों. दि: ७/३/८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. कि. ९४८३

# शुद्धाशुद्ध

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | १४ | बंडु | बंदु |
| ३३ | २७ | ' ए दल्या | ' ए दल्या |
| ५४ | ७ | लिव्हरपूल | ही लिव्हरपूल |
| ७२ | ११ | तुझ्या आईनं... | ...खूप इंप्रेशन मारलं इकडं ! |
| ९१ | २ | गीता | प्रीता |

REFBK-0015843